म. ग्रं. सं. ठाणें
विषय निषेध
सं. क्र. २०६८.

६६

नोगतेम
नौतेमग
नौमगते
गतेमनो
गमनौते
गनौतेम
तेमनौग
तैनौगम
तेगमनो
मगनौते
मतेनौग
मनोगते

REFBK-0015133

वि० द० घा टे

10 वर्ष
04033
9/3/09
20 E

मनोगते

वि० द० घाटे यांची इतर पुस्तके

काही म्हातारे आणि एक म्हातारी

नाट्यरूप महाराष्ट्र

नाना देशांतील नाना लोक

पांढरे केस हिरवी मने

दिवस असे होते

इतिहास : शास्त्र आणि कला

बाजी आणि डॅडी

यशवंतराव होळकर



मनोगते

वि० द० घाटे

मौज प्रकाशन

मौज प्रकाशन : १२९

प्रथमावृत्ती : मार्च १९६६

© शिवाजी विठ्ठल घाटे, १९६६

किंमत चार रुपये

मुखपृष्ठ : र० कृ० जोशी

मुद्रक : वि० पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो, मुंबई ४

प्रकाशक : वा० पु० भागवत
मौज प्रकाशन गृह, मुंबई ४

अनुक्रम

राज्य ग्रंथ संग्रहालय, जि. सातारा
क्रमांक ५५४३३ दि. निबंध
दिनांक २०६८ सौ. दि. २४३।७१

कॅशिया भरारला	१
दुसऱ्यांचे टाटा	५
स्पिनोझा आणि शिवछत्रपती	७
His humility was insulting	१०
हात धरावा – हात सोडावा	१९
मोठेपणाची चिरफाड	२१
स्वप्न साकार झाले!	२९
काही विचार	३४
अनादरो भवति	३७
'पण – तरीपण'	४३
समस्यापूर्ती	४७
जगावेगळी माणसे	५३
हम तो बन चुके	६५
नवरदेव का मशालजी?	७४
ग्रीसचा महापुरुष बद्दफैली बायरन	८८
शिर्क्यांच्या आठवणी	९७
लाला लजपतरायांची शताब्दी	१०३
मी टोपी टाकली	१०७
भारतात धर्मयुद्धे का झाली नाहीत?	११३
महाराष्ट्राचे मन	१२१
बाहेरचा	१३३

शि या कॅ रा र भ ला
या कॅ शि ला भ रा र
शि कॅ या र रा भ ला
या शि कॅ रा भ ला र
कॅ या शि ला रा भ र
शि या कॅ भ रा ला र

कॅशिया भरारला !

पुष्कळ वर्षे झाली. मोठ्या आवडीने कॅशियाचे रोप आणले आणि बागेत एका कोपऱ्यात लावले. काही दिवस नित्यनेमाने त्या रोपाकडे पाहात होतो. त्याची मशागत करीत होतो. कॅशिया हळूहळू अंगी भरू लागेल अशी उमेद धरून होतो. एके दिवशी आढळून आले, कॅशियाच्या रोपाजवळच लगट करून एक रायवळ आंब्याचे रोप उगवले होते. अनाहूत होते. घरातील मुलांनी आंबे खाऊन कोया इतस्ततः फेकल्या. बाकीच्या वाया गेल्या. या कोपऱ्यात मात्र जागा चांगली मिळाली. या कोयीने जीव धरला. रोप वाढू लागले.

आंब्याचे रोप चांगलेच वाढले. खोड जाड होत चालले. ते झाड जात्याच मोठे खादाड. जवळपासच्या झाडांना जगू देत

नाही. त्यांच्या मुळांनाच नख लावते. आंब्याचा शेजारधर्म माझ्या कॅशियाला भोवला. त्या आडदांड रासवटाने कॅशियावर आक्रमण केले. तो कॅशियाचे जीवनसत्त्व मुळाकडून शोषू लागला. कॅशिया झुरत चालला. ज्या वयात खोडाचा चांगला विस्तार व्हायचा त्या वयांत ते क्षीण बारकेबारके होत चालले.

मला त्या आंब्याचा फार संताप आला. त्या आगंतुकाला मुळासकट उपटून टाकावे, असा विचार मनात आला. परंतु घरातून परवानगी मिळेना. आंब्याचे झाड म्हणे पवित्र असते. ते उपटायचे नसते. मला हे पवित्र-अपवित्र कधी समजलेच नाही. परंतु आजवर इतरांचे ऐकत गेलो, सांगतील तसे वागत गेलो. खरे म्हटले तर झाड ते झाड. झाडांत जातिभेद-वर्णभेद कसला? खादाड झाडाला उच्च वर्ण का द्यायचा? त्याच्या खादाडपणामुळे? कॅशिया माझा आवडता. त्याच्या नाजूक-नाजूक फुलांचे पुंजके नेहमीच माझे मन मोहून घेतात. माझ्या आवडत्या झाडावर आक्रमण करणाऱ्या त्या पवित्र आडदांडाला मला उपटून टाकायचे होते. पण ते जमले नाही. आजवर बरेचसे उपटून टाकायचे जमले नाही. हे असेच होत आले आहे.

आंबा वाढत होता. फुगत होता. कॅशिया अधिकाधिक क्षीण होत होता. परंतु हळूहळू कष्टाने पण नेटाने वर वर प्रकाशाकडे चढत होता. त्याचे मला कौतुक वाटले. पण त्याच्या यातना मला पाहवेनात. उपाय नव्हता. काही करता येत नसले म्हणजे पाठ फिरवण्याची माझी सवय आहे. तो खादाड आंबा कॅशियाला खाऊन टाकणार याबद्दल मनात शंका राहिली नाही. मी आंब्याकडे आणि कॅशियाकडे पाठ फिरवली.

काही वर्षे गेली. मन मोठे चमत्कारीक असते. काळाच्या प्रवाहात अनेक गोष्टी मागे राहातात आणि आपण पुढे वाहात

जातो. जावेच लागते. थांबता येत नाही. मागे फिरता येत नाही. काळ हा एकेरी मार्ग आहे. काही काळपर्यंत मान वळवून मागे पाहाता येते, मागचे बरेचसे दिसते; मग बरेचसे कमी दिसू लागते. आपण दूर जातो वळण येते. वळावे लागते. मागचे दिसेनासे होते. पुढच्याची दखल घ्यावी लागते. माझे तसेच झाले. नव्यानव्या घटनांची, अनुभवांची दखल घ्यावी लागली. मझ्या कॅशियाला जवळजवळ विसरून गेलो. आंब्यालाही विसरलो.

नोकरीतून निवृत्त झाल्यावर फुरसद मिळाली. काही काही राखून ठेवलेल्या गोष्टी करण्यास वेळ मिळाला. सुताराकडून एक छानदार झोपाळा तयार करवला. त्याची बागेत स्थापना केली माझे लहानपण गुजरातमध्ये गेलेले. झोपाळा माझा फार आवडीचा. कैक दिवास्वप्ने झोपाळ्यावरच पाहिली. बऱ्याच कविता झोपाळ्यावर झाल्या. झोपाळ्याच्या आंदोलनात लय असायची; ती कवितेत यायची. सकाळसंध्याकाळ आकाशाकडे टक लावून झोपाळ्यावर पडू लागलो. दृष्टी मंद झाली होती. कॅशिया जवळच्या कोपऱ्यातच लावला होता. परंतु दृष्टीप्रमाणेच त्याची आठवणही मंद झाली होती. माणसाने आठवणी तरी किती धरून ठेवाव्या? निष्ठा किती काळ जपाव्या? आणि जपाव्या लागतात त्या निष्ठा असतात का? झोपाळ्यावर पडल्यापडल्या वर पाहात होतो. डोळ्यांना जे दिसायचे त्यापेक्षा मनाला पुष्कळच दिसायचे. पण त्यात कॅशिया नव्हता.

—आणि आज चमत्कार घडला! आकाशाकडे दृष्टी लावून शांतपणे अगदी मोकळ्या मनाने झोपाळ्यावर पडलो होतो. मन प्रसन्न होते. लहानसहान संवेदनांचेसुद्धा स्वागत करण्यास तयार होते. आणि एक गंमत झाली. बाऱ्याची एक छानदार

हलकीफुलकी झुळूक, बाळाच्या ओठांच्या स्पर्शासारखी, हळूच स्पर्शून गेली. दुसरी आली. तिसरी आली. आणि माझ्या देहावर भरभर नाजूक इवल्याशा फुलांच्या तुऱ्यांचा वर्षाव होऊ लागला. फुले इतकी नाजूक की त्यांचा स्पर्श जाणवतसुद्धा नव्हता. आकाशातून छोट्याछोट्या पऱ्यांनी अलगद खाली उतरावे तशी ती फुले माझ्या देहावर एकामागून एक उतरत होती. एकदम तो चिरपरिचित सूक्ष्म मंद सुवास आला. मी दचकलो. मी शरमलो. तो कॅशियाचा वास होता. माझ्या कॅशियाने माझ्या देहावर फुलांची पखरण केली होती. जीवनातील अनेक वळणे घेता घेता ज्या कॅशियाला मी मागे टाकले होते, साफ विसरलो होतो, तोच माझा कॅशिया आपल्या मुलायम फुलांचा माझ्यावर वर्षाव करीत होता. मला सांगत होता, "मी आहे. तू विसरलास; पण मी नाही विसरलो. मी आहे."

माझ्या अधू डोळ्यांनी त्या कोपऱ्याकडे पाहिले. आंबा एका विशिष्ट मर्यादेपर्यंत उंचावला आणि थांबला होता. त्याने कॅशियाला शोधून घेण्याचे आपले काम केले होते. पण तो होता. कॅशिया जिवंत होता. खोड अगदी क्षीण झाले होते. परंतु कॅशिया वर वर गेला होता. आंब्याच्या कितीतरी वर गेला होता. धैर्याने आणि चिकाटीने त्याच्या जिजीविषेने आंब्यावर मात केली होती. अस्मानातील प्रकाश आणि हवा यांच्याशी माझा कॅशिया डौलाने खेळत होता.

स च्यां दु चे टा टा
च्यां स चे टा टा दु
टा टा च्यां स दु चे
दु चे च्यां टा टा स
चे स च्यां टा टा दु
टा स दु चे च्यां टा

दुसऱ्यांचे टाटा

छान झोप झाली होती. खुषीत होतो. पायांत सँडल्स घातल्या आणि बाहेर पडलो. काठी फिरवीत गुणगुणत खूप दूर गेलो. एक घर आले. पायरीवर एक गोड बाळ उभे होते, नाचत होते. बाहेर जाण्यास निघालेल्या आपल्या बहिणीला जोरजोरात एका गोड लयीत टाटा करीत होते.

बहीण आपल्याच नादात होती. थोडी रुक्ष दिसत होती. मागे वळून न पाहाता तिने घाईघाईत कसाबसा उलट टाटा केला आणि पाय उचलला. मी जवळूनच जात होतो, काठी फिरवीत होतो, गुणगुणत होतो. मी काठीसह उजवा हात वर केला आणि मोठ्या अगत्याने त्या बाळाला दिलखुलास टाटा केला.

बहिणीने ते पाहिले. तिच्या शब्दांसच चिकटून राहाणाऱ्या

मनाला ते खपले नाही. थोड्या उसक्यात ती मला म्हणाली, "टाटा तुम्हाला केला नव्हता!" मी हसत म्हणालो, "बाई, टाटा तुलाच केला होता; पण तो मलाही पावला. मी घेतला." आणि तसाच पुढे काठी फिरवीत गुणगुणत चालू लागलो.

—आजवर कैकदा दुसऱ्यांचे टाटा पत्करले आहेत—कधी जाणूनबुजून, कधी डोळ्यांवर कातडे ओढून!

नो झा स्पि णि आ शि छ व प
झा नो स्पि आ णि व शि छ प
नो स्पि झा णि आ छ प व शि
झा स्पि नो णि आ शि व प छ
स्पि झा नो आ णि छ शि व प
नो झा स्पि णि आ शि व छ प

स्पिनोझा आणि शिवछत्रपती

स्पिनोझा मला फार आवडतो : एक फार मोठा तत्त्वज्ञ म्हणून मानसशास्त्रज्ञ म्हणून आणि विशेषतः माणूस म्हणून. त्याचे तत्त्वज्ञान भारतीय विचारांशी पुष्कळ जुळते. आणि मानसशास्त्र तर आजच्या मानसशास्त्राची रंगीत तालीम करते. मन आणि शरीर यांना स्पिनोझा भिन्न समजत नसे. तो त्यांना एकच वस्तू मानी. आजही थोड्या वेगळ्या कारणासाठी त्या दोघांना 'बॉडी-माइंड' या सामासिक शब्दात गुंतवून टाकतात. स्पिनोझा म्हणे, शरीर म्हणजे मनाची बाहेरची बाजू आणि मन म्हणजे शरिराचे आतले रूप.

आज मला स्पिनोझाची आठवण त्याच्या तत्त्वज्ञानाने किंवा मानसशास्त्राने करून दिली नाही; त्याच्या रोजगाराने करून

दिली. स्पिनोझा फार सफाईने चष्म्याची भिंगे घासूनपुसून तयार करीत असे. त्याच्या भिंगांना पुष्कळ मागणी असे. कारण त्यावेळचे हॉलंड, फ्रान्स इत्यादी देश चष्मे वापरू लागले होते. स्पिनोझा या रोजगारावर थोड्याबहूत प्रमाणात पोट भरू शकला.

तुम्ही म्हणाल, यात विशेष ते काय सांगितले ? ही तर एक मामुली बाब झाली. जगात लोक सहस्रावधी धंदे करतात, त्यातलाच एक धंदा—कुटिरोद्योग म्हणा हवे तर—स्पिनोझा करीत होता. मामुली बाब !

तुमचे म्हणणे खरे आहे—म्हणजे खोटे आहे. ही मामुली बाब नाही. तुम्ही जगाचा सामाजिक इतिहास नीट वाचला असेल तर तुम्हाला ही बाब मामुली वाटणार नाही. कसे ते पाहा. स्पिनोझा १६३३ मध्ये जन्मला. आणि १६७७ मध्ये वारला. म्हणजे तो शिवछत्रपतींच्या जन्मानंतर तीन वर्षांनी जन्मला आणि त्यांच्या मरणापूर्वी तीन वर्षे आधी मरण पावला. म्हणजे तो महाराजांना समकालीन होता. स्पिनोझा सतराव्या शतकात चष्म्याची भिंगे घासण्याचा उद्योग एक मामुली धंदा म्हणून करीत होता. त्याचे समकालीन शिवछत्रपती. त्यांनी बहुधा चष्मा पाहिलेला नसावा. त्यांनी बहुधा जिजाबाईसाहेबांना वृद्धापकाळात वाचण्यासाठी चष्मा आणून दिला नसावा. पोर्तुगिजांकडून तोफा आणल्या; परंतु चष्मा आणला नाही.

जिजाबाईसाहेबांना चष्म्याची गरज नव्हती. त्या वाचीत नव्हत्या; नुसत्या ऐकत होत्या. त्यावेळची आपली माणसे नुसते ऐकून ज्ञान मिळवीत असत आणि बहुश्रुत म्हणवीत असत. वाचीत नसत, कारण वाचायला पुस्तकेच नव्हती. हाताने लिहिलेल्या पोथ्या होत्या. पुराणिकबुवा दीड-दोन हजार वर्षांपूर्वीच्या त्या पुराण्या पोथ्या वाचीत, अर्थ सांगत. आमची

माणसे ऐकत. केवळ त्यावेळचीच नव्हे, वेदकाळापासून जिजाबाईसाहेबांच्या काळापर्यंत बहुतेक माणसे ऐकत. काही थोडी तज्ञ माणसे त्यांना वाचून दाखवीत. म्हणजे बहुजनसमाज परावलंबी होता. जे ऐकले ते ध्यानात ठेवायचे एवढेच त्यांना ठाऊक असे. जी माणसे स्वतःसाठी स्वतः वाचीत नाहीत ती बहुधा स्वतःसाठी विचार करीत नाहींत, चिंतन करीत नाहीत.

महाराजांना चष्मा माहीत नव्हता; आणखी कितीतरी गोष्टी माहीत नसतील. वर्तमानपत्रे माहीत नव्हती. छापलेली मासिके, पुस्तके माहीत नव्हती. त्यांच्या समकालीन युरोपला हे सर्व माहीत होते. स्पिनोझा हा एक मध्यम स्थितीतलाच माणूस. पण तो फ्रान्स, जर्मनी, इटली, इंग्लंड या देशांतील शास्त्रज्ञांना, तत्त्वज्ञांना नेमाने पत्रे लिहीत असे; आपण जे लिहिले ते त्यांना कळवीत असे. ती माणसे उत्तरे पाठवीत असत. आपले विचार कळवीत असत. पत्रव्यवहाराने त्या सतराव्या शतकातसुद्धा ज्ञानाची देवघेव होत असे. शंका विचारल्या जात. चर्चा होत. सभा भरत. मोकळ्या मनाने मोकळे विचार मांडले जात.

समकालीन भारताने हे काहीच केले नाही. एकोणिसावे शतक बरेचसे उलटल्यावर आमच्याकडे पुस्तके छापण्यात येऊ लागली. आणि तरीही छापण्यास लागणाऱ्या शाईमध्ये जनावरांची चरबी असते म्हणून आमचे विद्वान छापलेल्या पुस्तकांना हात लावीत नसत. जुन्या पोथ्यांच्या नकला करूनच काम भागवीत असत. आम्ही आजवर जे जे जुने आहे त्याच्या नकला करूनच काम भागवीत आलो आहो.

स्पिनोझा आणि छत्रपती एकाच काळातले, परंतु अगदी भिन्न जमान्यातले.

ishumilitysawsuttnig
sihhuultyiaswlushig
ihsilitmutaswsulngti
ishmhutynwsaulting
sihlitymuawsnisullt
nsilmytinuaswsultin

His humility was insulting

बाळासाहेबांचा निरोप घेऊन आम्ही दोघे बाहेर पडलो. काही वेळ न बोलताच चालत होतो. दोघेही विचारमग्न होतो. बाळासाहेबांना भेटल्यावर नेहमीच मला विचार करावा लागे. पण मनातले विचार मी मनातच ठेवीत असे. काही वेळाने श्रीनिवासने माझ्याकडे पाहिले. मनात चाललेल्या खळबळीचा त्याच्या गोऱ्यापान नितळ चेहऱ्यावर एक प्रकारचा क्षोभ दिसत होता.

श्रीनिवास थोड्या जड आवाजात म्हणाला, "दादा—"

"काय रे?"

"मी बाळासाहेबांचा विचार करतोय."

"ते दिसतंच आहे. मीही तेच करतोय. विचार जरूर करावा. पण तो चेहऱ्यावर आणू नये. आतल्याआत ठेवावा."

माझ्या उपदेशाकडे लक्ष न देता श्रीनिवास म्हणाला, "बाळासाहेब नेहमी असंच हसतात काय?"

"जवळजवळ नेहमीच. पण असं म्हणजे कसं रे?"

"दादा, जो नेहमी हसतो तो खरं हसतो का हो?"

"लग्नाड आहेस. अरे, हसणं म्हणजे हसणं. त्यांत खरंखोटं काय?"

"बाळासाहेबांचं हसणं मला खोटं खोटं वाटलं. ते नाटक वाटलं दादा."

"असेल. तसंही असेल. शक्य आहे. हे बघ, म्हटलं तर आपण सारेच नट आहोत."

"मला शेक्सपियर सुनवू नका, दादा. आपण सारे नट असू. पण आपण नेहमीच तोंडाला रंग लावीत नाही. शिवाय बाळासाहेबांचा रंग वेगळाच होता."

"तो कसा?"

"क्षमा करा. बाळासाहेब तुमचे मित्र आहेत—"

"छे रे. बाळासाहेब कुणाचेच मित्र नाहीत. आणि म्हटलं तर सर्वांचेच मित्र आहेत."

"म्हणजे ते सिन्सिअर नाहीत, असंच ना?"

"आय वोंट से दॅट. वेट्या, नट अगदी सिन्सिअर असतो. त्याखेरीज चालायचंच नाही त्याचं. राजाचं काम करायचं तेव्हा राजाच असतो. पुढच्या नाटकांत वेड्याचं काम आलं तर वेडा होतो."

"ते तुमचं मानसशास्त्र जाऊ द्या. बाळासाहेब नाटक करतात, कसलेले नट आहेत, हेच तुम्हांला म्हणायचंय—मी तेच म्हणतो. पण दादा असं पाहा. काम संपल्यावर नट रंग पुसतोच नाही का? बाळासाहेब कधी रंग पुसतात का हो?"

"पुसतात कधीकधी. पण हे बघ, रंग पुसावाच लागतो असं काही नाही. अडचण असेल तेव्हा पुसावा; नसेल तेव्हा कशाला पुसा? परत तो लावावा लागणारच ना? अलीकडच्या बायका आपल्या केसांना कायमचं वळण देतात. उगाच उठल्याबसल्या दगदग कशाला? मी असे काही जगात वावरणारे नट पाहिले आहेत की, स्वतःच्या बायकामुलांसमोर, स्वयंपाकघरात– माजघरातसुद्धा ते तोंडावरचा रंग पुशीत नाहीत."

"उदाहरणार्थ, बाळासाहेब."

"उदाहरणार्थ, बाळासाहेब. झालं तुझं समाधान?"

"समाधान नाही झालं. मला असं सांगा, तुमचे बाळासाहेब स्वतःपाशी एकटे असताना रंग ठेवतात का?"

"वेड्या, ते एकटे असतांना मी तिथे कसा असेन? अरे, कायमचा रंग लावला असला तर तो परतपरत लावण्याचं प्रयोजन नसतं. स्वतःसमोरसुद्धा तो रंग टिकतोच. मला असं सांग. स्वतःसमोर माणूस रंगला तर काय बिघडलं? काही माणसं कन्सिस्टंट असतात. त्यांचं आत एक, बाहेर एक, असं नसतं. सारं सरळधोपट."

"सरळधोपट कसलं ते? स्वतःला स्वतःचा थांग लागू न देण्यासाठी ते वरून पांघरलेलं पांघरूण असतं."

"पांघरूण घेतलं म्हणून काय बिघडलं रे?"

"ती लपवालपवी असते. ते खरं नाही."

"काय खरं नाही? अरे, पांघरूण खरं आणि त्याच्यामागचा देहसुद्धा खरा. मला तू सांग, तू पांघरूण घेतोस ना? तुझा हा तगडा देह लपविण्यासाठी पांघरूण घेतोस?"

"नाही. थंडीसाठी."

"बरं. तूं हे झोकदार बुशशर्ट घातलं आहेस, ते तुझा देह लपवण्यासाठी?"

"देह लपवण्यासाठी नाही. चारचौघात वागायचं आहे, म्हणून."

"आणि चारचौवे नसते तर?"

"मला वाटतं—आय ॲम नॉट शुअर—मला वाटतं, तरीही मी हे बुशशर्ट घातलं असतं."

"छान छान. कसं नामी बोललास. आता मला आणखी सांग. या तुझ्या बुशशर्टच्या मागं दुसरा कोणताच हेतू नाही? जाडीभरडी बारावंदी का नाही घातलीस? लेका, हे टेरिलीन कशाला पाहिजे होतं? दे जन्नाब."

"तुमचा कावा समजलो, दादा. पण मी असा फसणार नाही. पांघरूण थंडीपासून बचाव करण्यासाठी. बुशशर्ट चारचौघात उघडंनागडं जाऊं नये म्हणून, थोडं नीटनेटकं दिसावं म्हणून. कबूल आहे मला हे सारं. पण बाळासाहेबांच्या वागण्याचा याच्याशी काय संबंध?"

"लेका, स्वतःला नवकवी म्हणवतोस अन आमच्या जुन्या-पुराण्या प्रतिमासुद्धा तुला उलगडता येत नाहीत? काय हे!"

"तुम्हीच उलगडा. मी उलगडू लागलो तर परत तुमच्यातला सॉक्रेटीस जागा होईल अन मला घोटाळ्यात टाकील."

"बरं उलगडतो. सुंदर दिसावं, चारचौघांसमोर शिष्टाचार पाळावा, म्हणून बुटशर्ट घालायचं. थंडी वाजू नये म्हणून पांघरूण घ्यायचं. आता ऐक. बाळासाहेबांच्या वागण्यात हेच हेतू असतात. नेहमी नाही, पुष्कळदा."

"म्हणजे काय?"

"म्हणजे असं...पण आधी एक गोष्ट सुचली ती सांगून टाकतो. मला जे सांगायचं त्याची ती प्रस्तावनाच आहे असं

समज. सांगायचं असं की तू महाराष्ट्रीय आहेस. बाळासाहेबांना समजू शकत नाहीस."

"महाराष्ट्रीय आहे म्हणजे काय आहे दादा?"

"म्हणजे रासवट आहेस, सरळधोपट आहेस. थोडा आडदांड आहेस—अर्थात मनानं. आणि इन्क्यूअरेब्ली ऑनेस्ट आहेस. समजलं?"

"महाराष्ट्राच्या वतीनं तुमच्या शिव्यांचा मी स्वीकार केला. पण माझा प्रामाणिकपणा असाध्य कसा? आणि दोष कसा?"

"सांगतो. तुमच्या मनाला प्रामाणिकपणाची हायपर-ॲसिडिटी झालेली असते. वेळीअवेळी ती भडाभडा बाहेर पडते. प्रामाणिकपणा हा तुमचा असाध्य रोग आहे."

"ते कसं?"

"ते असं : एखादा मनुष्य तुमच्याशी बोलत असतो. बोलण्याच्या भरात तो एखाददुसरं विधान करतो. ते तुम्हाला पटत नाही. विधान मामुलीच असतं. लक्ष देण्याइतकं महत्त्वाचं नसतं. दुर्लक्ष करण्याइतकं किरकोळ असतं. परंतु तुमच्यापाशी किरकोळ, मामुली असा विवेक नसतो. तुम्ही खाडकन त्याला गप्प करता, त्याचं म्हणणं खोडून काढता. दोन माणसं आपसात बोलत असली तर मधे तोंड घालता. फटकळपणानं कोणाचं तरी म्हणणं खोडून काढता. तुमचा प्रामाणिकपणा सदैव जागा असतो आणि सदैव दुसऱ्यांच्या चुका खोडून काढण्यासाठी तयार असतो. गप्प बसता येत नाही तुम्हाला. लेकाच्यांनो, कुणाच्या चुका दाखवता आल्या नाहीत तर त्या दिवशी तुम्हाला अन्न गोड लागणार नाही. अरे, तुमची एवढीशी पोरं, गांधी-नेहरूंच्या चुका काढत असतात."

"समजलं तुमचं म्हणणं. तुम्हाला वाटतं इतके आम्ही हे

नाही. ते जाऊ द्या. महाराष्ट्रीय असलो तरी तुमची चूक काढीत नाही. पण मला सांगा, चुकीचं मत खोडणं यात काय गैर आहे? चुकीचं बोलणं मुकाट्यानं ऐकावं असं तुम्हाला वाटतं?"

"अरे तसं नाही. माझ्या म्हणण्याचा विपर्यास करू नकोस. दुसऱ्याचं मत खोडणं कधीकधी अवश्य असतं. अवश्य असतं तेव्हा ते अवश्य खोडावं. पण अवश्य केव्हा असतं याचा आधी नीट विचार करावा. श्री, आपण कधीकधी गप्प बसायला शिकलं पाहिजे."

"छेः मला नाही पटत ते. गप्प बसणं 'नरो वा कुंजरो वा'-पेक्षा वाईट."

"मला नाही वाटत तसं. धर्म गप्प बसला असता तर बरं झालं असतं. 'नरो वा कुंजरो वा' असे कानावर हात ठेवून तो खोटं बोलला. अर्धसत्य असत्यच असतं."

"धर्म गप्प बसला असता तर ते खरं झालं असतं?"

"ते तितकंसं खोटं झालं नसतं. ऐकणारा मनात समजला असता : धर्माला सांगायचं नाही, आणि तो चौकशीसाठी पुढं चालता झाला असता. पण ते जाऊ दे. माझ्या सांगण्याचा मतलब इतकाच, माणसानं बोलण्यात संयम ठेवावा, थोडा शिष्टाचार पाळावा. बरंचसं दुर्लक्ष करावं. अत्युक्ती न करता ऊनोक्ती करावी आणि जमल्यास अनुक्ती करावी. दुसरी एक गंमत सांगतो. व्याकरणाच्या भाषेत सांगायचं म्हणजे थोडा कर्मणी किंवा भावेप्रयोग वापरावा. उठल्यासुटल्या कर्तरीप्रयोग वापरू नये. प्रथमपुरुषवाचक सर्वनाम वापरू नये. ते कटाक्षानं टाळावं. अरे, बोलणं असं खुबीदार असावं की ऐकणाराला कर्ता गवसू नये. फक्त कर्म आणि क्रियापद सापडावं. तेवढं पुरे

असतं. जे सांगायचं ते शांतपणं आणि सरळ सांगावं. त्यात आवेश आणू नये."

"दादा, भाषणात आणि लिहिण्यात आवेश आणला नसता तर संयुक्त महाराष्ट्र झालाच नसता."

"वारे पट्ठे! जीते रहो. 'झालाच पाहिजे'—नाही का? लेका, हा एक तुमचा दुसरा दुर्गुण. मामुली बोलण्यात संयुक्त महाराष्ट्राचा आवेश कशाला रे? रणांगणावर तलवार अवश्य उपसावी. परंतु स्वयंपाकघरात जेवताना, दिवाणखान्यात चर्चा करताना ती भिंतीला टांगून ठेवावी."

"कबूल आहे मला. गोष्टच निघाली म्हणून विचारतो. तुमच्या बाळासाहेबांनी रणांगणात तरी तलवार कधी उपसली होती का? त्यांच्यापाशी तलवार आहे का? त्यांच्यासमोर कधी रणांगण उभं होतं का? संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत या माणसानं आम्हांला कधी नाउमेद केलं, कधी गोंधळात टाकलं."

"अरे, मी बाळासाहेबांची वकिली करीत नाही. त्यांच्या मर्यादा मी जाणतो."

"थोडं विचारू का? महाराष्ट्रियांची फटकळ सत्यनिष्ठा आणि बाळासाहेबांचं नाजूकसाजूक नाटक, या दोहीत तुम्ही काय निवडाल?"

"आय शॅल मिक्स देम अप, मेक अ कॉक्टेल ऑफ इट."

"दादा, तुम्ही मघाशी पांघरुणाचा दाखला घेतला. मी म्हणेन, बाळासाहेब म्हणजे नुसतं पांघरूणच. त्याच्या आत काहीच नाही. त्यांना स्वतचं मन नाही, मत नाही. मला तर वाटतं, जो येईल त्याच्याशी मिळवून घेण्यात बाळासाहेब आपलं मनच गमावून बसले आहेत."

"नो नो. आय वॉंट से दॅट. त्यांना मन आहे, मत आहे. ते बुद्धिमान आहेत. आपलं मन लपवतात एवढंच. तुमचं लेकांनो मन हमेशा नागडंउघडं. म्हणूनच इतर लोक दगडफेक करतात त्यावर. बरं मला सांग, तुला बाळासाहेब दुष्ट वाटले?"

"भलतंच. अशी माणसं दुष्ट होऊ शकत नाहीत. दुष्टपणा हा एक पॉझिटिव्ह ॲटिट्यूड आहे मनाचा."

"बरं, बाळासाहेब तुला लबाड वाटले?"

"अलबत. अगदी लबाड."

"महाराष्ट्रीय आहेस झालं! बाळासाहेबांनी तुझं माझं म्हणणं खोडलं नाही म्हणून ते लबाड झाले? अरे, बाळासाहेबांच्या वागण्यात एक प्रकारचा सुस्पिष्ट असा शिष्टाचार होता. शिष्टाचार म्हटला म्हणजे थोडाबहुत अप्रमाणिकपणा आलाच."

"वारे शिष्टाचार! दादा, तो शिष्टाचार नव्हता. ते त्यांचं कॉंडीसेन्शन होतं. ते स्वतःला तुमच्याआमच्यापेक्षा उच्च समजतात, वेगळे समजतात. मतं खोडण्याइतक्या लायकीचे समजत नाहीत. त्यांचं ते हजरजबाबी हसणं, ते खांद्यावर हात ठेवणं, तो उडवाउडवीचा नर्मविनोद, ते निसरडं बोलणं—हे सारं त्यांची कृत्रिम ह्युमिलिटी दाखवीत होतं, त्यांची आत्मतृप्ती आणि आत्मपर्याप्ती दाखवीत होतं. तुम्ही काही म्हणा दादा, हिज ह्युमिलिटी वॉज इन्सल्टिंग."

"हा तुझा अनुभव झाला. इतर सारे बाळासाहेबांच्या वागण्यावर खूष असतात."

"असोत बापडे! ही लेफ्ट मी कोल्ड ॲंड ड्राय. बाळासाहेब सिनिक आहेत दादा."

"नाही रे बाबा. बाळासाहेब सिनिक नाहीत. नट आहेत, नाटक करतात; पण सिनिक नाहीत. सिनिक नाटक करीत नसतो.

त्याची जातच वेगळी. सिनिक रंगभूमीवर काम करीत नाही. प्रेक्षकात कोपऱ्यात अंधारात मिशा कुरतडत बसलेला असतो. सिनिक होण्याचं बाळासाहेबांमध्ये सामर्थ्य नाही. बरं चल, आता हे बाळासाहेबपुराण पुरं करू या. घर आलं. थोडा गरमागरम चहा घेऊ या. यू आर कोल्ड अँड ड्राय. आंच्यू? तुझ्यात थोडी ऊब आणतो."

"चला, घरात येतो, चहा घेतो; पण दादा, घर दिसल्याबरोबर तुम्ही पांघरूण घेतलंत."

"श्री, अरे, म्हातारा झालोय रे. आता थंडी वाजते. पांघरूण लागतं. तू पण पांघरूण घेत जा मधूनमधून. बरं असतं ते."

"घेईन, जमलं तर घेईन. पण दादा, चहा येईपर्यंत मला एवढंच सांगा, व्हॉट इज बाळासाहेब?"

"आय विश आय न्यू इट. आय विश ही न्यू इट."

हा ध त रा वा – त हा डा सो वा
त रा ध वा हा – डा त वा हा सो
ध वा हा त रा – हा सो डा त वा
हा रा त ध वा – सो हा वा त डा
वा हा ध त रा – वा त हा सो रा
रा हा त वा ध – त हा वा डा सो

हात धरावा–हात सोडावा

गेल्या महिन्यात माझ्या एका मित्राची मुलगी आपल्या तीनचार वर्षांच्या मुलीसह दोन दिवसांसाठी आमच्याकडे आली होती. रात्री थोडी उशिराच आली. माझी नातवंडे झोपली होती. सकाळी सारी उठली. माझ्या नातीने पूर्वी कधी न पाहिलेल्या त्या पाहुण्या मुलीचा हात धरला. थोडी हसली. पाहुणीही हसली. दोघी उडतबागडत बागेत गेल्या. झोपाळ्यावर बसल्या खूप खेळल्या. दोन दिवस दोघींनी एकमेकींना सोडले नाही. दोन दिवसांनंतर पाहुणी मुलगी निघून गेली. माझ्या नातीने तिची आठवण काढली नाही. ठेवली नाही. ती मुलगी पुढे कधी परत येईल तेव्हा माझी नात परत नव्याने तिचा हात धरील, हसेल, तिला बागेत घेऊन जाईल, दोघी खूप खेळतील.

...मला असे होता येईल का? जे झाले गेले ते विसरता येईल? तिकडे पाठ फिरवता येईल? ते परत आले म्हणजे त्याचे ताजेपणाने स्वागत करता येईल? लागेबांधे जमतील त्यांनी केवळ मज्जातंतूंतच घर करावे, मनात करू नये. भेट झाली की हात धरावा, भलेपणाने आणि अगत्याने वागावे; हात सुटला म्हणजे तो सोडावा, पुढे जावे. असे होईल का?

मो प ठे णा ची चि फा ड र
णा मो ठे प ची फा चि र ड
ची ठे ष णा मो ड चि र फा
प णा मो ची ठे र ड चि फा
मो प ठे णा ची चि फा र ड
मो णा प ठे ची ड फा चि र

मोठेपणाची चिरफाड

आम्हा सामान्यांना असामान्यांचे मोठेपण कळत नाही. मोठी माणसे सात ताड उंच असतात आणि आमचे इतिहाससंशोधक सामान्यांच्या मोजमापाने त्यांना मोजू पाहतात. शिवछत्रपतींचीच गोष्ट घ्या. संशोधकांना महाराजांइतके उंच होता येत नाही. ते महाराजांच्या मोठेपणाची चिरफाड करतात, शकले करतात आणि त्या शकलांचे माप घेतात.

महाराज हे अलौकिक पुरुष होते. त्यांच्या हयातीतच त्यांची अवतारी पुरुषांत गणना झाली होती. उत्तर भारतातील तेजस्वी तरुण महाराजांपासून स्फूर्ती घेण्यासाठी रायगड चढत होते. आमच्या संशोधकांना हे अलौकिकत्व झेपत नाही, खपत नाही, पटत नाही. त्यांची दृष्टी शास्त्रीय असते. निदान त्यांना

तसे वाटते. कार्यकारणभावाच्या आधारावर ते महाराजांचे जीवन तपासतात. महाराजांना कुणी कुणी, कसे घडवले, हाताशी धरून त्यांच्याकडून कशी कामे करवून घेतली, याचा शोध करतात; श्रेयाचे वाटे करतात आणि ज्याचे त्याला देतात; उरलेले श्रेय महाराजांच्या पदरात घालतात आणि समाधान पावतात.

या अभाग्यांना कळत नाही, मोठेपण जन्माला येत असते, ते घडत नाही; ते स्वयंभू असते. मदत मिळते, सहानुभूती मिळते; परंतु मोठ्या माणसांना आपली वाट स्वतःच शोधावी लागते. ती एकेरी असते. दुसरा कुणी ती दाखवीत नाही. जी प्रज्ञा आणि प्रतिभा घेऊन हे महाभाग जन्माला येतात त्याच ही वाट दाखवतात.

हिंदवी स्वराज्य हे खास महाराजांचे स्वप्न. स्वप्न अस्पष्ट असते, धूसर असते. महाराजांचे स्वप्नही आरंभी तसेच असणार. वाट चालता चालता पुढची वाट दिसू लागली असणार आणि क्रमाक्रमाने स्वप्नाला आकार आला असणार. परिस्थितीने कधी साथ दिली. कधी आड आली; पण अडवू शकली नाही. परिस्थितीने वाट दाखवली नाही. वाटा डोळ्यांसमोर अनेक होत्या आणि त्या साऱ्या रुळलेल्या होत्या. सोप्या व सरळ होत्या. महाराजांनी कुणी न तुडवलेली वाट पत्करली आणि चालू लागले. हिंदवी स्वराज्य ही एक सृजनात्मक भावना. सृजन ज्याचे त्याला करावे लागते. ते सामूहिक कार्य नव्हे, वैयक्तिक कर्म आहे. बाळंतपणाला एक किंवा अनेक दाया येतील. आई बाळगोळी देईल, स्तनपान देईल, पोषण करील. यापलीकडे आईचे काम नाही.

महाराजांच्या श्रेयाचा वाटा मातोश्रीस, वडिलांस, सद्गुरूस

देण्यात येतो. या मंडळींच्या कार्याच्या मर्यादा ओळखल्या पाहिजेत. एका फार मोठ्या माणसाची आई यापलीकडे जिजाबाईसाहेबांना इतिहासात महत्त्व नाही. मोठ्या माणसाची आई मोठीच असते आणि ती आपल्या मुलाला मोठे, करते, ही आपली भ्रामक कल्पना आहे. अलीकडे तर आईच काय, मोठ्या माणसांच्या जवळच्या सर्व आप्तांना आपण मोठे मानू लागलो आहोत.

जिजाबाईसाहेबांनी महाराजांसाठी नक्की काय केले? इतिहासात काहीच पुरावा नाही. त्यांनी महाराजांना जन्म दिला, वाढवले, लहानपणी आपत्काळी सांभाळले. साऱ्या आया आजवर हेच करीत आल्या आहेत. जिजाबाईसाहेबांनी लहानपणी महाराजांना रामायण-महाभारतांतील गोष्टी सांगितल्या, सांगवल्या. त्या वेळच्या खानदान मराठा मुलांचे सर्वांचेच हे त्यावेळचे प्राथमिक शिक्षण होते. महाराजांना कुस्त्या, दांडपट्टा, फरीगदगा, भालाफेक, तरवारीचे हात शिकवण्यात आले. हेही त्यावेळच्या महाराजांच्या दर्ज्याच्या मराठा मुलांचे माध्यमिक शिक्षण होते. ते सर्वांनी घेतले, पण शिवाजी एकच निघाला. सारांश, महाराजांना जे शिक्षण मिळाले ते पूर्वनियोजित आणि खास असे नव्हते.

या मायलेकरांचे परस्परसंबंध विशेष जिव्हाळ्याचे असावेत. महाराज आईपाशीच वाढले. त्यांना पितृसुख मिळाले नाही. जिजाबाईसाहेबांना फार दिवस पतीसुख मिळाले नाही. ती एक परित्यक्ता, दुर्दैवी स्त्री होती. मालोजी देवडीवरचा शिपाईगडी नव्हता. थोडाबहुत फौजफाटा बाळगणारा, चार पाटिलक्या संपादन केलेला, खटपटी इसम होता. वऱ्हाडात आजसुद्धा तिकडचे देशमुख तिकडच्या पाटलांना कमी लेखतात. लखुजी

जाधवरावांची मालोजी-विठोजीकडची दृष्टी यापेक्षा वेगळी नव्हती. ते लग्न एक जुलमाचा रामराम होता. बहुधा ते राजकीय लग्न असावे. काही असो. बेंगरुळाहून परत पुण्यास आल्यावर जिजाबाईसाहेब परत नवऱ्याकडे गेल्या नाहीत. त्याकाळी आणि पुढे सरदारदरकदारच काय, सामान्य सुखवस्तू पुरुषसुद्धा अनेक लग्ने करीत आणि आपल्या मगदुराप्रमाणे व इभ्रतीप्रमाणे थोडीबहूत अंगवस्त्रे बाळगीत. असे असले तरी जुन्या बायकांची परगावी रवानगी होत नसे. साऱ्या एकत्रच नांदत. कधी जमवून घेत, कधी भांडत. काही विनसल्याखेरीज दूर ठेवले जात नसे.

जाधवांच्या खानदानात जन्मलेली आणि पतिप्रेमास मुकलेली स्त्री आणि पितृप्रेमास वंचित झालेला तिचा तेजस्वी मुलगा एकत्र राहिल्यावर उभयतात विशेष जिव्हाळ्याचे संबंध दृढ होत जाणे अगदी स्वाभाविक आहे. जिजाबाईसाहेबांनी आपले तेज प्रकट करण्यासाठी मुलाला स्वराज्याची दीक्षा दिली असेल असे मानण्याचा मोह होतो. जिजाबाईंच्या दृष्टीने नवऱ्याला दिलेली ती एक व्हिकेरियस पनिशमेंट होती असा तर्क करण्याचाही मोह होतो. परंतु इतिहासाला सत्य हवे असते; तेथे मोहाला स्थान नसते. एवढे निःसंशय म्हणता येईल, जिजाबाईसाहेब कधी आड आल्या नाहीत. त्या कोवळ्या रोपाला त्यांनी खतपाणीच घातले असेल.

स्वातंत्र्याचे विचार स्वतंत्र मनात उपजतात. अनुभवातून त्यांना बळ मिळते. अनुभव स्वसंपादित असतात.

आता शहाजीराजे. महाराजांना राजांचा फारसा सहवास मिळाला नाही. बेंगरुळाहून आल्यावर परत कधी वडिलांची भेट झाली नाही. राजांनी मार्गदर्शनपर किंवा उत्तेजनपर असे लिहिलेले एकही पत्र उपलब्ध नाही. हॅनिबॉलच्या बापाने तो लहान

...ग्रहालय, ...स्वामी...
...04.8.28... ...शिवाजी...
...2006... ...28/3/08...

असतानाच रोमशी आमरण वैर करण्याची त्याच्याकडून शपथ घेतली. शहाजीराजांनी महाराजांना स्वराज्यस्थापनेसाठी व्रतस्थ केले नाही. स्वतः स्वराज्याचा संकल्प कधी उच्चारला नाही. महाराजांना राजे व्रतस्थ काय करणार?

शहाजीराजे पराक्रमी होते, महत्त्वाकांक्षी होते. ते घराणेच या बाबतीत इतरांच्या आघाडीस होते. महाराजांना वारसा मिळाला असेल तर तो या पराक्रमाच्या आणि महत्त्वाकांक्षेच्या परंपरेचा. आनुवंशिकतेचे शास्त्र सांगते, असले गुणधर्म स्वकष्टार्जित असतात. रक्तातून पुढच्या पिढीला मिळत नसतात. रक्तातून मिळालेला वारसा जन्मजात प्रवृत्तींचा असतो. परंपरेचाही वारसा असतो; परंतु तो वैचारिक असतो. आजोबांनी आणि वडिलांनी फौजा बाळगल्या, लढाया मारल्या, पराक्रम केले, वतने संपादिली, एवढा कित्ता महाराजांसमोर होता. महाराजांनी तेवढाच कित्ता गिरवला नाही. पराक्रमाची आणि महत्त्वाकांक्षेची परंपरा चालू ठेवली, परंतु त्या वारशाला नवीन वाट करून दिली.

शहाजीराजांच्या मर्यादा स्पष्ट होत्या. इतर मराठा सरदारां प्रमाणे मुसलमानी रियासतीत चाकरी करावी, वैभव मिळवावे एवढीच राजांची उडी. अलीकडच्या भाषेत बोलायचे म्हणजे राजे सुरेंद्रनाथ बानर्जी, फेरोजशहा मेथा, यांच्या पंक्तीतले कणखर असे नेमस्त होते. साम्राज्यांतर्गत स्वायत्त वसाहतीचे राज्य मागणारे होते. वसाहतीचे राज्य स्वराज्य होऊ शकत नाही. राजांच्या डोक्यात स्वराज्याची कल्पना असती तर त्या अंदाधुंदीच्या अराजकी जमान्यात तसा उद्योग करण्यास राजांना पुष्कळच वाव होता. कदाचित राजे फसले असते. कदाचित हुतात्मे झाले असते. आणि ते बरे झाले असते. महाराजांनी स्वराज्यसंकल्पक पितृदेवाच्या हौतात्म्यावर स्वराज्याची समाधी

उभारली असती. पण तसे घडले नाही. दोघेही पराक्रमी आणि महत्त्वाकांक्षी. परंतु दोघांच्या जीवनदृष्टीची जातच वेगळी.

शहाजीराजांनी बेंगळूरला बसून पुण्यास कारभाऱ्यांच्या आणि मुलाच्याकरवी स्वराज्याचा उद्योग केला, असे महाराजांच्या मोठेपणाची चिरफाड करणारे मानतात. इतक्या दुरून राजांनी उंटावरून शेळ्या का वळल्या? शिवाय स्वराज्यच स्थापायचे होते तर प्रौढ आणि कर्तबगार अशा संभाजीला जिजाबाईबरोबर का पाठविले नाही? मुख्य मुद्दा असा की संभाजी काय किंवा शिवाजी काय किंवा कारभारी मंडळी काय, यांच्यामार्फत हा द्राविडी प्राणायाम कशाला? पूर्वी सांगितल्याप्रमाणे सुजन ज्याचे त्याला करावे लागते. तेथे प्रत्यक्ष पोटचा दलालसुद्धा चालत नाही.

आता उरले समर्थ रामदास. संशोधकांनी समर्थांच्या बाबतीत अगदी गहजब केला आहे. सुताने आणि कधी तर जवळ सूतही नसता थेट स्वर्ग गाठला आहे. समर्थ मोठे होते. महाराजही मोठे होते. दोघांचे मोठेपण स्वतंत्र होते. समर्थांना महाराजांची गरज नव्हती, महाराजांना समर्थांची नव्हती. आध्यात्मिक क्षेत्रात गरज अवश्य होती. महाराज मुळातच धर्मशील. मला तर वाटते, या वृत्तीमधूनच स्वराज्याचा संकल्प स्फुरला. महाराज सत्पुरुषांविषयी श्रद्धा बाळगीत, त्यांच्या भेटी घेत, सेवा करीत. केळशीच्या बाबा याकूत या सिद्धपुरुषाचा महाराजांनी आशिर्वाद घेतला, त्याच्या केसाचा ताईत बांधला. सर्व सत्पुरुष पूज्य असले तरी समर्थ महाराजांचे सद्गुरू होते. परंतु समर्थ आणि महाराज यांचा संबंध १६७२ पूर्वी आला नाही. १६७२ पर्यंत महाराजांचे अवतारकार्य बहुतेक सिद्धीस गेले होते.

या दोन थोर पुरुषांची भेट १६७२त झाली याला अस्सल पुरावा आहे. ३ एप्रिल १६७२ रोजी समर्थांच्या एका शिष्याने

चाफळच्या मठातील दुसऱ्या ज्येष्ठ शिष्याला पत्र लिहिले. या पत्रात तो केशव शिष्य म्हणतो, "प्रकृति बिघडली असल्याने आपण येऊ शकत नाही. आकांचेही येणे व्हावयाचे नाही. त्रिंबक, विठ्ठल, दत्तात्रेय या तिघां शिष्यांना मदतीसाठी पाठवतो... राजे यांची ही पहिलीच भेट. वाडीचे लोकांस खटपटीस आणावे, उपयोग होईल. झाडी बहूत आहे." पत्र अगदी स्पष्ट आहे. भेट पहिलीच म्हणून व्यवस्थेसाठी इतका खटाटोप.

राजवाडे साऱ्या मुलखाचे हट्टी. 'पहिलीच' हा शब्द डावलता येईना. तेव्हा त्यांनी मल्लीनाथी केली, मठाला दिलेली पहिली भेट, समर्थांची पहिली भेट नव्हे. मी १९२५ साली थोड्या खवचटपणाने राजवाड्यांना विचारले, "काय हो, एखाद्या संस्थेला भेट देणे हा शब्दप्रयोग सतराव्या शतकात मराठी भाषेत होता का? To pay visit to an institution या अलिकडच्या इंग्रजी प्रयोगाचा हा सरळ अनुवाद नाही का?" राजवाड्यांनी मला उत्तर दिले नाही. त्यांच्यापाशी उत्तर नव्हते; फक्त दुराग्रह होता.

समर्थांचे धर्मक्षेत्र होते. कुरुक्षेत्र नव्हते. दासबोधात उत्तरभागात आणि स्फुट काव्यात कुरुक्षेत्र आले ते महाराजांच्या अद्भुत रोमांचकारी कर्तृत्वाने ते कविमन प्रभावित झाल्यावरच. समर्थांनी मठांची स्थापना केली ती आपल्या उपासनामार्गाच्या प्रसारासाठी. मठांत राजकारण शिजले नाही. मठांच्या अधिपतींची महाराजांना, संभाजी-राजारामाना, धनाजी-संताजींना मदत झाल्याचा दाखला नाही. प्रत्यक्ष चाफळचाच मठ घ्या. या मठाने महाराष्ट्राच्या आपत्काळी काही उद्योग केला नाही. स्वामी इतर स्वामींप्रमाणेच सुखासीन राहिले.

(या संदर्भात मला एक कटू सत्य सांगायचे आहे. कल्याण, उद्धव या शिष्योत्तमांनी सारी हयात समर्थांच्या सेवेत घालविली.

ते समर्थांच्या विश्वासास पात्र झाले. परंतु प्रयाणकाळ जवळ आला तेव्हा समर्थांनी जांबेहून आपले दोघे कोवळे पुतणे आणले आणि त्या पोरांना गादी दिली. राजानंतर युवराज गादीवर यायचा हा शिरस्ता होता. परंतु गुरूच्या मागून पट्टशिष्य गादीवर बसत असे आणि उपासनेला दृढ चालवीत असे. समर्थांनी हा कायदा मोडला.)

आता एक तात्त्विक प्रश्न. कर्मवीर (hero) आणि कवी एकत्र आले म्हणजे कोण कोणावर प्रभाव पाडतो? मला वाटते, कर्मवीरच आपल्या लोकोत्तर कर्माने संवेदनशील कविमनास स्फूर्ती देतो, इतकेच नव्हे तर विषय आणि आशय पुरवतो. "बुडाला औरंग्या पापी। म्लेंच्छसंहार जाहला। मांडलीं मोडलीं क्षेत्रे। आनंदवनभूवनीं" या अमर काव्यातील अथांग उल्हास आणि साफल्याची अपार तृप्ती शिवप्रभूंच्या अवतारकृत्यांमुळेच स्फुरली.

यात नवल वाटण्यासारखे काही नाही. हा जुनाच दस्तूर आहे. आधी रामावतार झाला; मागून रामायण. आधी कृती; मग काव्य.

...महाराज युगपुरुष होते. कैक शतकांत असा एखादाच महापुरुष निपजतो. हजार वर्षे आंधळेपणाने एका दिशेने चाललेल्या महाराष्ट्राच्याच नव्हे, तर भारताच्या इतिहासाला महाराजांनी थांबवले आणि दुसरी वाट करून दिली. महाराजांनी नवे युग जन्माला घातले, नवे सिंहासन स्थापले. आपण हे अलौकिक विभूतिमत्त्व जाणले पाहिजे. त्या उत्तुंग शिल्पाचे टवके काढीत बसणे हे करंटेपण. आपण ते सोडले पाहिजे. ही आंधळी भाबडी विभूतिपूजा नाही. विभूतिपूजा जरूर आहे; पण ती डोळस, जागरूक आणि जाणती आहे! तो महाराष्ट्रधर्म आहे!

स्व प्न र सा का ले झा
प्न स्व का सा र झा ले
स्व का प्न सा र ले झा
प्न स्व र सा झा का ले
स्व सा प्न का र ले झा
प्न स्व र का सा झा ले

स्वप्न साकार झाले!

अलीकडे आम्हाला काय झाले आहे? सरळ हात उचलून घास तोंडात घालायचा हा आमचा जुना शिरस्ता. आम्ही हात डोक्यामागून घेऊन द्राविडी प्राणायाम करू लागलो आहोत. वास्तविक आमची मराठी भाषा साधीसीधी, सरळ, नाकासमोर जाणारी. कुदळीला कुदळच म्हणायची. वेडावाकडा संस्कृत शब्द वापरीत नसे. आता साध्या वस्तूसाठी अगडबंब संस्कृत किंवा फारशी शब्द वापरू लागली आहे. तिला आडवळणे माहीत नव्हती असे नाही. परंतु अगदी प्रसंग पडलाच तर ती तशी वळणे घ्यायची. ज्ञानेश्वर, मुक्तेश्वर, रघुनाथपंडित यांच्यासारख्या थोड्याच लाडक्या लोकांना ऐसपैस हातपाय पसरण्याची मुभा.

रस्त्यात कुणी भेटला. भेटायचाच तो. उपाय नसतो.

साऱ्यांनाच टाळता येत नाही. पुण्यास पूर्वीसारखे बोळ, बोळकांड्या राहिल्या नाहीत. पूर्वीसारखे पटकन सटकून जाता येत नाही. माणूस समोरून आला की मुकाबला करावा लागतो. पटकन वेतापुरते हसावे लागते. ते ओठावर तयारच असते. ते खोटे असते. जगात राह्यचे, वावरायचे म्हणजे थोडे खोटे हसावे लागतेच. ते ठीक झाले. पण आपण पूर्वी म्हणत असू, "आपण भेटलात, आनंद झाला" आणि पुढे जात असू. अलीकडे मात्र अनेक सभासंमेलनांना नर्मदा ओलांडून सवलतीच्या टिकिटावर उत्तरेस जाण्याचा प्रघात पडल्यापासून सारे बिघडले आहे. द्राविडी प्राणायाम सुरू झाले आहेत. साध्या वरणात तिखटमीठ, खानदानी मसाला आला आहे. भाषा सजावटीखाली गुदमरू लागली आहे. आता आमचे उत्तरेकडची यात्रा करून आलेले राजकारणी साहित्यिक "आपल्या भेटीने आनंद झाला" असे सरळ म्हणायचे नाहीत. "आपल्या दर्शनाने फार समाधान झाले" असे म्हणतात. दर्शन ! बोडख्याचे दर्शन ! दर्शन देवाचे असते. माणसाची भेट असते.

एखाद्या इमारतीच्या पायाभरणीच्या समारंभाचे आमंत्रण येते. त्यात फलाण्याफलाण्या देशभक्ताच्या शुभहस्ते किंवा (उससे भी और जादा) करकमलद्वारा पायाभरणी इ० इ० असा मजकूर असतो. आता तुम्हीच सांगा, करकमल एखाद्या गोपातल्या सुंदर स्त्रीचे असतात (असतातच असे नाही, पण असतात) का त्या राकट रासवट माणसाचे ? म्हणे शुभहस्ते. पायाभरणीपूर्वीच उगाच त्या हातांना शुभ म्हणता कशाला ? कदाचित पायाच्या दगडावर इमारत उभी राहणारसुद्धा नाही. बहुधा त्या शुभहस्तातून चेक फाडला जायचा नाही. नुसते 'हस्ते' म्हटले तर काय बिघडेल ?

अलीकडे जो उठतो तो उठल्यासुटल्या 'माझे स्वप्न साकार झाले' असे जाहीर करतो. बोलताना, लिहिताना आणि विशेषतः व्याख्यान झोडताना. ज्याने हे वाक्य प्रथम उच्चारले त्याला काहीतरी असामान्य अनुभव आला असेल. उराशी बाळगलेले ध्येय सिद्धीस गेल्याचे साफल्य लाभले असेल. काही तरी अद्भुत घडले असेल आणि गहिवरून त्याने सहजगत्या, सायास न करता उद्गार काढले असतील, "आज माझे स्वप्न साकार झाले. मी धन्य आहे." त्या पहिल्या माणसाला ते बोलणे शोभले. त्याच्यामागून आलेल्या काहीजणांना ते शोभले. कारण ते उद्गार त्यांची प्रचीती व्यक्त करीत होते. आता मात्र वेळी-अवेळी आणि बहुधा अवेळीच हे वाक्य इतक्या वेळा वापरले गेले आहे की ते अगदी बुळबुळीत झाले आहे. झिजून-झिजून त्याच्यातील अभिप्राय नाहीसा झाला आहे. हे वाक्य आता इतके सवंग झाले आहे की कुणीही अलबत्तागलबत्ता मामुली फुटकळ दैनंदिन अनुभव सांगत असला तर त्याचे हटकून स्वप्न साकार होते. त्याला म्हणायचे असते, माझा हेतू तडीस गेला, माझा बेत सिद्धीस गेला, माझी इच्छा सफल झाली, किंवा असेच काही. असा मामुली अनुभव सांगायला स्वप्नाला आवातने पाहिजे कशाला? ज्या हतभाग्याला मामुली फुटकळ गोष्टींची स्वप्ने पडतात आणि दुसऱ्या दिवशी स्वप्न साकार झाल्याचा अनुभव व आनंद येतो, त्याचा मेंदू बिघडला आहे असे खुशाल समजावे. इतके सुंदर वाक्य तितक्याच सुंदर अनुभूतीच्या आविष्कारासाठी राखून ठेवले पाहिजे.

नंदनवनसुद्धा असेच स्वस्त झाले आहे. कालव्याचे पाणी गावात आले की लगेच तेथे नंदनवन होते. बागायतशेती उभारली गेली की झाले नंदनवन. एखादा नवा उद्योग, नवा

कारखाना निघाला की मागोमाग नंदनवन आलेच. बापडे नंदनवन!

आपण हे असे वेड्यासारखे का बोलतो? का लिहितो? साधा अनुभव, साधा विचार, साध्या शब्दात का सांगत नाही? विनाकारण अतिशयोक्ती का करतो? अतिशयोक्ती ही असत्याची धाकटी बहीण, हे आमच्या लक्षात कसे येत नाही! ऐकणाऱ्यांवर किंवा वाचणाऱ्यांवर 'इंप्रेशन' पाडण्यासाठी आम्ही असे करतो. कधी भाषा सजविण्यापलीकडे हेतू नसतो. परंतु न जाणता का होईना आम्ही असत्य बोलत असतो. आमच्या मराठीची प्रकृती तशी नाही. खानदानी हिंदीउर्दूसारखी ती सूज येऊन ऐसपैस फुगलेली नाही. आमचे रानडे सांगून गेले, "Be strong in your thoughts, not in your language." माझ्यात न्यायमूर्तींइतका संयम नाही. मी म्हणेन, "Be strong in your language to express strong thoughts but not otherwise" आमचे रानडे, टिळक, गोखले सरळ बोलत, सरळ लिहीत. मधूनमधून एखादा सुंदर विचार शब्दालंकाराने नाही तर अर्थालंकाराने नटवीत. एखाद्या देखण्या पुरंध्रीने एखाददुसराच ठसठशित दागिना घालावा तसे त्यांना ते शोभले. आगरकर पुष्कळच दागिने घालीत. परंतु त्यांच्या प्रभावी विचारांचे लावण्य त्यामुळे झाकलेले नाही.

मनातले विचार व भावना नागव्याउघड्या बाहेर जाऊ द्या, असे माझे म्हणणे नाही. विचाराला त्याच्या मापाचे आंगडे-टोपडे जरूर घाला. पण तेवढेच घाला. तुम्ही तुमच्या विचारांवर दागदागिने चढविता तेव्हा थोडा विचार करा. तो साजशृंगार विचार झाकण्यासाठी, त्याचे सत्य स्वरूप लपविण्यासाठी

चढविला जात नाहीना याची खबरदारी घ्या. अजाणतासुद्धा या अतिशयोक्तीच्या भाराने सत्य गुदमरेल.

सरळ बोला आणि सरळ लिहा. विनाकारण वाकड्यातिकड्या उड्या मारू नका. तुमच्या विचाराचा पाय लचकेल. मनात विचार येईल त्यावर फारसे संस्कार न करता त्याला प्रकट होऊ द्या. तो आपले पाहून घेईल. तो मुळातच दुबळा असला तर बाहेर पडल्यावर दूरवर जाणार नाही. पावसाळ्यातल्या किड्यांप्रमाणे जन्मताच मरून जाईल. शब्दांच्या, कल्पनांच्या आणि प्रतिमांच्या कागदी घोड्यावर त्या रडतराउताला चढविण्यात अर्थ काय? विचार प्रभावी असला तर त्याला तुमच्या प्रतिमांची गरज पडणार नाही. उलट त्या कल्पनांच्या आतषबाजीने फसगत होईल. वाचक त्या कल्पनांच्या आणि प्रतिमांच्या मोहात पडेल आणि तुमचे मनोगत तसेच ताटकळत राहील. एखाद्या राजकन्येने प्रणयपत्रिका एखाद्या चतुर ढालगज दूतीबरोबर प्रियकराकडे पाठवावी आणि प्रियकराने सपशेल त्या भवानीच्या जाळ्यात सापडावे, तसाच तुमच्या मनातल्या सत्याचा प्रकार घडेल. प्लेटोच्या सॉक्रेटिसाने कुठे आपल्या विचाराना असे नटवले? एक. एक विचार भूमितीच्या प्रमेयांप्रमाणे त्याने रोखठोक मांडला. सॉक्रेटिसाचे विचार अडीच हजार वर्षे जिवंत आहेत

ही का चा वि र
का ही वि र चा
ही का र चा वि
का ही वि र चा
ही का र चा वि
ही का वि र चा

काही विचार

.१.

काही विचार, काही तत्त्वे अमर असतात. माणसे येतात आणि जातात. एका पिढीमागे दुसरी पिढी येते. एका शतकामागून दुसरे शतक येते. पुष्कळसे बदलते. पुष्कळसे नाहीसे होते. पुष्कळसे नवे येते. परंतु काही जुने विचार अमर असतात. ते अमर असतात म्हणूनच की काय आपण त्यांच्याकडे जाण्यात दिरंगाई करतो.

.२.

पाऊस आला—पाऊस गेला

मी पावसाळ्यात कधीकधी मोटारने मुंबईस जात असतो. निघताना पुण्यास बहुधा पाऊस नसतो. पुढे जाताजाता कधी

लोणावळ्यापाशी, कधी खंडाळ्यास, तर कधी घाटात, नाहीतर खोपोलीच्या पुढे पाऊस हमखास लागतो. मी म्हणतो, "पाऊस आला, बरे का." मोटर पुढे जाते. त्या भागात पाऊस नसतो. मी म्हणतो, "पाऊस गेला, बरे का."

अगदी चूक. प्रत्यक्षात काय घडत असते? पाऊस येत नाही आणि जात नाही. जेथे पाऊस लागतो तेथे तो माझी मोटर जाण्यापूर्वी पडत होताच आणि मोटर पुढे गेल्यावरसुद्धा जितका वेळ त्याला पडायचे तितका वेळ पडणारच. जेथे पाऊस गेला असे मी म्हणतो तेथे तो आलाच नव्हता.

पाऊस आला, गेला या माझ्या जाणिवा. आणि माझे शब्द. पावसाच्या कारवाईशी त्यांचा काही संबंध नाही.

आज, काल, उद्या या माझ्या जाणिवा आणि माझे शब्द. काळाशी त्यांचा संबंध नाही. काळ आमच्या जाणिवांपासून अलिप्त आहे. त्याला मर्यादा नाहीत. काल, आज, पुष्कळ दिवस, पुष्कळ वर्षे, शतके या लहानमोठ्या तुकड्यांची ती गोधडी नाही. तो अखंड, सलग आहे. तो त्याच्यापुरता आज आहे.

...प्रेमाचे कधीकधी असेच होते, नाही का?

माधव जूलियन म्हणतात, "प्रेम होते ते निमाले." माझ्या पावसासारखेच आहे ते. मी म्हणालो, "पाऊस गेला." पण तो मुळी आलाच नव्हता तर जाणार कसा? प्रेमसुद्धा आलेच नसते पुष्कळदा. ते आले असा नुसता आपला भ्रम असतो.

उलट, दुसरा प्रकार. लोणावळ्यास नाहीतर खंडाळ्यास पाऊस लागला म्हणजे मी म्हणतो, "पाऊस आला." तो लागला म्हणून आला असे नसते. तो पूर्वीच असतो. आपल्याला लागत नाही, एवढेच. पुष्कळदा प्रेमाचे असेच होते. ते सारखे मिळत असते. परंतु अतिपरिचयाने, कधी आळसाने, तर कधी

मूर्खपणाने आपण ते ओळखत नाही आणि पत्करत नाही. एखाद्या महत्त्वाच्या प्रसंगी ते लागते आणि मग आपण डोळे उघडून म्हणतो, "प्रेम आले, बरे का."

. ३ .

वाळाचे रांगणे

लहान मूल रांगण्याचा प्रयत्न करीत असते तेव्हा त्याची धडपड आणि तारांबळ पाहण्यासारखी असते. रांगण्याची धडपड करताना मूल कधीकधी पुढे सरकण्याऐवजी मागेच थोडे जाते. त्याला ते कळत नाही. त्याला गती हवी असते. स्थिती नको असते. गती त्याला मिळते. तिच्यात त्याला साफल्य वाटते. गतीत प्रगती नसली तर नसली.

आमचे जीवन असेच मागेपुढे रांगत असते. नाही का?

ना अ द रो ति भ व
अ द रो ना व ति भ
रो ना अ द भ ति व
अ ना रो द ति व भ
द रो ना अ व भ ति
अ ना रो द भ ति व

अनादरो भवति

मला मित्रमैत्रिणी थोड्याच आहेत. इतक्या थोड्या की त्या बोटावर मोजता येतील आणि काही बोटे शिल्लक राहतील. ओळखी पुष्कळ आहेत. त्याला उपाय नाही. त्या येतात. होतात. कराव्या लागत नाहीत. टाळाव्या लागतात. मैत्रीचे तसे नाही. ती एक साधना आहे. मनोभावाने पाळायचे ते व्रत आहे. तो एक बहरलेला, आणखी बहरत चाललेला असा सुगंधी वृक्ष आहे. निष्ठेने आणि नेमाने खतपाणी घालावे लागते. वेळच्या वेळेस, जास्ती नाही. कमी नाही. जास्ती घातले तर बिघाड होतो. फार जपावे लागते. काव्यात तुम्ही काही म्हणा, पण अनुभवाने सांगतो. खतपाणी वेळेवर मिळाले नाही तर प्रेमसुद्धा सुकू लागते.

मित्रांना वारंवार भेटावेसे वाटते. आयुष्यात तोच एक मोठा विरंगुळा उरला आहे. परंतु एखाद्या कृपणाप्रमाणे मी या उरलेल्या धनाची फार कसोशीने जपणूक आणि वापर करतो. असे फार वाटते, भेटावे, सुखदुःखाच्या गोष्टी कराव्या, मनात साठले असेल त्याला वाचा फोडावी, वाचलेल्या पुस्तकांवर चर्चा करावी, मुद्दामच उलटी बाजू घेऊन वाद घालावा. आणि शेवटी हसतहसत जुळते घ्यावे. माझी लबाडी उघडकीला आली म्हणजे मित्र म्हणतात, "दादा ब्रेन-वॉशिंग करीत होते बरे का. पुढच्या खेपेला सावध राहिले पाहिजे."

नेहमीच असे वाटत असते. नेहमीच भेटावेसे वाटते. पण फार थोड्या वेळा भेटतो. वेळापत्रकच तसे आखले आहे. ते एक माझ्या जीवनाचे तंत्र झाले आहे.

सकाळसंध्याकाळ नेमाने फिरायला जातो. मित्रांची घरे येतातच. येतात म्हणजे ती जागच्याजागीच असतात. मीच त्यांच्यापाशी येतो. घर आले, खिडकी दिसू लागली, म्हणजे उलट्या दिशेला तोंड फिरवतो, पण सावकाश चालतो. थोडा नर्व्हस होतो; आणि म्हणून काठी फिरवू लागतो. काही झाले नाही अशी मनाची समजूत घालायला शीळ वाजवू लागतो. कधीकधी खिडकीकडे तिरपी नजर टाकतो. मनाला वाटत असते, कोणीतरी खिडकीत बसलेले असावे, कुणीतरी साद घालावी. म्हणावे, "दादा. या ना" आणि मग जसे काही काहीच झाले नाही, काहीच केले नाही अन् वाटले नाही अशा गंभीर मुद्रेने आपण त्या चिरपरिचित घरात प्रवेश करावा. कधीकधी मनाशी केलेला हा कट यशस्वी होतो, खरीच साद येते आणि मी ठरल्याप्रमाणे निर्विकार चेहऱ्याने आत जातो. दोनतीन मिनिटात ते गंभीर ढोंग गळून पडते आणि आमचे

सुखसंवाद सुरू होतात. पण नेहमीच असे कसे घडावे? नेहमीच नेमक्या वेळी खिडकीपाशी रस्त्याकडे नजर ठेवून कोण बसणार? मी निरुद्योगी असलो तरी ज्याला त्याला कामे आहेतच. मनातल्या इच्छा मनातच राहतात आणि मी मुकाट्याने घरावरून पुढे जातो.

हे माझे वर्म आहे. दुखऱ्या मनाचा एकीकडचा कोपरा आहे. थोडा झाकलेला आहे. तसे पाहिले तर शरमण्यासारखे त्यात काहीच नाही. पण जे अस्पष्ट आहे ते स्पष्ट करायला थोडा संकोच वाटतो. दुसऱ्यांच्या मनांच्या कानाकोपऱ्यांची विनदिक्कत तपासणी करता येते. स्वतःच्या मनाला साक्षीदाराच्या पिंजऱ्यात उभे करताना विचार पडतो. अवघड जाते.

ज्यांना रोजरोज भेटावेसे वाटते त्यांना महिनामहिना मी भेटत नाही. एक दिवशी फोन येतो, "दादा, पुण्यातच आहात का? कशात इतके गुंतलात?" कशात गुंतलो होतो हे कसे सांगू? गुंतलो होतो फोनमधल्या आवाजातच. त्या आवाजापाठीमागच्या पाशात. परंतु कबुलीजबाब देता येत नाही. ते मनात ठेवावे लागते. काहीतरी उत्तर देतो अन् कपडे घालून वाट चालू लागतो.

पुष्कळ दिवस मी असे का करतो, माझे मलाच कळत नव्हते. मन मोठे विचित्र आहे. खट्याळ आहे. एकदम पुढे आणून ठेवीत नाही. पुष्कळ दिवस अंधारातच त्याची जडण-घडण चालत असते. वळण घट्ट झाले, नीट आकार आला, म्हणजे मगच उजेडात आणते. आता विचार करण्याची, निर्णय घेण्याची सोय राहिली नसते. समोर उभे राहाते ते स्वीकारले जाते.

माझेच मन जगावेगळे आहे असा माझ्यात अहंकार नाही. मी फार पाहिले आहे. फार जाणले आहे. आणि जाणले

आहे की मी एक सामान्य माणूस आहे. इतरांसारखेच माझेही मन आहे. इतरांचे गुणधर्म, रागलोभ माझ्यातही आहेत. इतरांप्रमाणेच माझे मन वेगळे आहे, पण आगळे आहे असे मला वाटत नाही.

तिन्हाइतांनी माझ्याकडे दुर्लक्ष केले तर मला त्याचे काही वाटत नाही. कारण मीही त्यांच्याकडे दुर्लक्ष करीत आलो आहे. हा व्यवहार परस्परात ठरला आहे. परंतु ज्यांच्यावर प्रेम आहे त्यांच्याकडून दुर्लक्ष झालेले मला सहन होणार नाही. तो अनुभव मला नको आहे. तो मी कटाक्षाने टाळतो. तसे म्हटले तर ज्यांच्यावर प्रेम आहे ती माणसे माझी अवहेलना कशी करतील? परंतु मला आपले वाटत असते. आजपर्यंत घडले नाही तसे उद्या घडणार नाही कशावरून? आपण आपले जपून असावे. मन अलीकडे फार दुखरे झाले आहे. मानापमानाच्या जाणिवा तीव्र झाल्या आहेत. नुसत्या मामुली अनवधनालासुद्धा मी दुर्लक्ष समजतो आणि कष्टी होतो. आवाजात किंचित रुक्षपणा वाटला की एकदम ते खटकते. तसे पाहिले तर माणसाने अवधान तरी कितीदा आणि किती वेळ द्यावे? मधूनमधून लक्ष दुसरीकडे जायचेच. दुसऱ्यांच्याकडे जायचेच. कधी ते अंतर्मुख व्हायचे. अशा वेळी मित्राने थोडा वेळ आपल्याकडे पाहिले नाही, आपल्याशी बोलला नाही, तर विषाद मानण्याचे काय कारण? मला हे समजत नाही असे नाही. परंतु तसे वागणे मात्र जमत नाही. थोडा मित्रा आहे मी आणि पुष्कळ स्वार्थी आहे—या बाबतीत. मनाला वाटत असते, अवधानाचे केंद्र आपणच असावे. मन धोक्याची सूचना देत असते, "अरे, आज नुसते अनवधान झाले. थोडा वेळ झाले, पण झाले. खरे ना? आज अनवधान, उद्या त्याच्यापुढची पायरी, परवा

त्याच्यापुढे." हा सवयीचा प्रश्न आहे. सवय मोठी घातुक असते. गाडी चालू झाली म्हणजे चालत राहणार. वेग येणार. असे होत जाणार नाही कशावरून? आपणच सांभाळून वागले पाहिजे. कमी भेटले पाहिजे. कमी भेटतो असे मित्रांना वाटेल इतके कमी भेटले पाहिजे. त्यांना चुकल्यासारखे वाटले पाहिजे.

रोज मरे त्याला कोण रडे? रडणे केव्हातरी थांबतेच, संपतेच. मला तसे एकदाच मरायचे आहे. माझ्यासाठी कुणी रडावे अशी अपेक्षा नाही; पण रडायचेच असले तर अखेरचे रडावे. मी ऐकायला असणार नाही. रोज भेटणे नको आणि अनवधानाचा आणि अनादराचा धोकाही नको.

रोज म्हणा किंवा वारंवार म्हणा, भेटीगाठी घेणे बरे नाही. थोडा धोका आहे त्यात. माझे एक मित्र बायको माहेरी गेली म्हणजे विनोदाने म्हणत असतात, "आता मी विरहसौख्यात आहे!" हे शब्दशः घ्यायचे नाही. पण यात मोठे तत्त्व भरले आहे. विरह संपल्यावर जे सौख्य मिळायचे ते विरहसौख्य असा मी मध्यमपदलोपी समास करतो. सौख्याचा ताजेपणा, नवलाई आणि वेगळेपणा अनुभवण्यासाठी विरह हा पाहिजेच. हॅवलॉक एलिसची बायको सहा महिने ऑस्ट्रेलियात राहायची, नवऱ्याला विरहसौख्य द्यायची आणि मग सहा महिने एकत्र. मोठी शहाणी, धोरणी माणसे होती ती.

कीट्स म्हणतो, "Summer's joys are spoilt by use." खरे आहे ते. रोज गोड खाववत नाही. त्यातली गोडी जाते. रोज नित्यनेमाने पुढे येण्याइतके सौंदर्य सवंग झाले तर आधी बरे वाटेल, परंतु अतिपरिचयाने फिके वाटू लागेल. ते जसे होते तसेच असेल; परंतु मी जसा होतो तसा नसेन. एव्हरेस्ट परिश्रमाने गाठावा, थोडा वेळच तेथे थांबावे आणि खाली

उतरावे. प्रकृतीला हेच बरे असते. सौंदर्य मधूनमधूनच प्रतीत व्हावे म्हणजे सुंदर दिसेल. आपले अनवधान होणार नाही. दुर्लक्ष होणार नाही. त्याचेही होणार नाही. "Summer's joys are spoilt by use." जपून, सांभाळून, राखून उपयोग करावा, उपभोग घ्यावा.

...आणि म्हणूनच मी घरावरून जातो, परंतु घरात जात नाही. बोललो असतो ते मनात बोलतो, ऐकले असते ते मनात ऐकतो व तसाच पुढे जातो—काठी फिरवीत, शीळ घालीत.

'ण प — त प री ण'
'प ण — री ण प त'
'ण प — ण री त प'
'प ण — त री ण प'
'ण प — प त ण री'
'प ण — री प ण त'

'प ण — त री प ण'

मी ज्याला आधुनिक मन म्हणतो त्याचा जन्म प्राचीन काळी आणि आपल्या भारतभूमीतच झाला असे मला वाटते. ते मन गंगेच्या काठी ब्रह्मारण्यात ब्रह्मर्षीदेशात जन्माला आले. आधुनिक मनाचे एक ठळक लक्षण म्हणजे मोकळेपणा, स्वागतशीलता. जेथे मोकळेपण असते तेथे मला आधुनिकता आढळते. ती त्या काळी होती. आज नाही.

अलिकडच्या धांदलीच्या गर्दीच्या जीवनात मनांची दारे बहुधा बंद असतात. त्यांच्यात मोकळी हवा खेळत नाही. मनांची साफसफाई होत नाही; केरकचरा, कोळिष्टके बाहेर फेकली जात नाहीत. सारा कचरा खोल भुयारात दडवून ठेवला जातो. अलिकडची मने नाना प्रकारच्या संप्रदायांनी, परंपरांनी,

परवलांनी बांधलेली असतात. प्रत्यही वर्तमानपत्रातून, रेडिओवरून, व्याख्यानातून तेच ते शब्द व विचार कानांवर येतात आणि आपण डोळे झाकून त्यांचा स्वीकार करतो. सवयीमुळे ते विचार आपलेच आहेत असे आपल्याला वाटू लागते आणि आपण आपल्या संभाषणातून, लेखनातून तेच विचार मोठ्या आव्यतेने जगाला आपले म्हणून परत देत असतो. आपल्याला स्वतःसाठी विचार करायला फुरसतच मिळत नाही.

काही वर्षांपूर्वी मी एका अमेरिकन शेतकऱ्याची गोष्ट वाचली होती. गोष्ट मोठी सूचक व मजेदार आहे. तो शेतकरी एका खेडेगावी आपल्या शेतावर राहत होता, परंतु रोज वर्तमानपत्र वाचीत होता, रेडिओ ऐकत होता. एकदा त्या गावी काही घटना घडली. शेजाऱ्याने शेतकऱ्याला विचारले, "काय बुवा, या बाबतीत तुमचे काय मत आहे?" शेतकरी गांगरला, गोंधळला. अखेरी निरुपायाने म्हणाला, "मत? माझे मत? छे बुवा. आजचे वर्तमानपत्र अजून वाचलेच नाही." बापडा! हा शेतकरी आधुनिक जगाचा प्रतिनिधी आहे. आपण कबूल करणार नाही, पण त्या शेतकऱ्याप्रमाणेच आपण वर्तमानपत्राचे, रेडिओचे, आणि छापलेल्या पुस्तकांचे गुलाम आहोत. आधुनिक जगात वावरत असलो तरी, किंबहुना त्या जगात वावरतो म्हणूनच, आपली मने आधुनिक नाहीत.

प्राचीनकाळी मन मोकळे, अनिरुद्ध होते, कारण भोवतालचे जगच मोकळे होते. उंच उंच हवेल्या नव्हत्या. वाहनांची वर्दळ नव्हती. कर्कश आवाज नव्हते. वाटसरूंची धक्काबुक्की नव्हती, गोंगाट नव्हता आणि म्हणून मनाला हलकेफुलके नाजूक आवाजसुद्धा टिपून घेता येत होते. आणि मने त्या सूक्ष्मध्वनीच्या अंतरंगांचा अभिप्राय शोधीत असत. दूरवरचे—फार दूरवरचे,

अगदी क्षितिजापर्यंतचे—स्वच्छ दिसत असे. सूर्यनारायण क्षितिजावर डोके काढू लागला की चटकन दिसायचा आणि त्याला अर्घ्य मिळायचे. देव पृथ्वीवर वावरत. पदोपदी भेटी होत, साक्षात्कार होत. ती प्राचीन मने देवांशी हितगुज करीत. सवालजबाब करीत. देवांना जबाब द्यावे लागत. देव इतके जवळ होते.

जुने जग जीवनाला कंटाळले नव्हते. जीवन ताजे होते. वैफल्य वाटण्याइतके शिळे झाले नव्हते. मने केवळ अनुभवांवर, संवेदनांवर आणि, यातून स्फुरलेल्या विचारांवर जगत होती. उसने वापरलेले पत्करीत नव्हती. प्रत्यक्ष मुकाबले होत. संघर्ष होत. अनुभव मिळत. त्या अनुभवातून ती जुनी माणसे वाट काढीत. जुने जग जीवनवादी होते.

भगवान तथागत त्या जुन्या जगाचा प्रतिनिधी. त्याने देवांना कोपऱ्यात बसविले. त्या अनावश्यक फालतू अडगळीची जीवनमार्गात अडचण नको अशी भूमिका घेतली. तथागताने समकालीन सॉक्रेटीसप्रमाणे कोणताही शब्द, कोणताही विचार गृहीत धरला नाही. सारे घासूनपुसून, तपासून घेतले. आधुनिक मनाचे हे दुसरे लक्षण. ते अश्रद्ध असते. बुद्धीला पटत नाही ते काहीच त्याला पटत नाही.

स्वतंत्र मोकळे मन आणि बुद्धिवादी चोखंदळ मन ही आधुनिक मनाची मी व्यवच्छेदक लक्षणे समजतो. ही लक्षणे मी दोन मोजक्या शब्दात व्यक्त करतो : 'पण' आणि 'तरीपण'. शब्द सारखे दिसतात. एकाच जातीचे आहेत ते. परंतु आधुनिक मनाच्या दोन भिन्न प्रतिक्रिया त्यांच्यामधून प्रकट होतात. 'पण' बुद्धीचे स्वातंत्र्य, अस्मिता दाखवते. तुम्ही सारे असे सांगता, 'पण' माझ्या बुद्धीला ते पटत नाही. मला ते मान्य नाही.

तुम्ही असंख्य आहात. मी एकटा आहे. पण माझे मन स्वतंत्र आहे, वेगळे आहे. तुमचे म्हणणे मला मंजूर नाही.

आता 'तरीपण'. 'पण' स्वतःच्या मनाच्या स्वातंत्र्याचा दावा करते, तर 'तरीपण' दुसऱ्यांच्या मनांचा हक्क व स्वातंत्र्य मान्य करते. जो न्याय आपल्याला तोच दुसऱ्याला, प्रतिस्पर्ध्यालासुद्धा. पहिल्या मनोवृत्तीत बुद्धिवादाचा हटेलपणा आहे, तर दुसरीत मनाचे औदार्य आहे. एखादा माणूस प्रतिस्पर्धी असतो, अगदी शत्रू असतो म्हणाना. तो आपल्यापेक्षा अगदी वेगळे, अगदी उलटे सांगत असतो. त्याचा कोणताच विचार आपल्या बुद्धीला पटत नसतो. आणि तरीपण त्याला जे सांगायचे आहे ते सांगण्याचा त्याला पूर्ण अधिकार आहे, असे मानण्याची प्रवृत्ती 'तरीपण' या शब्दांनी व्यक्त होते. व्हॉल्टेअर एकदा आपल्या एका प्रतिस्पर्ध्याला म्हणाला होता, "I disagree with everything that you say, but I would rather die in defending your right to say it."

आधुनिक मनाची ही उदार वृत्ती फार दुर्मिळ आहे. या वृत्तीत अथांग सहिष्णुता आणि समजूतदारपणा आहे, खेळाडूपणा आहे. 'पण'ने व्यक्त केलेली मनोवृत्ती स्वतःची अस्मिता, वेगळेपण दाखविते, तर 'तरीपण'ने व्यक्त होणारे मन दुसऱ्यांची अस्मिता आणि वेगळेपण मोकळेपणाने मान्य करते. 'पण'ने व्यक्त होणारे मन तितकेसे दुर्मिळ नाही. कारण स्वयंकेंद्रितता आणि आत्मपर्याप्ती हे गुण दुर्मिळ नाहीत. परंतु 'तरीपण' म्हणणाऱ्या मनात मोकळेपणा, दिलखुलासपणा आणि प्रांजलपणा असावा लागतो. तो फार थोड्या महाभागांच्या वाट्याला येतो. अशा महाभागांच्या मनालाच मी 'आधुनिक मन' म्हणेन.

स स्या म र्ती पू
म स्या स पू र्ती
स्या स म र्ती पू
म स स्या पू र्ती
स स्या म र्ती पू
स्या म स पू र्ती

स म स्या पू र्ती

माझी एक खोड सांगू का ? तशी ती आता पुष्कळांना माहीत झाली आहे. नानांनी तिचा बभ्रा केला. त्यांचा तो एक थट्टेचा विषय झाला आहे. एखाद्या कादंबरीबद्दल, लघुकथेबद्दल, नाटकाबद्दल किंवा चित्रपटाबद्दल बोलणे निघाले म्हणजे योग्य स्थळी मला ते अडवतात. आणि सांगतात, "एवढे पुरे. आता तुमचे मत मात्र सांगू नका. ते मला माहीत आहे. जो चित्रपट पाहता तो तुम्हाला चांगला वाटतो. जे पुस्तक वाचता ते चांगलेच असते. तुमचे मत विचारा कशाला ?"

नानांचे हे म्हणणे मला मान्य नाही. कृष्णाने धर्माला आणि दुर्योधनाला एक कामगिरी सांगितली. धर्माला सांगितले, "या सभेत बसलेल्या माणसांतून दुर्जन असतील त्यांची यादी करून

मला दे." दुर्योधनाला सांगितले, "सभेत सज्जन असतील तेवढ्यांची यादी करून आण." दोघेही सभेत हिंडले आणि काही वेळाने हात हालवीत आले. धर्माला दुर्जन सापडला नाही, दुर्योधनाला सज्जन सापडला नाही. माझ्या लहानपणी कीर्तनकार ही गोष्ट रंगवून सांगत असत. ही गोष्ट आठवण्याचे कारण, मला म्हणायचे आहे, मी धर्मराज नाही, आणि नानांच्याप्रमाणे दुर्योधनही नाही. मला दोन्ही प्रकारची पुस्तके आणि चित्रपट आढळतात. साऱ्यांनाच मी चांगले म्हणत नाही. वाईट पुस्तकांना, चित्रपटांना वाईटच म्हणतो. बऱ्याच पुस्तकांना आणि चित्रपटांना चांगले म्हणतो, हे मला मान्य आहे.

खरे पाहिले तर ती तितकीशी चांगली नसतात. तसे पाहिले तर सर्वांगसुंदर असते काय? तसे असते तर हंसक्षीरन्याय रूढ झालाच नसता. दुधात थोडेतरी पाणी असायचेच. पुस्तक वाचताना आणि चित्रपट पाहताना मला उणिवा जाणवत असतात. परंतु नानांच्याप्रमाणे नुसते माझे डोळेच काम करीत नाहीत. मन आणि त्यातली सृजनशील कल्पनाशक्ती हमेशा कारवाई करीत असते. एखादा चित्रपट पाहू लागलो म्हणजे थोड्याच वेळात माझी कल्पनाशक्ती जे पाहतो त्याच्यापुढे जाते. चित्रपटाच्या कथानकाचा विकास पुढे कसा व्हावा, शेवट कसा व्हावा, हे माझे मन थोड्या वेळातच ठरवून टाकते. या पूर्वनियोजित संकल्पाच्या संदर्भात मी चित्रपटाचा पुढचा भाग पाहतो. तो चालू असताना त्यात ज्या घटना घातल्या नाहीत त्या घालतो. जे संवाद ज्या प्रकारे लिहिलेले नाहीत त्यांची भरपाई करतो. जे संवाद, जी चटकदार वाक्ये, कधीकधी एखादाच मार्मिक शब्द त्या चित्रपटात नसतात ते माझी कल्पनाशक्ती चित्रपट चालू असतानाच त्या त्या ठिकाणी भरीस घालीत असते.

पुस्तक वाचतांना तसेच घडते. आधी सांगून टाकतो. भलतेसलते पुस्तक मी हातात घेत नाही. वाईट म्हणण्याची पाळीच माझ्यावर फारशी येत नाही. नावाजलेल्या लेखकांची चांगली पुस्तकेच बहुधा वाचतो. परंतु अशी पुस्तके वाचताना-सुद्धा पुष्कळशा उणिवा आढळतातच. मला पाहिजे तसा कथानकाचा ओघ इष्ट मार्गाने जात नाही; एखाददुसऱ्या प्रमुख व्यक्तीचे चित्रण माझ्या मनाजोगे होत नाही; काही महत्त्वाच्या घटना परिणामकारी वाटत नाहीत. कुठे पाल्हाळ असतो. कुठे विनाकारण खंड पडलेले असतात. असे दोष पुस्तक वाचतानाच लक्षात येत असतात; परंतु नानांच्याप्रमाणे या उणिवा टिपून मी थांबत नाही. जिथे कमी दिसेल तिथे त्या त्या वेळी भर घालतो. व्यक्तींचे मनाजोगे चित्रण करतो, घटना आणि शेवट हवातसा तयार करतो; आणि हे सारे वाचन संपल्यावर नाही, अगदी वाचीत असतानाच. हा माझा मनोव्यापार न्यून ते पुरते या ज्ञानेशांच्या निर्देशाप्रमाणेच होत असतो. उणेपुरे नुसते माउलीपणे उपसाहित नाही. दुरुस्त करीत जातो. या क्रियेच्या बाबतीत मी माउलीही नसतो आणि टीकाकारही नसतो. केवळ निर्मेळ असा स्रष्टा असतो, आणि म्हणूनच भोक्ता असतो.

या माझ्या कारवाईतील एक गंमत सांगतो. चित्रपट पाहताना, पुस्तक वाचतांना मला जे नवे विचार सुचतात ते एरव्ही सुचले नसते. त्या लेखकांनी चुका केल्या म्हणूनच माझी कल्पनाशक्ती जागी झाली आणि कामास लागली. पुष्कळ वेळा ती इतकी कार्यतत्पर होते की वाचीत असलेले किंवा वाचून झालेले पुस्तक बाजूस राहाते आणि माझे मन त्या पुस्तकापलीकडे दूरवरची मजल मारते. एक बरेचसे नवे पुस्तक मनात तयार होते आणि माझ्या त्या कृतीवर खूष होऊन मी मूळच्या पुस्तकाला 'छान'

म्हणतो. असे म्हणतात, गानसम्राट रहिमतखाँसाहेब लहान मुलासारखे हट्टी होते. म्हणा म्हटले म्हणजे म्हणत नसत. मग त्यांचे लाडके भय्या छत्रे स्वतः सुरवात करीत, मुद्दाम चुका करीत. खाँसाहेब खाली पाहत बसलेले असत. त्यांना ते ऐकवत नसे. पुढे होत आणि गाऊ लागत. मला वाटते, माझ्यापरीने मी या बाबतीत रहिमतखाँ आहे.

कलेमधले दोष मला दिसत नाहीत असे नाही. ते दिसतात, परंतु स्वतः कलावंत असल्यामुळे ते दुरुस्त करीत मी पुढे जात असतो. हे असे आहे म्हणून मी जेव्हा एखादी कादंबरी, नाटक, लघुकथा, चित्रपट 'चांगला आहे' असे म्हणतो तेव्हा त्याचा अर्थ मी त्यात घातलेले पुरण जमेस धरून तो चांगला आहे असा समजावा.

माझे मन जे हे करते ते जगावेगळे नसते. सर्वच मने सृजनशील असतात. कोणतेच मन स्पंजासारखे नसते. जे आले ते कुणीच मुकाट्याने पतकरत नसते. त्याच्यावर कारवाई होते. सारीच मने जे पाहिले, जे ऐकले, त्यात भर घालीत असतात, नीटनेटके करीत असतात आणि आकार देत असतात. मनाची ही भर इंद्रियांकडून मिळणाऱ्या संवेदनात त्याच क्षणी बेमालूम सामील होते. आणि दोन्ही मिळून एकच जाणीव उत्पन्न होते. असे पाहा, आपण म्हणतो, मी झाड पाहिले. खरोखर आपण काय पाहिलेले असते ? थोडे रंग, एक आकार, आणखी थोडे काही काही. डोळ्यांचे काम एवढेच असते. परंतु त्यांच्या मागचे मन पाहिलेल्या रंगांना रूप आणि नाव देते. डोळ्यांच्या आणि मनाच्या सहकार्याने निष्पन्न झालेल्या दृश्याला आपण झाड म्हणतो. आपल्याला प्रत्यक्ष दिसते त्यापेक्षा आपण पुष्कळच पाहतो. किती पुष्कळ पाहतो हे ज्या त्या मनाच्या कुवतीवर

अवलंबून असते. प्रतिभा समर्थ असली तर ती मामुली दृश्यात सुद्धा ब्रह्मांड पाहील.

पूर्वी आमचे कवी स्त्रीचे वर्णन करायचे झाले की हटकून तिच्या डोळ्यांना कमलनेत्र म्हणायचे. (आताचे म्हणत नाहीत. आता कमळे दिसत नाहीत.) शिष्टाचारच होता तो. चारचौघांसारखे वागावे लागत असे. सारेच कमलनेत्र म्हणतात, आपणही म्हणावे; काय बिघडले त्यात; असा तो संकेत होता. ज्याने उठावे त्याने हे आणि असले कविसंकेत विनदिक्कत वापरावे, त्यात अनुभव नव्हता, कसलीच जाणीव नव्हती. नुसताच शब्द. (आता अनुभव आहेत का ? का नुसते चमत्कारिक शब्दच ? कधीकधी शब्दापलीकडे अलीकडे मला काही दिसत नाही.)

खऱ्या कवीच्या डोळ्यांना मात्र कमलनेत्र दिसले. वाल्मिकीला दिसले. कालिदासाला दिसले. त्यांच्यामागून आलेल्या अनेकांना. परंतु थोड्यांना. खऱ्या कवींचा कमलनेत्र हा प्रत्यक्ष अनुभव होता; हजारात थोड्याच डोळ्यांनी त्याना आकृष्ट केले असेल. आणि त्यांना त्या डोळ्यांत कमळे दिसली असतील. आधी डोळे दिसले, मग त्यांच्याकडे पाठ फिरवून डोके (स्वतःचे) खाजवले, त्यातून कमळे बाहेर काढली आणि त्या पाहिलेल्या डोळ्यांना चिकटवली, असा कालक्रम प्रतिभासंपन्न आणि डोळस कवींच्या बाबतीत झाला नाही. ती एकरूप अशी त्यांची संवेदना होती; तार्किक विचार नव्हता. तार्किक विचार मागून आलेल्या कविब्रुवांनी केला. उपमा, उत्प्रेक्षा हे शब्द निर्माण केले. हे फार वाईट झाले. शब्दांनी अनुभव व्यक्त करावे; अनुभवांची जागा घेऊ नये. शब्द हाती आल्याबरोबर टाकसाळ सुरू झाली. बुद्धीच्या कोलांट्या उड्या आणि शुष्क कल्पनांचा धांगडधिंगा सुरू झाला. ज्या महाभागांना पाहतापाहताच डोळ्यांत कमळे दिसली

मराठी दा. क. 94933

त्यांनी अनुमाने काढली नाहीत. नुसते स्वागतशील मनाने पाहिले. ते मन सतारीच्या ताणलेल्या तारांप्रमाणे संवेदनशील होते. आधी मूळचेच हळवे, वापरून अधिक जाणते व हळवे झालेले.

मला हे अशक्य वाटत नाही. मी स्वतःला मोठा कवी समजत नाही. तीसपस्तीस वर्षांपूर्वी कविता करणे सोडून दिले; मारून मुटकून कवितेला बेठीस धरणे मला पसंत नव्हते. राजीखुषीने नांदत होती तोपर्यंत तिला नांदवले. पुढे सोडचिठ्ठी दिली. मी कवी नसलो तरी माझे मन कवीचे आहे. कदाचित तो दत्तांचा वारसा असेल. या हयातीत फार नाही परंतु दोनतीनदा मी कमलनेत्र पाहिले आहेत. अनुमानाने नव्हे, अनुभवाने. पहिला प्रसंग तर अजून डोळ्यांसमोर आहे. ते डोळेच तसे होते. साठ वर्षे झाली परंतु अजून ते डोळे डोळ्यांसमोर आहेत. परत कधी पाहिले नाहीत. ती गरज नव्हती.

काही कथा, काही कादंबऱ्या, काही नाटके मला फार आवडतात. काही चित्रपट फिरून फिरून बघावेसे वाटतात. हे सारे मला आवडतात याचे कारण त्यांच्यावर माझ्या मनाने संस्कार केलेले असतात. या संस्कारांमुळे त्या कलाकृती माझ्या झालेल्या असतात. जे माझे झाले त्याला मी चांगले म्हटले तर त्यात बिघडले कोठे? आरोप करायचाच झाला तर आत्मश्लाघेचा करा; मताच्या सढळपणाचा आणि ढिलाईचा करू नका.

गा ज ग वे ळी ण मा से
ज गा ळी वे ग मा से ण
गा ज वे ळी ग से ण मा
ज गा ग वे ळी ण मा से
गा ज ळी ग वे मा से ण
ज गा ग वे ळी ण मा से

ज गा वे ग ळी मा ण से

या जगात मधूनमधून जगावेगळी माणसे येऊन जातात— विक्षिप्त, चक्रम, लहरी, तऱ्हेवाईक. मराठीत अनेक शब्द वापरावे लागले तरी इंग्रजीतील क्रँक या शब्दाने हे सारे गुणधर्म चांगले व्यक्त होतात. मराठीत सुद्धा वापरून वापरून एका कोणत्यातरी शब्दाला हे गुणधर्म चिकटले गेले तर मग अनेक विशेषणे वापरण्याचे कारण पडणार नाही. जगावेगळ्या माणसांची मोजदाद घेऊ लागलो तेव्हा मला आढळून आले की या प्राण्याची पैदास गेल्या शतकात महाराष्ट्रात नजरेत भरण्याइतकी झाली. या शतकाच्या पूर्वार्धातसुद्धा पैदास झाली आहे, पण थोडीच. ती नजरेत भरत नाही. वास्तविक या विक्षिप्तांना सुद्दाम पाहाण्यासाठी टेहळणी करावी लागत नाही. ते आपल्या वाटेत उभे

असतात. आपल्याला अडवतात. इच्छा असो नसो, त्यांची दखल घ्यावीच लागते. ती अवलादच आता कमी होत चालली आहे. थोडे चुकल्यासारखे वाटते मला. सारेच नाकासमोर चाललेले पाहताना कंटाळा येतो. एखादा चक्रम तिरकस चालताना, रस्त्यात आरडाओरड करताना आढळला म्हणजे जरा बरे वाटते. त्या तऱ्हेवाईकाकडे लक्ष द्यावेच लागते. ही माणसे आपल्याला थांबवतात आणि आपल्या विक्षिप्त कृतीने आणि उक्तीने काहीतरी वेगळा विचार करायला लावतात. मला तर अलीकडे असे वाटू लागले आहे की जगात जी मोठी माणसे होऊन गेली ती थोडीबहुत विक्षिप्त आणि तऱ्हेवाईकच होती. किंबहुना त्यांच्या बाबतीत मोठेपणा हा तऱ्हेवाईकपणातून निघाला होता असे म्हटले तरी चालेल.

अलीकडेसुद्धा क्वचित प्रसंगी तऱ्हेवाईक माणसे दृष्टीस पडतात. नाही असे नाही. परंतु त्यांचा विक्षिप्तपणा नजरेत भरण्याइतका विक्षिप्त नसतो. विक्षिप्त असले तरी ते बरेचसे चारचौघांसारखे वागतात आणि बोलतात. एखाद्या नटाने रंगभूमीवर यावे, आपल्या मगदुराप्रमाणे काम करावे आणि मुकाट्याने काम संपल्यावर पडद्याआड जावे, अशी त्या बापड्यांची स्थिती होते. प्रेक्षक आपल्याच नादात असतात, दुर्लक्ष करतात; टाळ्या वाजवीत नाहीत, कांदेबटाटेही फेकीत नाहीत. हल्लीचे विक्षिप्त पुरेसे विक्षिप्त नाहीत, पुष्कळ माणसाळलेले आहेत. नजरेत भरत नाहीत.

आधुनिकांकडे वळण्यापूर्वी थोडी जुन्या जमान्याकडे नजर टाकतो. त्या काळी नजरेत भरणारा, वाटेत अडविणारा आणि विचार करायला लावणारा असा एक विक्षिप्त तऱ्हेवाइकांचा राजा होऊन गेला. त्याचे नाव विसोबा खेचर. नावसुद्धा कसे विक्षिप्त आहे पाहा. नुसते नावच विचार करायला लावते. विसोबाला

जगावेगळे वागायचे होते. सरळ चाललेल्या जगाला धक्का द्यायचा होता. डिवचायचे होते. त्याने केवळ त्या काळीच नव्हे तर आजसुद्धा आततायी, अविचारी आणि धाडसी वाटेल असे आत्मप्रदर्शन केले. आत्मप्रदर्शन हा विक्षिप्तांचा एक मार्गच आहे. कधी नाट्यमय तर कधी वेडेवाकडे आत्मप्रदर्शन करूनच तऱ्हेवाईक माणसे आपल्याकडे जगाचे लक्ष वेधून घेतात. आणि थप्पड मारून काहीतरी नवे शिकवितात. विसोबांनी हेच केले. पण अगदी जगावेगळे. स्वारी वेलाशक शंकराच्या पिंडीवर पाय टाकून देवळात झोपी गेली. आजसुद्धा धाडस व्हायचे नाही. विसोबाला काय सांगायचे होते, शिकवायचे होते ? दंतकथा बाजूला ठेवली तर त्या माणसाने त्या वेळेपुरते तरी मूर्तिपूजेविरुद्ध, कर्मकांडाविरुद्ध बंड केले आणि तेही अशा तऱ्हेवाईकपणाने, असेच मला वाटते. माझ्या मते विसोबा खेचर हा विक्षिप्तांचा राजा.

गेल्या शतकात विक्षिप्तपणाला पुष्कळच वाव मिळाला आणि महाराष्ट्रात वेगवेगळ्या तऱ्हेची तऱ्हेवाईक माणसे जन्माला आली. कुणाचे कौतुक झाले, कुणाला कांदेबटाटे मिळाले. माणसे तऱ्हेवाईक असली तरी त्यांच्या तऱ्हा वेगवेगळ्या होत्या. काही निवडक नावेच मला आज आठवतात. यापेक्षा कितीतरी अधिक विक्षिप्त माणसे गेल्या शतकात होऊन गेली असतील. परंतु त्यांचा तऱ्हेवाईकपणा बहुधा घरादारापलीकडे, फार तर शेजारापलीकडे गेला नसावा. साहजिकच अशा घरगुती विक्षिप्तपणाकडे समाजाचे लक्ष गेले नाही.

माझ्या यादीत पहिले नांव महात्मा फुल्यांचे आहे. फुले धाडसी होते. जगावेगळे होते. परंतु विक्षिप्त होते असे म्हणता येणार नाही. एका महत्त्वाच्या प्रसंगी त्यांनी मुद्दाम विक्षिप्तपणाचे आत्मप्रदर्शन केले. कनॉटच्या ड्यूकसाहेबांच्या निरोपसमारंभास

फुले इतर प्रतिष्ठित निमंत्रित नागरिकांप्रमाणे गेले. परंतु खांद्यावर घोंगडे, आखूड बाराबंदी, आंखूड पंचा अशा शेतकरी वेषातच तासभर भाषण करून जे सांगता आले नसते ते या पोषाखाने डब्यूकसाहेबांना सांगितले. हिंदुस्थान सुखी नाही, बहुजनसमाज हा असा कंगाल आहे, हेच फुल्यांना सांगायचे होते. पोषाखाने ते काम केले.

माझ्या यादीत यापुढच्या जगावेगळ्या माणसांची नावे आहेत ती अशी : विष्णुबुवा ब्रह्मचारी, राजारामशास्त्री भागवत, प्रोफेसर जिनसीवाले, गोपाळराव जोशी, रेव्हरंड टिळक, इतिहासाचार्य राजवाडे, ज्ञानकोशकार केतकर. या यादीत अलीकडे होऊन गेलेल्या बाळूकाका कानिटकरांना घालता येईल. सानेगुरुजी मात्र या तऱ्हेवाईक मंडळीत येऊ शकतील की नाही याची मला शंका वाटते. गुरुजी थोडे तऱ्हेवाईक असतील, परंतु विक्षिप्त नव्हते. त्यांनी तरुणांचे लक्ष आपल्याकडे ओढून घेतले ते आपल्या अपार प्रेमसामर्थ्याने, आपुलकीने आणि सेवाधर्माने; तऱ्हेवाईकपणाने नाही.

विष्णुबुवा ब्रह्मचाऱ्यांनी अनेक वर्षे चौपाटीवर आणि अन्यत्र ख्रिस्ती मिशनऱ्यांशी मुकाबला केला. मिशनऱ्यांशी भांडले तसे स्वजनांशी सुद्धा भांडले. सभा भरवून स्वजनांच्या गैर वागणुकीबद्दल अगदी शेलक्या शब्दांत त्यांचा समाचार घेतला. मनात जसे विचार आले तसे रोखठोक भाषेत सभेत बोलून गेले. "अहो विषयलंपट लोकहो, तुमचा विचार कसा आहे ? अरे माझ्यासाठी रडाल रे, माझी आठवण कराल." असे रोखठोक बोलले. बुवांच्या बोलण्यात जरतर नसे. पुष्कळांनी त्यांच्याकडे दुर्लक्ष केले. परंतु बुवांना त्याची पर्वा नव्हती. ते आपल्या विचारात आणि कामात मस्त होते. मला वाटते, मस्तपणा हा जगावेगळ्या

माणसांचा एक गुणधर्म मानावा लागेल. त्यांचे शत्रूसुद्धा विनय, नम्रपणा, शिष्टाचार, आदब या गुणांचा त्यांच्यावर आरोप करणार नाहीत.

गोपाळराव जोशी हे जगावेगळ्या माणसांचे अगदी रसरशीत उदाहरण. भारी खट्याळ आणि उनाड माणूस. परस्परांत भांडणे लावण्यात आणि उभय पक्षांचे पितळ उघडे पाडण्यात वस्ताद. गोपाळराव नुसते खट्याळ नव्हते. त्यांच्यापाशी काही तत्त्वांची बैठक होती. अंमलबजावणी तऱ्हेवाईक होई, एवढेच. पुष्कळदा साळसूदपणे केलेली अंमलबजावणी फलदायी होत नाही. गोपाळरावासारखे खट्याळपणाने समाजाला धक्के देत देत शिकवावे लागते. गोपाळरावांना एकदा लहर आली. त्या लहरीपाठीमागे तत्त्व होते. स्वारी खिस्ती मिशनऱ्यांकडे गेली, आणि नम्र भावाने म्हणाली, "मला खिस्ती व्हायचे आहे. मला बाप्तिस्मा द्या." मिशनऱ्यांनी थोडा विचार करायला हवा होता. थोडी चौकशी करायची होती. गोपाळरावांचा इतिहास आणि स्वभाव समजून घ्यायचा होता. परंतु त्यांना घाई झाली होती. सदाशिव पेठेतला कितीतरी मोठा मासा गळाला लागला होता. धर्मांतरासाठी विनंती करणाऱ्या माणसाची धर्मशीलता, प्रांजलपणा यांचा विचार करते कोण? मिशनऱ्यांनी संगमावर गोपाळरावांना बाप्तिस्मा दिला. गोपाळराव यथाविधी यथासांग खिस्ती झाले. मिशनरी समाधानाने घरी गेले. गोपाळराव मिस्किलपणाने मनाशी हसत स्वतःच्या घरी गेले आणि दुसऱ्या दिवशी राजरोस परत हिंदुधर्मात आले. गोपाळरावांना नुसते नाटक करायचे होते, आपल्या तऱ्हेवाईकपणाचा नुसता तमाशा दाखवायचा होता, असे मला वाटत नाही. त्यांना आपल्या या विक्षिप्त वागणुकीने जगाला व विशेषतः खिस्ती धर्मोपदेशकांना दाखवायचे होते,

लक्षात ठेवा. जिनर्सावाले मवाली नव्हते. विद्वान, ज्ञानी, सत्प्रवृत्त आणि परोपकारी होते; परंतु जगावेगळे होते. अक्कलकोटचे स्वामी सिद्धपुरुष होते असे म्हणतात (म्हणजे काय?) पण जवळ दगड असत. जवळ येणाऱ्या माणसांना दगड मारीत. दगड चुकवून किंवा खावून जे जवळ यायचे त्यांचे कल्याण व्हायचे. जिन्सीवाल्यांच्या शिव्यांनी या दगडांसारखे कार्य केले की कसे ते मला माहित नाही.

केतकरांचा विक्षिप्तपणा वेगळ्या जातीचा. ती जात नक्की काय होती मला अद्याप समजले नाही. डॉक्टर गोपाळरावांसारखे खट्याळ होते, जिन्सीवाल्यांसारखे फटकळ होते, राजारामशास्त्र्यांसारखे फूटपाथवर पावभजी खाणारे होते. नुसत्या वागणुकीतच नव्हे, लेखनात आणि विचारसरणीतही खट्याळ व आडदांड होते. वागणुकीने आणि तत्त्वप्रतिपादनाने समाजाला धक्के देणे डॉक्टरांना फार आवडायचे; इतके की खट्याळ आडदांडपणा हा केतकरांच्या विचारातला आणि वागण्यातला एक आनुषंगिक परिणाम होता का ते त्यांचे उद्दिष्टच होते, याबद्दल मला अनेकदा शंका येत असे. तऱ्हेवाईकपणाच्या पाठीमागे तत्त्वांचे अधिष्ठान असणे वेगळे; आणि तत्त्वांचे झिरझिरित आवरण चढवलेला खट्याळपणा वेगळा. डॉक्टर कधी असे असत, कधी तसे. आणि ते समजणे फारसे कठीणही नसे. पुष्कळ वेळा डॉक्टरांचा विक्षिप्तपणा हा जाणूनबुजून केलेला स्टंट असे. कधी कधी तो आत्मप्रदर्शनाचा मार्ग असे.

हैदराबादच्या साहित्यसंमेलनाचे डॉक्टर अध्यक्ष होते. स्वागत मंडळाने चांगल्या अतिथीगृहात सोय केली होती. मे महिन्याचा हैदराबादचा उन्हाळा. स्वागतमंडळाचे सदस्य खांद्यांवरची उपरणी सावरीत दुपारी अध्यक्षांची विचारपूस करायला

गेले. दार उघडेच होते. स्वागतमंडळास एक जगावेगळे दृश्य दिसले. देवाने ज्या स्थितीत जन्माला घातले होते अगदी त्याच देहस्थितीत डॉक्टर चार वर्तमानपत्रे जमिनीवर पसरून त्या पथारीवर पहुडले होते.

केतकर जाणते होते. अतिथीगृहात चार माणसे आपल्याला भेटण्यास येणार हे त्यांना माहीत नव्हते असे नाही. परंतु या जगावेगळ्या आत्मप्रदर्शनाने त्यांनी हैदराबादेस आमचे लक्ष आपल्याकडे ओढून घेतले. हा शुद्ध अर्वाच्यपणा होता. तो कदाचित जाणूनबुजून केला नसेल. डॉक्टर काहीसे आदिमानव होते. आमचे उपचार-शिष्टाचार त्यांना बाधत नसत. मनास येईल तसे वागत. लोक काय म्हणतील याचा विचार करीत नसत. मनाला पटले म्हणजे मागचेपुढचे पाहत नसत. कधी मनाला तितकी सवडही देत नसत. आम्हाला साऱ्यानाच उकडत होते. सारेच हाश्श हुश्श करीत होतो. पण डॉक्टरांच्या मागे आम्हाला जाता आले नाही. डॉक्टर जगावेगळे.

राजवाडे जगावेगळ्या माणसांतले शंभरनंबरी सोने. तो अस्सल माल होता. पुरे विक्षिप्त, लहरी, तऱ्हेवाईक. जिन्सीवाल्यांप्रमाणे शिव्या देण्यात प्रवीण. आम्ही त्यांना शारदोपासक संमेलनास अध्यक्ष म्हणून बोलावले, तर 'मराठी भाषा ही मरायला टेकली आहे. ती आता मरणार' असे अशुभ भविष्य स्वारींनी वर्तविले. एक नंबरचे संशयी. जमविलेले कागद कुठे कुठे ठेवले, त्यांचे त्यांनाच माहित. कुणाला कधी सांगितले नाही.

तळेगावला झोपडी बांधून तिच्याभोवती खंदक खणून कामाला बसायचे. गनीम खंदक ओलांडून आत येऊ लागला तर त्यावर हल्ला चढवायचे. समतोल चौरस आहारावर विश्वास नव्हता. विश्वास तुपावर. आपल्या बुद्धीच्या पोषणाला ते विपुल प्रमाणात

अवश्य आहे असे मानीत. बोलण्यात फटकळ. कुणाची मुर्वत ठेवली नाही. जुने सरदारदरकदार जवळचे कागदपत्र देईनात तेव्हा संतापाने त्यांना म्हणाले, "तुम्ही मेल्यावर तुमच्या विधवा कागद वाण्याला विकतील. तेथे मी विकत घेईन. काय समजलात?" इतिहाससंशोधन जन्मभर केले. त्या संशोधनात आपल्या अप्रतिम प्रतिभेची चमक दाखवली आणि विक्षिप्तपणाही प्रगट केला. एक अस्सल चिटोरे शंभर बखरींपेक्षा अधिक मोलाचे असे म्हणायचे. परंतु आपले काही आवडते सिद्धांत प्रतिपादण्यासाठी मात्र कधी कधी सुताने स्वर्गाला जायचे.

केतकरांशी माझे मतभेद असत; पण मला केतकर फार आवडत. आमच्या बैठका खूप रंगत. बोलताना डॉक्टर आपला मुद्दा पटविण्यासाठी डोळे मिचकावीत. माझे लक्ष मुद्द्याऐवजी डोळ्यांकडेच जात असे. रंगात आले म्हणजे खालचा ओठ थोडा दुमडून हसत. भारी गोड हसत. डॉक्टर डेक्कन जिमखाना सोडून कँपांत राहण्यास गेले तेव्हा मी कारण विचारले. डॉक्टरांनी शिरस्त्याप्रमाणे डोळे मिचकावले आणि म्हणाले, "काही नाही. कँपात मटण चांगले मिळते." आणि हसले. लब्राड होते, म्हणजे लहान बाळाप्रमाणे खोडकर, वांड होते आणि थोडे वेरकेही होते. मला फार आवडत. आता तसा माणूस दिसत नाही.

ही जगावेगळी माणसे आता का दिसत नाहीत? का चमकत नाहीत? आता एखादा भरघोस मिशावाला म्हातारा लठ्ठ सोटा घेऊन सभेत का धावत नाही? आता सदाशिव पेठेत घराभोवती खंदक खणून कुणी मारका माणूस लपून का बसत नाही? आता मनात घोळणाऱ्या शिव्या कुणी उघडउघड का देत नाही? आता कुणीच अडवीत नाही, डिवचत नाही, थोबाडीत मारीत नाही.

या प्रकारांची सामाजिक गरज संपली काय? मला नाही तसे वाटत. थोड्याडीत मारणारी माणसे समाजाच्या जागृतीला नेहमीच अवश्य असतात.

गेल्या शतकात ही विक्षिप्त माणसे चमकून गेली. आता चमकत नाहीत. याचे कारण आपण शोधले पाहिजे. मला वाटते, त्या जुन्या जमान्यात समाज वेगळा होता. एका नव्या अनोख्या संस्कृतीचा एकाएकी आपल्या समाजावर जबर आघात झाला होता. काय करावे, कोठे जावे, कोणत्या देवास पुजावे, यांविषयी संभ्रम उत्पन्न झाला होता. नुसता संभ्रमच नव्हे, संघर्षही पदोपदी होत होता. त्या संघर्षाच्या खणखणाटात सुधारकी आणि सनातनी मने धारदार बनली होती. जुनी आणि नवी. समाज जुन्यालाच कवटाळून बसला होता. आणि नव्या विचारांकडे पाहात नव्हता. दखल घेत नव्हता. अशा वेळी नव्या वाटा नव्या प्रकाराने समाजाला दाखविण्यासाठी ही जगावेगळी माणसे पाहिजे होती. ती त्याला मिळाली. समाज शतकानुशतके रुळलेल्या चाकोरीतून चालत होता. चाकोऱ्या इतक्या खोल गेल्या होत्या, की चालणाराला डावीउजवीकडचे दिसत नव्हते. अशा वेळी एखादा फुले, एखादा राजारामशास्त्री भागवत चाकोरीच्या बाहेर पडून नव्या वाटा तऱ्हेवाइकपणाने दाखवू लागला. विरोध खूप झाला. तो अपरिहार्यच होता. सनातन्यांच्या विरोधाला टक्कर देण्यातच या जगावेगळ्या माणसांचे आगळेपण उफाळून आले.

आताचा समाज वेगळा आहे. खोल गेलेल्या चाकोऱ्या नाहीत. सारे सपाट आहे. चहूकडचेच दिसते म्हणून कुणीकडेच विशेष लक्ष नसते. गेल्या शंभर वर्षांत समाजाने पुष्कळच वैचारिक आणि सांस्कृतिक प्रगती केली आहे. पुष्कळच सुधारणा

पचविल्या आहेत. वैचारिक संघर्ष फारसे उरले नाहीत. पटले नाही तरी गप्प बसण्याची सवय समाजाला लागली आहे. विक्षिप्त माणसांना विक्षिप्तपणा करण्याची फारशी सोय राहिली नाही. नवे विचार सगळे संपले आहेत असे नाही. ते कधीच संपत नसतात. परंतु गेल्या शतकातील माणसांप्रमाणे त्या विचारांविषयीच्या आमच्या प्रतिक्रिया स्पष्ट, निश्चित व धारदार नसतात. मने बोथट झाली आहेत. विरोध करीत नाहीत. विरोध करण्याइतकी मनात आच नाही. आम्ही उदार झालो आहोत. पण ते औदार्य बेजबाबदार आणि आळसू आहे. "तुम्हांला त्या वाटेने जायचे आहे ना? आमचे काही म्हणणे नाही. खुशाल जा बापडे. That is your funeral" आम्ही असे म्हणतो आणि आळसाने जांभई देतो. आता राष्ट्रीय सभेचा मांडव जाळण्यास निघणारा श्रीधर दाते उपजत नाही. आता डिवचणारे दिसत नाहीत; कारण डिवचले जाण्यासारखे कुणी आढळत नाही. या आळशी समाजात एखादा तऱ्हेवाईक, जगावेगळा माणूस उत्पन्न झाला आणि आपली कारवाई करू लागला तर एक तर उदासीनतेने त्याची उपेक्षा होईल किंवा सवंग सहिष्णुतेने त्याच्याकडे कानाडोळा होईल.

...कुणी सांगावे? आम्ही माणसेच आहोत. आम्हाला मने आहेत. त्यांत भलेबुरे विचार येतातच. आज नाही उद्या त्या विचारांत झगडा होणार नाही असे नाही. कुणी सांगावे? अजून जगावेगळी माणसे येतील. काही अर्वाच्य बोलतील. काही अचाट करतील. दोन्ही खांदे धरून आम्हांला गदगदा हलवतील. आम्हांला उदासीन राहणे मग जमणार नाही, परवडणार नाही. आम्ही कदाचित न ऐकलेले ऐकू आणि कुणी सांगावे, जागे होऊ—कदाचित.

म ह तो ब न के चु
ह म न ब चु के तो
म ह तो ब न के चु
न ब चु के तो ह म
म ह तो ब न के चु
तो ह म न ब चु के

ह म तो ब न चु के

हिंदी मुलखांत 'बनचुके' ची लोककथा फार लोकप्रिय आहे. चार माणसे जमली, गप्पागोष्टींना रंग चढला म्हणजे कशावर तरी वादविवाद सुरू व्हायचाच. अशा प्रसंगी एखादा वर्दळीवर येतो, हुज्जत घालतो. आपलेच म्हणणे खरे असा हट्ट धरून बसतो. इतर मंडळी त्याला गप्प करण्याकरिता मिस्किलपणाने "ठीक आहे तुझ्या कोंबडीचे तीन पाय. कबूल. मग तर झाले?" असे म्हणतात. कोंबडी कोणाची झाली तरी तिला पाय दोनच असणार. परंतु त्या भांडखोर इसमाच्या कोंबडीला एक जादा पाय बहाल करून त्याचे तोंड बंद करतात. ही मात्रा लागू पडली नाही तर लोककथांच्या बटव्यातून दुसरी काढतात. आणि वर्दळीवर आलेल्या इसमाला, 'तुम तो बनचुके हो'

असे सुनवतात. बहुधा ही मात्रा लागू पडते. बनचुका खजील होतो आणि तोंड मिटतो.

बनचुक्याचा किस्सा असा आहे. ऐकण्यासारखा आहे. ब्रह्मदेव सृष्टीची पैदास करीत होता. त्याची टाकसाळ सुरू होती; जीव, जंतु, लहानमोठे प्राणी, पक्षी भराभर पैदा होत होते आणि ब्रह्मदेवाचा निरोप घेत होते. ब्रह्मदेव त्यांना आशीर्वाद देऊन, 'बेटा, आगे बढो' असे उत्तेजन देत होता. निर्मिती पुष्कळ झाली, अनेक प्रकारची झाली. परंतु ब्रह्मदेवाचे समाधान झाले नाही. तोपर्यंत निर्माण केलेल्या जीवांपेक्षा सर्वांगसुंदर असा प्राणी उत्पन्न केल्याखेरीज ब्रह्मदेवाला भाकर गोड लागेना. ब्रह्मदेव सरसावला. उद्योगास लागला. परंतु सुरुवात करण्यापूर्वी हाताशी असलेल्या चिखलाचा एकेक गोळा हातात घेऊन त्याने ते गोळे गमतीने कसेतरी एकावर एक टाकले. जशी लहर येईल तशी चिखलफेक केली. ती नुसती गंमत होती. सृजनापूर्वीचा तो खट्याळपणा होता. या अस्ताव्यस्त चिखलफेकीला इतका वेडावाकडा आकार आला की तो पाहून ब्रह्मदेवाला सुद्धा हसू आले. तो सारा चिखल परत गोळा करून सर्वांगसुंदर प्राणी निर्माण करण्यापूर्वी ब्रह्मदेवाच्या डोक्यात एक खट्याळ विचार आला. या विचित्र आकारात जीव घातला तर ते ध्यान कसे चालेल, कसे बोलेल? थोडी गंमत तर पाहावी, असा ब्रह्मदेवाने मनसुबा केला आणि पटकन त्या वेड्यावाकड्या आकारात प्राण घातला. प्राण घातल्याबरोबर तो आकार प्राणी झाला आणि चालू लागला. ब्रह्मदेवाने त्याला हटकले; म्हणाला, "अरे, थांब, घाई करू नकोस. मी नुसती ही गंमत केली. मला तुला एक सर्वांगसुंदर असा प्राणी करायचे आहे. ती कारवाई अद्याप होणे आहे. ही नुसती प्रास्ताविक चिखलफेक होती." परंतु तो प्राणी हटेल

अवलादीचा होता. त्याला ब्रह्मदेवाचे म्हणणे पटले नाही. आपण स्वयंपूर्ण आणि सर्वांगसुंदर आहोत अशीच त्याची खात्री होती. ब्रह्मदेवाला त्याने जबाब दिला, "छे. छेः मी तर आता निर्माण झालो आहे. काही उणे नाही. सर्वांगसुंदर आहे. हम तो अब बन चुके!" ब्रह्मदेव काकुळतीला आला. समजूत घालू लागला; "अरे, माझ्या लेका, तू बनला नाहीस. चुकतोस तू. तू बनचुका नाहीस." परंतु त्या प्राण्याचे आपले एकच, "हम तो बनचुके. हम तो बनचुके." ब्रह्मदेव झाला तरी त्याच्या सहनशक्तीला मर्यादा आहेच. तो कंटाळला आणि ओरडून म्हणाला, 'बनचुके तो बनचुके. जा लेका. जगात जा आणि उंट हो.' उंटाची उत्पत्ती अशी चिखलफेकीतून झाली.

आपण उंटाप्रमाणे बरेचसे बनचुके आहोत. आपल्यामधील चुका आपल्याला दिसत नाहीत. आपल्यातील उणिवा आपण कबूल करीत नाही. पांघरूण घालतो. हुज्जत घालतो. मला हा बनचुकेपणा इतिहासाच्या संदर्भात विशेष जाणवतो. आपण आपल्या इतिहासाकडे बऱ्याचशा अद्भुतरम्य वृत्तीने आणि इच्छापूर्तीच्या दृष्टीने पाहात असतो. सत्यापेक्षा प्रतिष्ठेकडे आपले विशेष लक्ष असते. इतिहासात आपल्या पूर्वजांनी केलेल्या चुका आपल्याला दिसत नाहीत. लढायांत आपल्या बापजाद्यांचे कैकदा पराभव झाले; किंबहुना परचक्र यावे आणि त्याच्यापुढे आम्ही हार खावी असाच आमचा आजवरचा इतिहास आहे. शत्रूला आम्ही चांगलेच खडे चारले असे क्वचितच घडले असेल. आमचा इतिहास हा पराभूतांचा इतिहास आहे; हे सत्य कटु असेल तरी आम्ही कबूल केले पाहिजे. आणि शहाणपणाने नवे धडे घेतले पाहिजेत. इतिहासाच्या परिशीलनाचे हेच खरे उद्दिष्ट आहे.

युद्धात पराभव झाले हे कबूल करावेच लागते. ते सत्य डावलता येत नाही. तेथे गडबड चालत नाही. परंतु या पराभवात सुद्धा आमचे नाक वरच होते असा आम्ही दावा करतो. जय आमचाच होता, विजयश्रीची माळ अगदी आमच्याच गळ्यात पडण्याच्या बेतात होती; परंतु कधी हत्ती उधळला; कधी धान्याऐवजी किंवा दारूगोळ्याऐवजी मिठाची पोती आली, कधी एखाददुसरा राजपुरुष गोळी लागून मेला, त्यामुळे अखेरीस आमचा पराभव झाला. पराभव अशा आणि एवढ्याच कारणांमुळे होत नसतात. ज्या गोष्टींमुळे युद्धांत जय मिळतात त्याच गोष्टींच्या अभावामुळे पराभव होतात. सेनापती कुशल, धाडसी, रुबाबदार व थंड डोक्याचा असावा लागतो. आमच्या सेनापतींत कधी या गुणांची उणीव असे. कधी शत्रुपक्षाचा सेनापती या बाबतीत वरचढ असे. जुन्या काळी शिपाईगिरी हा कायमचा आणि एकमेव असा कोणाचाच उद्योग नव्हता. खड्या फौजा नव्हत्या. त्या आयत्या वेळी जमवाव्या लागत. तथापि याच काळी जर कुणापाशी खडी तयार अशी फौज असली तर तिच्या तयारीपुढे दुय्यम धंदा (side occupation) म्हणून शिपाईगिरी करणाऱ्या आमच्या फौजेचा निभाव लागत नसे. वैयक्तिक पराक्रमाला आणि सांघिक धाडसाला महत्त्व नव्हते असे नाही. परंतु शिस्तीत लढणाऱ्या आणि जास्त प्रभावी हत्यारे वापरणाऱ्या शत्रूपुढे हे कौतुक करण्यासारखे पराक्रम फुकट जात. अग्नीचा वर्षाव करणाऱ्या तोफांवर घोडदळ घेऊन कोसळून पडणारा आणि या तोफांना खिळे ठोकणारा फक्त एकच धाडसी, आततायी पण यशस्वी सेनापती मराठ्यांत जन्मला. तो यशवंतराव होळकर होता.

१५२६ पर्यंत हिंदुस्थानला तोफा माहीत नव्हत्या. बाण,

भाले, तलवारीवरच काम चाले. या हत्यारांचा दूर अंतरावरून लढताना फारच थोडा उपयोग होई. भाल्यांचा प्रभाव पडण्यासाठी घोडी बेफाम सोडून गनिमावर तुटून पडावे लागे. या घोडदौडीच्या भालेराईत मराठ्यांचा हात धरणारा कुणी नव्हता. परंतु या अशा कोसळून पडण्याचा तेवढ्यापुरता उपयोग होई. शत्रुपक्षाचा सेनापती परत जमवाजमव करून उठाव करी.

अगदी आसईच्या लढाईपर्यंत मराठ्यांच्या हत्यारांत गोफणी, बाण, भाले यांचाच विशेष भरणा होता. आमच्यापाशी तोफा-बंदुका आल्या त्या कवायती कंपूंच्या हाती गेल्या. या कंपूंचे प्रमुख गोरे किंवा गोऱ्यांच्या तालमीत तयार झालेले परप्रांतीय उपरे असत. कंपूंत भरणा पुरभय्यांचा आणि मुसलमानांचा. यांना महाराष्ट्राविषयी, भगव्या झेंड्याविषयी, मराठ्यांविषयी कसलाच आपलेपणा वाटत नसे. त्यांची निष्ठा कंपूंवरील अंमलदारांवर, मराठ्यांच्या सेनापतीवर नसे. इतर मराठा हाशम शिलेदारांपेक्षा यांचा तनखा मोठा. त्यांच्या अंमलदारांचा दिमाख व बडेजाव मोठा. महादजी शिंद्याने तर या अंमलदारांना मोठमोठ्या जहागिऱ्या दिल्या. त्यांच्या उत्पन्नातून ते कंपू चालवीत. धनी जबरदस्त नसला तर कंपूवाले वेळेवर कामास येत नसत. शिरजोर झाले होते. अखेरच्या पडत्या काळात स्वतंत्रच बनले होते. इंग्रजांशी लढण्याचा प्रसंग आला तेव्हा मराठ्यांचे अन्न खाल्लेले गोरे कंपूवाले अडले. कुणीतर फितूर झाले. त्यांना शेरास सव्वा शेर फक्त यशवंतराव होळकर भेटला. पदरचे गोरे गोलंदाज इंग्रजांशी लढण्यास तयार होईनात तेव्हां यशवंतरावाने साऱ्यांना कैद केले आणि त्यांच्या मुंड्या छाटल्या. त्या उपऱ्या शिरजोर अडदांडांचे दुसऱ्या कुणीच पारिपत्य केले नाही. सारांश, तोफा-बंदुका मराठ्यांच्या हाती आल्या, त्या या उपटसुंभ परक्यांच्या

हाती राहिल्या. गोलंदाजी हे एक विशिष्ट कसब व तोफाबंदुका ही विशिष्ट साधने. ती विशिष्ट वर्गाच्याच हाती असायची, अशी युद्धकलेतील वर्णव्यवस्था आमच्या घातास कारणीभूत झाली. आम्ही पोर्तुगीज व इतर गोरे देतील त्या, त्यांना नको असलेल्या, तोफाबंदुकांवरच भिस्त ठेवली. आम्ही स्वतःचे कारखाने फार उशिरा काढले. त्यांचा उपयोग झाला नाही.

सारांश, मराठमंडळात युद्धाच्या बाबतीत पुष्कळच उणिवा होत्या. आणि चुकाही पुष्कळ झाल्या. एखाददुसऱ्या अपघाती घटनेने मोठ्या युद्धात पराजय होत नाहीत. पराभवांना अनेक कारणे लागतात. त्या सर्वांचा कमीजास्ती प्रमाणात प्रभाव पडतो.

...अलेक्झांडरने पुरूचा पराभव केला. पुरू पराक्रमी होता. वैयक्तिक पराक्रमाच्या बाबतीत भारतीय योद्धे आणि सेनापती कुणालाच कधी हार गेले नाहीत. (कदाचित ही माझी इच्छापूर्ती असेल). पुरू पराक्रमी असला तरी त्याच्या अंगात अलेक्झांडरची कुशलता नव्हती. अलेक्झांडरचा अर्धे जग जिंकताना मिळालेला अनुभव नव्हता. सेनापतीस अवश्य ती जागरूकता नव्हती. सिंधु पुरूच्या चांगल्या परिचयाची. अलेक्झांडरला अपरिचित. परंतु अलेक्झांडर चांगला उतार पाहून पुरूच्या मुक्कामाच्या उत्तरेस नदीपार झाला. त्याने अचानक हल्ला केला; पुरू शौर्याने लढला तरी त्याचा त्या माऱ्यापुढे टिकाव लागला नाही. प्रश्न असा आहे की पुरूने अलेक्झांडरला अचानक हल्ला करण्याची संधि का दिली ? दुसरी गोष्ट अशी की ग्रीक फौजा एक विशिष्ट अशी सघन रचना करून पुढे येत आणि लढत. माणसे घायाळ झाली, कामास आली तरी रांग अढळ राहात असे. या शिस्तवार रचनेच्या सैन्याच्या चालीपुढे आणि माऱ्यापुढे विस्कळित सैन्याचे काहीच चालत नसे. सिंधूकाठी आमचा पराभव झाला तो

शत्रूच्या सेनापतीच्या कौशल्यामुळे, त्याच्या विशिष्ट सैन्यरचनेमुळे आणि शिस्तीमुळे. फालतू अपघाती कारणामुळे नव्हे.

पानिपतचे युद्ध घ्या. या युद्धावर अनेकांनी अनेक ग्रंथ लिहिले आहेत. अलीकडे शास्त्रीय दृष्टीने वस्तुनिष्ठ इतिहास लिहिण्याची प्रवृत्ति वाढत असल्यामुळे पानिपतच्या पराजयाची मीमांसा मुद्देसूदपणानें होत असते; तथापि आत्मगौरवाने व देशभक्तीने प्रेरित झालेले लेखक आणि वक्ते पानिपतच्या पराभवावर शक्य तेवढा सफेता चढवतात. दुपारपर्यंत जीत आमचीच होती आणि शेवटी आमचीच जीत झाली असती. परंतु विश्वासरावला गोळी लागली. भाऊसाहेब हत्तीवरून खाली उतरले आणि घोड्यावर स्वार झाले. सैन्याला दिसेनासे झाले. यांमुळे आमचा पराभव झाला. बाकी जीत आमचीच. शिवाय असे पाहा, जय मिळाला असला तरी अब्दालीचे सपाटून नुकसान झालेच की नाही ? त्याला पुढे वर डोके काढता आले नाही. असे आमचे स्वप्नरंजन चालते. अब्दालीला वर डोके काढता आले नाही, हे खरे नाही. आम्हालाच वर डोके काढता आले नाही. आमची उत्तर हिंदुस्थानात नाचक्की झाली. थोरले माधवराव आणि महादजी शिंदे या शेवटच्या वीरपुरुषांना पानिपतपासून सुरू झालेली पीछेहाट फारशी थांबविता आली नाही. पुढे काही जय मिळाले, मुलुख मिळाला; लूट मिळाली. तरी आमचे नीतिधैर्य ढासळले ते परत उभे राहिले नाही. पानिपतला मराठ्यात जो फुटीरपणा, एकजुटीचा आणि शिस्तीचा अभाव उघडकीस आला तो पुढे वाढतच गेला.

पानिपतला मराठ्यांची थंड डोक्याच्या, सर्वांना सांभाळून कामास लावणाऱ्या आणि सर्वांवर वचक ठेवणाऱ्या अशा एका असामान्य सेनापतीशी गाठ पडली. शेजवलकरांनी

अब्दालीला अफगाणांचा शिवाजी म्हटल्याबरोबर आमचे डोके फिरले. अब्रह्मण्यम् अब्रह्मण्यम् अशी ओरड झाली. ज्याप्रमाणे शिवाजीमहाराजांनी महाराष्ट्र हे राष्ट्र निर्माण केले त्याचप्रमाणे अब्दालीने अफगाणिस्तानाची निर्मिती केली. अब्दाली येईपर्यंत अफगाणिस्तान नावाची वस्तूच नव्हती. ती एक भौगोलिक संज्ञा होती. देश होता पण राष्ट्र नव्हते. देशाचा काही भाग इराणच्या साम्राज्यात तर काही भारतात आणि काही मध्य आशियातील सत्ताधीशांकडे, अशी तोपर्यंत फाळणी झाली होती. अब्दालीने त्या पांगलेल्या भागांना एकत्र केले आणि एक नवे राष्ट्र निर्माण केले. त्याला शिवाजीमहाराजांची उपमा देण्यात काय चूक आहे? उपमा ही कधीच सर्वोपमा नसते. दोन वस्तू किंवा दोन व्यक्ती संपूर्णपणे सारख्या नसतात. काही बाबतींतच सारख्या असतात. एका महत्त्वाच्या बाबतीत हे दोघे वीरपुरुष सारखे होते एवढेच शेजवलकरांना सांगायचे होते. त्यांच्यावर रागावणे चुकीचे होते. आमच्या चुका डावलण्यासाठी आम्ही शत्रुपक्षाच्या श्रेष्ठतेकडे दुर्लक्ष करीत असतो, हेच खरे.

पानिपतला मुसलमानांनी धर्मयुद्ध मानले (ते हिंदुबरोबरच्या सर्वच युद्धांना धर्मयुद्ध समजत) आणि त्या प्रेरणेने ते लढले. धर्मासाठी लढणे हे आमच्या स्वभावातच नव्हते. मुसलमानांच्या हातून पानिपतला चुका झाल्या नाहीत असे नाही. मुसलमान पुढाऱ्यांत सुद्धा परस्परामध्ये वैमनस्य होते. परंतु मुसलमान सरदार आपल्या धर्मबांधवांपेक्षा मराठ्यांचे अधिक द्वेष्टे होते. आमच्यात असा भेदभाव नव्हता. आम्ही धर्मातीत होतो. शत्रुपक्षात आमचे पगडभाऊ होते. त्यांच्यावर आम्ही विश्वास ठेवला. त्यानी आम्हाला नुसते झुलवले. मुसलमानात परस्परांविषयी दुरावे असले तरी साऱ्यांवर बचक ठेवणारा आणि

हुकमत चालवणारा असा त्यांचा सेनापती होता. आमचा सेनापती हुकमत गाजविण्याइतका जबर नव्हता. अब्दालीच्या पुढे त्याचे व्यक्तिमत्त्व व अनुभव थिटा पडला. पानिपतला मराठे बेदिल होते. काहींचे लढण्याकडे फारसे लक्ष नव्हते; काही लढलेच नाहीत.

युद्धाचा विचार करताना या सर्व गोष्टींचा विचार केला पाहिजे. एखाददुसऱ्या गोष्टीला भलते महत्त्व देऊ नये. आपल्या उणिवा तपासल्या पाहिजेत, पतकरल्या पाहिजेत. आपल्या चुकांपासून धडे घेतले पाहिजेत. इतिहासाचा हाच संदेश आहे. तो आम्ही अजून मानीत नाही; त्याच त्या चुका करण्यास प्रवृत्त होतो. आणि भूतकाळाकडे बनचुकेपणाने पाहतो.

बनचुक्यांना भविष्य नसते !

व र न व दे का शा म ल जी ?
र न व दे व का ल शा जी म ?
दे व र न व का जी म ल शा ?
न र व दे व का शा ल म जी ?
र व न व दे का म शा जी ल ?
व दे र न व का शा ल म जी ?

नवरदेव का मशालजी?

सुमारे पस्तीस वर्षांपूर्वी कलकत्त्यास कविवर्य रवींद्रनाथ टागोर यांच्या एकाहत्तराव्या वाढदिवसानिमित्त एक टोलेजंग सत्कार-सप्ताह साजरा झाला. महाराष्ट्र साहित्य परिषदेचा प्रतिनिधि म्हणून महाराष्ट्रातर्फे कविवर्यांचा सत्कार करण्यासाठी त्या समारंभाला मी गेलो होतो. प्रेसिडेन्सी कॉलेजचे प्राचार्य सेन यांनी माझी कविवर्यांशी गाठ घालून दिली. टागोरांनी मला विचारले, "तुम्ही कोणत्या भाषेत बोलणार?" मी म्हणालो, "मराठीत." टागोर म्हणाले, "मला मराठी येत नाही. तुमचे भाषण मला समजणार नाही. तुम्हाला मी उत्तर कसे देऊ?" मी म्हणालो, "मला बंगाली बोलता येत नाही आणि बोललेले समजत नाही. गेले तीन दिवस मी मुकाट्याने बंगाली भाषणे

ऐकत होतो. आपण कृपा करून पाच मिनिटे माझे मराठी ऐका. आपण साताऱ्यास होता. शिवाय आपण तुकाराम वाचला आहे असे ऐकतो. तुकाराम ज्याला समजतो त्याला मराठी समजणारच. तथापि मी आपली अडचण दूर करतो. माझे भाषण मी लिहून काढतो. जवळजवळ सर्व संस्कृत. बोलण्यापूर्वी आपल्याला ते देतो." टागोरांनी ही व्यवस्था मान्य केली. "श्रीशिवछत्रपतींच्या आणि तुकाराममहाराजांच्या महाराष्ट्रातर्फे कविवर्यांचा सत्कार करण्यासाठी मी आलो आहे," असे मी प्रस्तावनेतच दणकावून दिले. माझे ते संस्कृतप्रचुर मराठी श्रोत्यांना समजले असे दिसले. शिवछत्रपतींचे नाव कानी येताच सभागृहात टाळ्यांचा गजर झाला, आणि सहस्र बंगाली कंठांतून 'साधु साधु' हे उद्‌गार निघाले. बंगालचे शिवछत्रपतींवर तसेच असीम प्रेम आहे. मराठा खंदक त्याच्या आड आला नाही. टागोरांनी फार सुंदर उत्तर दिले. शिवछत्रपतीचा आवर्जून उल्लेख केला. आणि वंगभंगापासून बंगालने शिवप्रभूचा अनेक प्रकारे कसा गौरव केला हे श्रोत्यांस सांगितले.

मला सांगायचे होते दुसरेच. नमनालाच तेल थोडे जास्ती गेले. आता निरूपणाकडे वळतो. प्राचार्य सेनांच्या कृपेमुळे समारंभानंतर टागोरांना भेटण्याची मला संधि मिळाली. आदल्या रात्रीच टागोरांच्या वाड्याच्या अंगणात बसून मी टागोरांचे 'नटीर पूजा' हे नाटक पाहिले होते. टागोर पूर्वी आपल्या नाटकात काम करीत असत. वृद्धावस्थेमुळे आता ते श्रोत्यांमध्ये बसून आपल्या विद्यार्थ्यांचे कौतुक करीत होते. टागोरांच्या नाटकांत नेपथ्यरचनेला निदान पस्तीस वर्षांपूर्वी तरी विशेष महत्त्व नव्हते. आमच्या संभाषणात नेपथ्यरचनेबद्दल गोष्ट निघाली. टागोरांचे नेपथ्याबद्दलचे मत विचार करण्यासारखे होते.

ते म्हणाले, "नेपथ्याला मी अगदी वेताचे महत्त्व देतो. माझी काही नाटके उघड्यावर नुसत्या झाडांच्या पार्श्वभूमीवर मी करतो. अलीकडे आमची रंगभूमी नेपथ्यरचनेच्या बाबतीत वास्तवाची हुबेहुब नक्कल करू लागली आहे. मला हे योग्य वाटत नाही. बाहेरचे जग जसेच्या तसें रंगमंचावर उभे करण्याकडे प्रवृत्ति वाढत आहे. घरासारखे घर, झोपडीसारखी झोपडी, घराचा दिवाणखाना अगदी जसाच्या तसा. त्या दिवाणखान्यात अगदी खरेखुरे फर्निचर, फोटो. याप्रमाणे बाहेरचे वास्तव जग रंगभूमीवर उभे करण्यात येऊ लागले आहे. प्रेक्षकांच्या कल्पनाशक्तीसाठी काहीच शिल्लक ठेवायचे नाही असा या लोकांचा विचार दिसतो. नेपथ्यरचना ही एक दुय्यम बाब आहे. ते एक साधन आहे. त्याला फारसे महत्त्व देऊ नये. विशेषतः नेपथ्य नाट्यवस्तूच्या आणि नटांच्या कौशल्याच्या आड येता कामा नये. ते निवडक माफक आणि सूचक असावे. नुसत्या पांढऱ्या पडद्यावर सुद्धा नाटक करून दाखविता येईल. पूर्वी तसेच करीत असत. नाटक प्रभावी असले आणि नट समर्थ असले तर प्रेक्षकांचे लक्ष नाटकाकडेच गुंतून राहील; पांढऱ्या पडद्याकडे वळणार नाही. वळलेच तर त्या पडद्यात प्रेक्षकांच्या कल्पनेला जंगल, बगीचा, घरें, रस्ते सारे काही दिसेल."

टागोरांचे हे विचार पस्तीस वर्षांनंतर जसे आठवले तसे सांगितले आहेत. सांगताना थोडाबहुत माझा मीठमसाला त्यात घातला गेला नसेल असे खात्रीने सांगवत नाही. आठवणी फसव्या असतात. बरीच वर्षे झाली म्हणजे दुसऱ्यांचे आणि आपले स्वतःचे एकजीव होऊन जाते आणि आठवणीत आपपरभाव राहत नाही. तरी पण शब्द माझे असले तरी विचार मुख्यतः टागोरांचेच आहेत, असे मला वाटते.

मी पुष्कळ वर्षांत कलकत्त्यास गेलो नाही. अलीकडची बंगाली नाटके पाहिली नाहीत. मी असे ऐकतो की कलकत्त्याच्या रंगभूमीवर अलीकडे एक आगंतुक आणि अनिष्ट अशी गोष्ट आली आहे. ती गोष्ट म्हणजे प्रकाशयोजना. प्रकाशयोजनेला कलकत्त्याच्या रंगभूमीवर भलतेच महत्त्व देण्यात येत आहे. नाटकाची जाहिरात देताना नाटककाराच्या किंवा प्रमुख नटांच्या नावांचा उल्लेख एखाद्यावेळी होणार नाही. परंतु जाहिरातीत ठळकपणे प्रकाशयोजकाचे नाव मोठ्या अक्षरात छापले जाते. म्हणजे लग्नाच्या वरातीत नवरदेवापेक्षा मशालजीचाच बडेजाव!

मला हे अप्रशस्त वाटते. एखाद्या लग्नसमारंभाला जावे, तेथे कोचावर नटलेले वधूवर बसलेले असावेत, त्यांच्या अवतीभवती सुंदर स्त्रिया वावरत असाव्या आणि त्यांच्याकडे दुर्लक्ष करून एखाद्या दैनिकाच्या बातमीदाराने मंडपातील नुसत्या रोषणाईचे मिटक्या मारीत वर्णन करावे, त्यातलाच हा प्रकार. कलकत्त्याचे ते प्रकाशयोजक फार कुशल आहेत असे ऐकतो. आनंद आहे. ते कलकत्त्याला लखलाभ होवोत. महाराष्ट्रात त्यांना स्थान मिळू नये एवढीच परमेश्वराजवळ प्रार्थना. अहो, तिय्यम दर्ज्याच्या साधनाला महत्त्व तरी किती द्यायचे? नाट्यकलेत मानवी कौशल्यापुढे यंत्राचे कसब दिमाखाने मिरवले जाऊ नये. मशालजी तो मशालजी! त्याला काय नवरदेवाच्या घोड्यावर बसवायचे?

आपल्याकडे प्रकाशयोजनेचे स्तोम अद्याप माजले नाही. कोठे कोठे सुरवात झाली आहे असे ऐकतो. पण कोणी सांगावे? एखाद्या दिवशी सकाळी कलकत्ता मेलने धोतराचा सोगा जमीन झाडीत असलेला असा एखादा महाभाग बोरीबंदरवर टपकेल आणि हारतुरे घेऊन आम्ही तुरुतुरु चालत त्याचे स्वागत करू;

काही सांगता येत नाही. दुसऱ्यांचे उसने घेण्याचे आमचे सामर्थ्य अमर्याद आहे!

टागोरांचे म्हणणे मला पटते. नाटकात महत्त्व दिले पाहिजे नाटकाला. म्हणजे नाट्यवस्तूला–नाट्यवास्तूला. 'स्वयंवरा'त महत्त्व आधी खाडिलकरांना, मग बालगंधर्वांना, मग तिरकब्बाला, मग मखमली पडद्याला. पहिला मानाचा टिळा नाटककाराला, दुसरा नटाला, मग नेपथ्य, मग प्रकाशयोजना.

या सर्व बाबी साहाय्यक, पोषक, आनुषंगिक असतात. मला गणपतराव जोश्यांचे शेवटचे दिवस आठवतात. माझा मुक्काम मालवणला होता. संध्याकाळी डॉ० आजगावकरांना भेटण्यास गेलो. डॉक्टरांसारखा नाटकाचा शोकी मी अद्याप पाहिला नाही. आम्ही थट्टेने म्हणायचे, 'डॉक्टरांच्या दवाखान्यात एखादा फडतूस नट आला आणि पंचम जॉर्ज बादशहा आला तर बरणी आधी त्या नटाची लागेल. बादशहाला तिष्ठत बसावे लागेल." डॉक्टर हसायचे आणि म्हणायचे, 'आहे खरे बा असे.' गेले बिचारे. परवाच वारले.

डॉक्टर मला म्हणाले, "रात्री नाटकाला येता का? थोडा वेळ बसून येऊ." मी विचारले, "कोणचे नाटक? कंपनी कोणती?" डॉक्टर खाली पाहत थोडे चाचरत म्हणाले, "हॅम्लेट, गणपतराव जोशी." मी ताडकन म्हणालो, "मग चला की. फार वर्षांत गणपतरावांना पाहिले नाही." डॉक्टर म्हणाले, "आता गणपतरावांनाच तेवढे पाह्यचे. बाकी काही राहिले नाही." मी आवेगाने म्हणालो, "मला फक्त गणपतराव पुरे आहेत."

आम्ही रात्री नाटकाला गेलो. एका फाटक्या तंबूत शिरलो. पडदे नावाचे होते. मळके फाटके. काही पडदे गहाण पडलेले. नट असेतसेच धरून आणलेले. आणि गणपतरावांनी प्रवेश

केला. चुस्त पायजमा आणि लांब सदरा. सदरा मळकाच होता. पायजम्याला इस्त्री नव्हती. पण क्षणभरच तिकडे पाहून मी दृष्टि गणपरावांच्या चेहऱ्याकडे वळवली. ती तेथेच स्थिर झाली. सारे गेले होते. जिवाभावाचे बाळाभाऊ जोग गेले होते. खोकून छातीचे खोके झाले होते. पण तो चेहरा अद्याप इतक्या वर्षानंतर सुद्धा बोलका (mobile) होता. तो आवाज अजून बुलंद होता, वाटेल तसा वळत होता, चढत होता, फिरत होता. डॉक्टर हळूच म्हणाले, "काय चलायचे का?" "छट्. बिलकुल नाही!" मी उद्गारलो, "हे परत पाह्यला मिळणार नाही. बघ्या मला." तो महाराष्ट्र रंगभूमीवर कैक वर्षे तळपलेला सूर्य अस्तास चालला होता. मला फाटके कपडे, जुना मळका सदरा दिसत नव्हता. फक्त दिसत होते गणपतराव. मनातल्या मनात त्या नटश्रेष्ठाला वंदन करून नाटक संपल्यावर मी भारावलेल्या तृप्त अंतःकरणाने बिऱ्हाडी परतलो.

गणपतरावांनी या पडत्या काळात टागोरांची पांढऱ्या पडद्यावर नाटक करण्याची अपेक्षा पुरी केली आणि आम्ही मोठ्या श्रद्धेने मान्यता दिली. त्या वेळच्या रिवाजाप्रमाणे कांदे बटाटे फेकले नाहीत. तो आमच्या हृदयसिंहासनावर तीस-पसतीस वर्षे विराजमान झालेला राजा होता. आम्ही कांदेबटाट्यांचा वापर अन्यत्र केला. पडदे चांगले होते. नेपथ्यही भपकेदार होते. कपडे झकपक होते. नव्हते फक्त नाट्य. पिटमधून, ओट्यावरून त्या खाद्य वस्तूंचा आम्ही वर्षाव केला.

अशा किती आठवणी आठवाव्या आणि सांगाव्या? अशा प्रसंगी गोविंदकवीचे बोल आठवतात,—

किति असे वीर वर्णावे। कितिजणां पवाडे गावे।
कवितेने ओवाळावे। कुणाकुणाला?

नाट्यकला हे महाराष्ट्राचे एक मोठे भूषण आहे. त्या क्षेत्रात अनेक नाटककार आणि नट—अनेक रथी, महारथी, अतिरथी—महाराष्ट्राच्या रंगभूमीवर चमकून गेले. कुणाकुणाला ओवाळावे? पंधरा दिवसांपूर्वीच माधवराव टिपणीस गेले. माधवराव म्हणजे नुसती वीज होती. पार्वतीबाईंच्या वेषात रंगभूमीवर ते विजेसारखे लवले, चमकले. "समजतात, समजतात मला ही कुचकी बोलणी" हे तिखट धारदार वाक्य माधवराव इतक्या प्रभावीपणे बोलत की गेली पन्नास वर्षे ते माझ्या कानांत घुमत आहे. 'मनोविजय' नाटकात दत्तोबा हल्याळकरांनी आपल्या बुलंद आवाजात म्हटलेले कबीराचे दोहे अजून आठवतात. केशवराव भोसल्यांची 'मूर्तिमंत भीति उभी' स्पष्ट आठवते. औंधकरांची जिजाबाईंची आणि केशवराव दात्यांची शहाजीची भूमिका अजून डोळ्यासमोर आहे. आणि बालगंधर्व—त्यांनी तर माझ्या पिढीचे जीवन समृद्ध केले आहे; ओंजळी भरभरून आनंद वाटला आहे. परंतु आज बालगंधर्वांचा तो मखमली पडदा आठवत नाही. पॅरीसहून आणलेल्या साड्या आठवत नाहीत. पावसाचा सीन आठवत नाही. ऑर्गन ऐकू येत नाही, तबला ऐकू येत नाही. फक्त आठवतात आणि ऐकू येतात त्यांची ती अमर पदे—"उगिच का कांता गांजिता?", "मधुमधुरा तव गिरा मोहना", "माडिवरी चल ग गडे",—आणखी कितीतरी. त्या जुन्या जमान्यातले मामुली तकलादी नेपथ्य आता विसरून गेलो आहे. फक्त आठवतात ती प्रभावी नाटके आणि ते प्रभावी नट!

त्या जमान्यात नेपथ्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष झाले असे म्हणता येणार नाही. अनेक कंपन्यांनी आपल्या मगदुराप्रमाणे आणि हौशीप्रमाणे नेपथ्यरचना केली. परंतु बरेचसे प्रेक्षकांच्या कल्पना-शक्तीवर सोपविले. काहीनी त्या जुन्या काळीसुद्धा अतिरेक

केला. हल्याळकरांनी, मला वाटते 'वीरतनय' नाटकात प्रत्यक्ष घोडा आणला. मुंबईच्या ग्रँटरोडवरील थिएटरमध्ये एका पार्शी कंपनीने रंगभूमीवर खरीखुरी आगगाडी आणली. एंजिन होते. मागे दोनतीन डबे होते. आत माणसे बसली होती. एंजिन भक भक करीत होते आणि एक विनोदी नट गाणे म्हणत होता, "धुवे की गाडी उडाय लिये जाय। पैसे का लोभी फिरंगी यार बाबू। जात नही देखे, जमात नही देखे। एकहीमे सबको बिठाय लिये जाय।" हे गाणे त्यावेळी फार लोकप्रिय झाले होते.

सांगायचा मतलब असा की जुन्या नाटकात सुद्धा नेपथ्याकडे लक्ष दिले होते. क्वचित प्रसंगी अतिरेक झाला असला तरी त्यावेळी नेपथ्य प्रेक्षकांच्या कल्पनाशक्तीला चालना देईल इतके सूचक असे. वास्तवाची हुबेहूब नक्कल करण्याची त्यावेळी सामान्यतः प्रवृत्ति नव्हती. आम्हाला ते पटत असे, समजत असे. आमचे लक्ष मुख्यतः नाटकाच्या रचनेकडे, विकासाकडे, पात्रांच्या कामांकडे असे. तेथे मात्र दयामाया नसे. आम्ही कडक समीक्षक होतो व नट ते जाणून असत. नटांच्या तालिमी कसून घेण्यात येत. स्पष्ट उच्चार करायला लावीत. एकएक वाक्य पंधरादा म्हणवून घेत. कंपनीत फार मोठा मान तालीममास्तरांचा. महाराष्ट्राच्या सुदैवाने कंपन्यांना सुशिक्षित सुसंस्कृत व जाणते मास्तर मिळत गेले. बालगंधर्वांनी एका नाटकात दवाखान्यातील खऱ्याखुऱ्या शस्त्रास्त्रांना रंगभूमीवर आणले. आम्ही कौतुक केले नाही. नाक मुरडले. एकमेकांना म्हणालो, "ऑपरेशन रूम आम्हाला दुसरीकडे पाह्यला मिळते. येथे आम्ही नाटक पाहायला आलोत. येथे हे कशाला?" नाटक पाहतानासुद्धा आमची दृष्टी वाङ्मयीन होती. वाङ्मयदृष्ट्या नाटक कसे आहे हे आम्ही पाहत असू, आणि नंतर कलेच्या दृष्टीने प्रयोग

कसा वठतो ते पहात असू. आम्ही वास्तव आणि कला यांच्यात आमच्या बुद्धीप्रमाणे कमीजास्ती अंतर ठेवीत होतो. नेपथ्य व इतर अवांतर बाबी नाट्यवस्तूला व कलेला पोषक असाव्यात, त्यांनी कलेची खिदमत करावी अशी आमची धारणा असे. कलकत्त्याप्रमाणे नाटकात सिनेमा घुसडण्याचा वर्णसंकर आमच्या सनातनी नाटकी वृत्तीला मानवला नसता.

आता जग बदलले आहे. जुने आचारविचार संकेत लुप्त झाले आहेत. वाङ्मय जमान्यामागेच जाणार. साहजिकच ते झपाट्याने बदलत चालले आहे. आमचा जमाना वॉल्टर स्कॉटचा. ऐसपैस. आता जीवनात आणि वाङ्मयात गति आली आहे आणि ती वाढत आहे. साहजिकच नाटकांचा मुखडा बदलला आहे. ऐसपैस पाल्हाळ नाहीसा झाला आहे. आटोपशीर रेखिवपणा येत चालला आहे. संवाद सुटसुटित व स्वाभाविक होत चालले आहेत. आत्मगते संपली आहेत आणि ते शहाणपणाचे झाले असे म्हणवत नाही. आत्मगतांना नाटकात एक विशिष्ट स्थान आहे. त्यांची गरज आहे. मनांतील विचारतरंग, मनातील विचारांची हेतूंची, मनसुब्यांची खळबळ, त्यांच्यातील गुंता आणि गर्दी रंगभूमीवर दाखविण्यास आत्मगतासारखे प्रभावी साधन नाही. मात्र ते अवश्य तेव्हाच आणि अवश्य तेवढेच वापरले पाहिजे. इलियटने आत्मगताची जागा घेण्याकरिता 'मर्डर इन् कथीड्रल' मध्ये मनातील विचारांना गुणांना हाडमासाचे पुरुष बनविले आहे. 'बाजी' या माझ्या नाटिकेत मी बाजीरावाच्या मनातील खळबळ व द्वंद्व आत्मगतांमधून दाखविले; त्याचप्रमाणे ईलियटचे अनुकरण करून बाजीरावाच्या विवेकाला त्याच्यासमोर उभे केले आहे आणि झगडायला लावले आहे.

एकंदरीत नाटक बदलले आहे, फार बदलले आहे आणि म्हणूनच जुनी नाटके 'क्लासिकल' म्हणून केली जातात आणि अगत्याने पाहिली जातात. पूर्वीचे पाच अंक, प्रत्येक अंकाचे तीन चार प्रवेश गेले. हो—गेलेच म्हणायचे. त्यांच्या जागी तीन अंकी नाटके आली. प्रत्येक अंकात बहुधा एकच प्रवेश. साहजिकच सबंध नाटक बहुधा एकाच ठिकाणी होते—घरात दिवाणखान्यात. कारण आताची नाटके सामान्यतः सामाजिक व कौटुंबिक असतात. कुटुंबातील व्यक्तींतील समस्या संघर्ष दाखविणे हे उद्दिष्ट असते. सारे नाटक दिवाणखान्यात होते. दिवाणखान्याला जिना लागतो, खिडक्या लागतात, डावीउजवीकडे दारे लागतात; कारण घरातील माणसे वेगवेगळ्या वेळी वेगवेगळ्या मार्गांनी दिवाणखान्यात येत असतात, बाहेर जात असतात. बाहेरची माणसे येत असतात. हे सारे दाखवायला अवश्य ते नेपथ्य लागते. तेथे प्रेक्षकांच्या कल्पनेवर फारसे सोपवता येत नाही. पूर्वी सोपवता येत होते. कारण प्रवेश पृथक आणि वेगळ्या पडद्यांवर असत. नुसते सूचक नेपथ्य ठेवले की काम भागत असे. सारांश, अलिकडच्या नाटकांनी अलिकडचे नेपथ्य उत्पन्न केले.

मला हे पटते. बदलत्या नाटकांबरोबर नेपथ्यही बदलले पाहिजे हे मला मान्य आहे. पूर्वी दालन, रस्ता, बाग इत्यादी चारपाच पडद्यांची आम्हाला सवय झाली होती. रंगमंचावर पडद्याशिवाय इतर फारसे नसे. दालनात राजाला बसायला एखादा कोच असायचा. सुभद्रेच्या शयनगृहात छपरी पलंग (मच्छरदाणी कायमची वर बांधलेली), बलराम-कृष्णांना बसण्यास मरहूम व्हिक्टोरिया राणीच्या अमदानीतील दोन खुर्च्या असायच्या. तिसरी मिळायची नाही. आम्हाला हे संकेत व या मर्यादा मंजूर होत्या. आमचे लक्ष नाटकाकडे असे. कृष्ण

कसे फलाणे पद म्हणतो याची आम्ही वाट पाहत असू. तो म्हणू लागला की हळूच किंवा मनात आम्ही म्हणत असू. आताच्या दिवाणखानी नाटकांच्या गरजांमुळे दिवाणखान्यात पाहिजेत त्या व नकोत त्याही वस्तु येऊ लागल्या आहेत. खुर्च्या, कोच, टेबल्स, रेडिओ, चित्रे, पुतळे, गालिचे इत्यादी इत्यादी. आता कल्पनाशक्तीला वावच लागत नाही. आमच्या दिवाणखान्यात जे असते ते सारे रंगमंचावर असते. हौशीला मर्यादा नाही. कधीकधी सामानाची गर्दी झालेली असते आणि पात्रांना जपून हालचाली कराव्या लागतात.

वास्तव नेपथ्य आता पतकरले पाहिजे. मान्य आहे. परंतु अलिकडे मला भीति वाटू लागली आहे, नाटकासाठी नेपथ्य, का नेपथ्यासाठी नाटक? हुकमत कुणाची? सासूची की सुनेची? या दिवाणखानी घरगुती नेपथ्यामुळे नाटके दिवाणखानी एकप्रवेशी एकस्थळी लिहिली जात आहेत काय? लेखकाला दुसरे प्रकार सुचतात की नाही? का या एकप्रवेशी दिवाणखानी नाटकांची फॅशन झाली आहे? आमचे लेखक कधीकधी हातपाय पसरून अनेक प्रवेशांचे नाटक लिहितात की नाही? एखाद्या मध्यवर्ती घटनेभोवती किंवा कल्पनेभोवतीच नाटक रचले गेले पाहिजे काय? दुसरे प्रकार संभवत नाहीत का? या दिवाणखानी साच्यात ऐतिहासिक नाटके कशी बसणार? इतिहासात अपरिहार्य असा कालक्रम असतो. तो नाटकात सांभाळायचा म्हणजे अनेक प्रवेश अनेक अंक आले. ते आलेच पाहिजेत. ऐतिहासिक नाटकसुद्धा एक मध्यवर्ती घटनेवर एका स्थळात घडलेले दाखविता येईल. परंतु सामान्यतः ऐतिहासिक कथानक म्हटले म्हणजे ते कमीजास्त काळात पसरलेले असायचे आणि अनेक स्थळी घडलेले असायचे. अशा नाटकात

मध्यवर्ती अशी घटना किंवा विचार असेलच असे नाही. घटना अनेक असणार आणि विचार असेल तो एकाद्या विशिष्ट ऐतिहासिक कथावस्तूचा कालक्रमांत झालेला विकास आणि परिणति. अशी नाटके एका ठराविक ठिकाणी केंद्रित होऊ शकत नाहीत. दुसरा एक नाटकाचा प्रकार, म्हणजे चरित्रात्मक नाटक (biographical play) एखाद्या प्रभावी व्यक्तीचे चरित्र इतके नाट्यमय असते की त्यावर ऐसपैस असे कालक्रमात पसरलेले नाटक लिहावे लागते. 'एब्राहम लिंकन' घ्या, 'टॉमस मूर' घ्या किंवा अलीकडे गाजलेले 'वेकेट' हे नाटक घ्या. प्रभावी व्यक्ति ऐतिहासिक असेल, धार्मिक किंवा सामाजिक क्षेत्रातील असेल किंवा मामुली एखाद्या कुटुंबात नांदणारी असेल. नाटकात तिचे जीवननाट्य व्यक्त करायचे असते. कधी संपूर्ण जीवन परंतु बहुशः जीवनातील एखादा प्रभावी भाग. या अशा ऐतिहासिक किंवा चरित्रात्मक नाटकात अनेक प्रसंग अनेक पात्रे असणार. माझ्या 'यशवंतराव होळकर' नाटकात छोटीमोठी चोवीसपंचवीस पात्रे आहेत. एका टीकाकाराने हा त्या नाटकातील दोष आहे असे म्हटले. कारण त्याला पांचसहा पात्रे असलेली दिवाणखानी नाटके पाहण्याची सवय असणार. चरित्रात्मक नाटक म्हटले म्हणजे नायकाच्या जीवनात वेळोवेळी अनेक माणसे येतात. नाटकात त्यांची दखल घ्यावी लागते. ऐतिहासिक किंवा चरित्रात्मक नाटकाप्रमाणे दुसऱ्या आणखी किती तरी प्रकारची नाटके लिहिता येतील. विशेषतः अद्‌भुतरम्यतेवर आधारलेले काव्यमय नाटक लिहिता येण्यासारखे आहे.

नाटक हा एक वाङ्मयप्रकार आहे. जीवन हे त्याचे अधिष्ठान असते. जीवन बहुरंगी बहुढंगी, संमिश्र आणि जटिल असे असते. मात्र नाट्यातील जीवन गाळीव असते. नुसते

उचलून आणलेले नसते. साऱ्याच प्रकारच्या आणि प्रतीच्या जीवनाची नाटककाराने दखल घेतली पाहिजे. मुद्दामच दखल घ्यावी असे माझे म्हणणे नाही. त्याने आपले मन आणि प्रतिभा मोकळी ठेवावी. जीवनात जेथे जेथे नाट्य आढळेल तेथून त्याचा श्रद्धेने स्वीकार करावा आणि त्या नाट्याला अनुकूल असा साचा तयार करावा. किंबहुना साच्याचा विचार नाट्याच्या साक्षात्कारानंतर करावा लागत नाही. जीवनातील जे नाट्य नाटककाराच्या प्रतिभेपुढे भासमान होते ते मुळी आपला साचा घेऊनच येत असते. ती कर्णाची कवचकुंडले असतात.

आता शेवटचा एक विचार; तो सांगतो आणि हे निरूपण संपवितो. मला तुम्हाला असे विचारायचे आहे : नाटक हे प्रयोगासाठीच लिहिले पाहिजे काय? ते प्रयोगशरण असावेच काय? नाटक म्हटले म्हणजे रंगमंच, त्यावरील पात्रे आणि साहित्य आणि समोर बसलेले प्रेक्षक, असे असलेच पाहिजे का? रंगमंचाच्या मर्यादेचा विचार न करता नाटक लिहिणे अशक्य आहे का? इंग्रजीमध्ये अशी नाटके आहेत. फार प्रभावी आहेत. ती प्रयोगशरण नाहीत. प्रयोगच उलट त्यांना शरण जातो. इलियटची काही नाटके, शॉची एकदोन नाटके, अलीकडील काही फ्रेंच नाटके अशा प्रकारची आहेत की त्यात विचारांना तत्त्वांना प्राधान्य आहे. जीवनातील गूढ समस्या, अंतर्मनातील अंधुक वासना आणि आकांक्षा, प्रतिभेचे वैचारिक आणि आध्यात्मिक उड्डाण अशा नाटकांत आपल्याला आढळते. ही नाटके आपापल्या घरी आपापल्या खोलीत आरामखुर्चीवर बसून संथपणे आणि शांतपणे वाचण्याकरिता असतात. भगवद्गीता किंवा ज्ञानेश्वरी गर्दीकरिता नाही. एकांतातल्या वाचनासाठी आणि चिंतनासाठी आहेत. काही घाडशी नाटके

याच योग्यतेची असतात. त्यांची संख्या अर्थात कमीच असणार. नाहीतरी गीता एकच आहे. ज्ञानेश्वरी एकच आहे. परंतु ती एकच आहे हे आमचे सौभाग्य आहे. मला असे म्हणायचे आहे की रंगमंचाचा, प्रयोगाचा, प्रेक्षकांच्या गर्दीचा विचार न करता वैचारिक नाटके ज्याला सामर्थ्य असेल त्याने अवश्य लिहावी. ती यशस्वी आणि प्रभावी ठरली तर महत्त्वाकांक्षी आणि ध्येयवादी संयोजक त्यांना रंगमंचावर आणण्याची धडपड करतील आणि कमीजास्त यश मिळवतील.

स ग्री चा हा म रु पु ष द ब फै ली य बा र न
चा स ग्री म हा ष पु रु फै द ली ब न र बा य
ग्री चा स पु हा म रु ष द ब फै ली र बा य न
स ग्री चा म हा रु ष पु ली ब द फै बा न र य
चा स ग्री हा म पु ष रु ब फै द ली बा य न र
ग्री चा स ष पु रु म हा द ब फै ली य बा र न

ग्रीसचा महापुरुष बदफैली बायरन

लॉर्ड बायरन १८३४ साली ग्रीसमधील मिसोलोंधी या दलदलीच्या बेटात हिवतापाने मरण पावला. इटलीमधील आपल्या विलास-मंदिरात आपल्या लाडक्या कौंटेसला, घोड्यांना, लहानमोठ्या माकडांना, पोपटांना, कुत्र्यामांजरांना आणि काही सरपटणाऱ्या प्राण्यांना टाकून, बायरन पैक्याच्या थैल्या बांधून गुलामगिरीत हतबुद्ध झालेल्या ग्रीकांचा उठाव करण्यासाठी ग्रीसमध्ये गेला होता. तरुणांना त्याने आवाहन केले,

If thou regrettest thy youth, why live ?
The Land of honourable death
Is here—up to the field
And give away thy breath.

बायरनने ग्रीसला आपला श्वास अर्पण केला. परंतु तो हिवतापाने जर्जर होऊन बिछान्यामध्येच. त्याच्या नशिबी रणांगणावरचे वीरमरण नव्हते. परंतु दिलदार ग्रीसने त्याच्या त्या आत्माहुतीची कदर केली. अपरिचित परक्या कवीवर अपरिमित प्रेम केले. बायरन ग्रीसचा वीरपुरुष. सव्वाशे वर्षे होऊन गेली. परंतु अद्याप ग्रीसने बायरनच्या आठवणी ताज्या ठेवल्या आहेत; ठिकठिकाणी त्याची स्मारके उभी केली आहेत. ग्रीसच्या प्रत्येक शहरात बायरनच्या नावाचा राजरस्ता आहे. ॲथेन्सच्या एका प्रमुख पेठेला बायरनचे नाव दिले आहे. ग्रीसमध्ये बायरन जेथे जेथे थांबला, जेथे जेथे त्याने मुक्काम केला ती स्थाने ग्रीसची तीर्थक्षेत्रे बनली. त्या त्या स्थानावर बायरनचे काहीतरी स्मारक करण्यात आले. एका आडवळणी टेकडीवरच्या मठात बायरनने फक्त दोन दिवस मुक्काम केला. मठासमोरच्या आयव्हीला 'बायरनची आयव्ही' असे नाव मिळाले. ग्रीसने मोठ्या प्रेमाने आणि श्रद्धेने त्या आयव्हीखाली शिलालेखावर ते नाव कोरले. शहरोशहरी बायरनचे पुतळे उभे राहिले. एका देशाने एका परक्या व्यक्तीवर प्रेम तरी किती करायचे?

ग्रीसने इतके प्रेम करावे इतकेच प्रेम बायरनने ग्रीसवर केले होते. त्यावेळचे ग्रीक नादान, निष्क्रिय आणि भांडखोर होते. तुर्कांच्या गुलामगिरीची त्यांना इतकी सवय झाली होती की तिची त्यांना खंत नव्हती. अशा लोकांना जागे करण्याची, स्वातंत्र्यासाठी लढण्यास प्रवृत्त करण्याची बायरनला तळमळ लागली होती. बायरनने ग्रीसवर प्रेम केले ते तत्कालीन ग्रीकांसाठी नव्हे. वाङ्मयात अमर झालेल्या ग्रीक कवींसाठी, तत्त्वज्ञांसाठी, वीर पुरुषांसाठी. ग्रीसमध्ये बायरनच्या डोळ्यांना ती अगतिक खुजी

माणसे दिसत नव्हती; दिसत होते पेरिक्लिस, सॉक्रेटिस, प्लेटो, फीडिअस, सॅफो, पार्थिनन आणि मिलो येथील व्हीनस ही अमर शिल्पे व मूर्ती घडविणारे प्रतिभासंपन्न शिल्पी. त्याला जो वारसा मिळाला होता तो ग्रीसच्या संस्कृतीचा आणि सौंदर्याचा. मन प्रभावित आणि प्रेरित झाले होते त्या संस्कृतीमुळे आणि सौंदर्यामुळे.

प्रेरणेचा विषय आणखी दुसरा होता. धुक्याच्या आणि वादळाच्या स्कॉटलंड आणि इंग्लंडमधील उदास वातावरणात बायरन वाढला होता. त्याला सुंदर स्वच्छ निळे आकाश प्रथम दिसले ते ग्रीसमध्ये. सूर्यदर्शनास पारखा असलेला तो सूर्योपासक कवी ग्रीसमध्ये सूर्याखाली सुखावला. लख्ख सूर्यप्रकाश, लिंबांची आणि संत्र्याची बनेच्या बने, मर्टल आणि आयव्हीची कुंपणे त्याला ग्रीसमध्ये दिसली. जेथवर दृष्टि पोचेल तेथवर फार दूरपर्यंत स्वच्छ मोकळे मोकळे वातावरण ग्रीसभर पसरले होते. त्या वातावरणाने त्याच्या जखमी मनाला आपलेपणाने कुरवाळले. वर आकाश आणि खाली तितकाच निळा भूमध्यसमुद्र. जिकडे जावे तिकडे हे निळे द्वंद्व. कुबेराने मूठमूठ भरून पाचू उधळावे अशी त्या समुद्रात इतस्ततः हिरवीगार छोटी छोटी बेटे विखुरलेली होती. कुठेही जा, मागे डोंगर उभा आणि पुढ्यात चमचमणारा समुद्र. ग्रीसच्या समुद्रकिनाऱ्याभर डोंगर आणि समुद्र यांच्यामध्ये लपंडावाचा खेळ सुरू होता. थोड्याथोड्या अंतरावर समुद्र डोंगराचा डोळा चुकवून आत घुसे आणि डोंगर त्याला मागे ढकली. ग्रीस सौंदर्यभूमी होती.

एक दिवस माराथानच्या पठारावर बायरन बसला होता. तो डोंगर-समुद्राचा खेळ पाहून तो प्रभावित झाला आणि म्हणाला,

The Mountains look on Marathon
And Marathon looks on the Sea;
And musing there an hour alone
I dreamt that Greece might still be free!

किती सुंदर देश! किती सुंदर वेटे! किती सुंदर, विशाल आणि चमकदार स्त्रियांचे डोळे! इतका सुंदर देश गुलाम राहणार नाही, राहता कामा नये. तो स्वतंत्र झालाच पाहिजे. त्याचा भविष्यकाळ त्याच्या भूतकाळाइतका उज्ज्वल झाला पाहिजे. आणि सूर्यप्रकाशात झळकणाऱ्या त्या पाचूच्या वेटांकडे हात उभारून बायरन् उद्‌गारला,

The Isles of Greece, the Isles of Greece
Where burning Sappho loved and sung
Where grew the arts of war and peace
Where Delos rose and Phoebus sprung
Eternal Summer gilds them yet
But all, except their sun, is set.

हा बायरन बाहेरख्याली होता. प्रिन्स रीजन्टच्या अमदानीतील तो इंग्लिश समाज बदफैली होता. कोणी कोणास दगड मारावा अशी कोणाचीच लायकी नव्हती. सरदारघराण्यात व्यभिचार बोकाळला होता. या समाजात बायरन वाढला, वावरला. देखणा होता, संभाषणचतुर होता. बऱ्यापैकी कवी होता. प्रेममार्गावरचा घाडसी पांथस्थ होता. बड्याबड्यांच्या बायका, मुली, सुना त्याच्या नादी लागल्या. त्या समाजाला ते मान्य होते. अशा बाबतीत सदाच डोळ्यांवर कातडे ओढले जात होते. बायरनने अनेक स्त्रियांवर प्रेम केले—त्याला प्रेम म्हणता येईल तर. पाच मिनिटे का असेना परंतु मनोभावाने प्रेम केले आणि दुसरीकडे वळला.

त्या बदफैली समाजात सुद्धा एक प्रकारची शिस्त होती.

व्यभिचाराचे सुद्धा संकेत आणि शिष्टाचार निश्चित होते. बायरनचे आणि त्याच्या बायकोचे पटले नाही. वेबनाव झाला. काही त्याचा अपराध होता. काही बायकोचा. परंतु समाजाने बायकोची बाजू घेतली. बायरनने आपल्या सावत्र बहिणीवर उत्कट प्रेम केले. तिला तो लाडाने ईडा म्हणायचा. समाजाने त्या प्रेमाचा विपरीत अर्थ घेतला. कदाचित ते विपरीत असेल. समाज बायरनविरुद्ध उठला. त्याची समाजद्रोह्यांत गणना झाली. समाजाने त्याला बहिष्कृत केले. समाजाला बाहेरख्याली परवडते. विवाहित स्त्रीची हातात ढाल असली म्हणजे संरक्षण मिळते. बायरनच्या हातातून ती ढाल गळून पडली. शिस्तभंग झाला. बायरन वाळीत पडला. तो दुःखी अंतःकरणाने इंग्लंड सोडून इटलीत गेला. त्या वेळचा इटालियन समाज उदार होता. नीतिमत्तेविषयी फार ढिला होता. इटलीत बायरन आपल्या लाडक्या कौंटेसच्या गळ्यात हात घालून गाडीत बसून राजरस्त्याने फिरू लागला. इटालियनांच्या कौतुकाचा विषय झाला. स्वकीयांनी टाकलेला तो तरुण आता बेफिकीर आणि बेबंद झाला.

त्या बदफैली माणसाला मन होते. मनात काही तेजस्वी विचार येत होते. ग्रीसचे स्वातंत्र्य हा असाच एक प्रबळ विचार त्या मनात आला आणि घर करून बसला. काही केल्या बाहेर पडेना. बायरनची कौंटेस रूपसम्राज्ञी होती. प्रेमव्यवहारात कुशल रंभा होती; प्रासादात नोकरचाकर होते. लाड करायला विचित्र आणि विविध प्राणी आणि जनावरे होती. परंतु ग्रीसने मन अस्वस्थ केले. बायरन सुखशय्येवरून उठला आणि ग्रीसमध्ये चालता झाला. परत आला नाही.

मी जेव्हा जेव्हा बायरनचा विचार करतो तेव्हा मला असे वाटते की आपण माणसाच्या लैंगिक जीवनाला आणि स्खलनाला

बाजवीपेक्षा जास्ती महत्त्व देतो. एखाद्या माणसाविषयी त्याचे वर्तन धुतल्या तांदळासारखे निर्मळ आहे असे कौतुकाने म्हणतो. कदाचित तो धुतला तांदूळ लबाड असेल, लफंगा असेल, बदमाशही असेल, हे आपल्या लक्षात येत नाही. इतर प्रमाद आपण पोटात घालतो. कधी कानाडोळा करतो. परंतु लैंगिक प्रमादाबद्दल दिल्या माणसाची आपण गय करीत नाही. आपल्या मनात तरी त्या माणसाला आपण समाजद्रोही ठरवतो आणि मनात तरी त्याला शिक्षा फर्मावतो.

आपण फार चूक करतो असे मला वाटते. माणसाचे सगळे जीवन आपण जोखीत नाही. माणसाचे सगळे मन तपाशीत नाही. केवळ एकाच अंगाकडे पाहतो आणि ते अंग म्हणजे सगळे जीवन, सगळे मन समजून माणसाची किंमत ठरवितो— कधी फार मोठी, कधी फार कमी.

बदफैली माणूस नुसताच बदफैली असतो असे नाही. (काही महाभाग तसेही असतात.) तो माणूस इतर बाबतींत भला असू शकतो. त्याच्यातही काही चांगले गुण असतात. त्याचे मन सदानकदा त्या चिखलात लोळत नसेल. चिखलाबाहेर येऊन निर्मळ होण्याची धडपड करीत असेल. तो अनुतप्त होत असेल. ईश्वराची करुणा भाकीत असेल. त्या मनात काही विशिष्ट क्षणाला सुंदर काव्य स्फुरत असेल. त्याच्या जाणिवा कदाचित त्याच्या अनुभवांमुळे किंवा अनुभवांविरुद्ध झालेल्या प्रतिक्रियेमुळे हळव्या आणि तीव्र झाल्या असतील. तो वांड माणूस कदाचित लहान मुलांचा मित्र असेल. लहान बाळे त्याला मनापासून आवडत असतील. बायरनप्रमाणे त्याच्या मनावर सृष्टिसौंदर्याचे विशेष परिणाम आणि संस्कार होत असतील. सृष्टीच्या सान्निध्यात मिळालेल्या संवेदनांमधून त्याला काही दैवी साक्षात्कार घडत

असतील; कुणी सांगावे? तोही एक माणूस आहे. त्यालाही मन आहे. त्यात अंतःप्रवृत्ती आहेत; काही भल्या, काही बुऱ्या.

आपण सगळेच्या सगळे जीवन नीट पाहिले पाहिजे. नीट समजून घेतले पाहिजे. व्यभिचाराची आपण गय करू नये, गौरव तर करूच नये. बदफैली माणूस आपल्या बदफैली भांडवलावर समाजात मिरवू लागला तर त्याला मिरवू देऊ नये. त्याचे देव्हारे माजवू नये. दगड मारण्यासारखा तो वागला तर अवश्य दगडफेक करावी. बदफैलीपणा हीच ज्याची प्रकृती आहे त्याला समाजाने जरूर धारेवर धरावे.

परंतु बदफैलीपणा ही ज्याची विकृती आहे आणि भलेपणा, प्रेमळपणा, सद्विचार, सद्भावना हीच ज्याची स्थायी प्रकृती आहे त्याला समजूतदारपणाने आणि सहानुभूतीने सांभाळून घ्यावे. त्याचे दोष त्याच्या पदरी घालावेत. परंतु त्याच्या सद्गुणांचे कौतुक करावे. त्याला धीर-दिलासा द्यावा; कदाचित तो सुधारेल. कदाचित सुधारणार नाही. शेण खाण्याची सवय कदाचित सुटणार नाही. परंतु त्याच्या गैरवर्तनाचा विचार करताना त्याच्या चांगुलपणाचा सुद्धा विचार अवश्य करावा.

मन फार जटिल असते. मनस्वी माणसाचे मन तर फारच जटिल. फार गुंता झालेला असतो. आपल्याला तो उलगडता येत नाही. आपण तो उलगडला असे म्हणतो; परंतु बहुधा ती आपली चूक असते. कधी तर गुंताच नाही, सारे सीधे आहे, असे आपण धरून चालतो. ती तर फार मोठी चूक. आपण त्या मानसिक गुंत्याने गोंधळून जाऊ नये. बुद्धी समतोल ठेवावी आणि जे पाहतो तो गुंता आहे एवढा तरी विवेक ठेवावा.

आपण पाप पाप म्हणतो ते सदा सर्वदा पापच असते का? सर्व परिस्थितीत ते एकच असते का? परिस्थितीप्रमाणे त्याच्या

वेगवेगळ्या प्रती (आणि जाती सुद्धा) पडतात ना? साऱ्याच पापांना आपण एका दावणीत बांधू नये. तारतम्य ठेवावे. ज्याला आपण मागेपुढे न पाहता पाप म्हणतो त्याला आजचे मानसशास्त्र चूक म्हणते, आणि समाजशास्त्र सांगते, ती चूक केवळ त्याचीच नाही. त्याच्या आनुवंशिकतेचा, कुटुंबाचा, समाजाचा, शिक्षणसंस्थांचा त्या पापात वाटा असतो. ही सारी पापाची वाटेकरी आहेत. पाप्याला मारायला दगड उचलाल तेव्हा या सर्वांचा विचार करा.

घरी सोय असताना जो बाहेर शेण खातो त्याला आपण बाहेरख्याली म्हणतो. परंतु शेण खाण्याचा दुसराही एक प्रकार आहे. तो घरगुती आहे. तो आपण विसरतो. स्वतःच्या बायकोशीहि मनुष्य व्यभिचार करू शकतो. जेथे दोन मने जुळली नाहीत तेथे दोन शरीरे एकत्र येऊन काय उपयोग? तो जुलमाचा व्यवहार होईल. जेथे संमती नाही, प्रेम नाही, तेथे व्यभिचारच घडतो असे खुशाल समजावे. बायको आजारी आहे, दुबळी, वैतागलेली, थकलेली आणि अनिच्छ आहे आणि अशा बापडीवर जेव्हा साळसूद नवरोबाचे दैनंदिन अतिक्रमण होते तेव्हा त्या आचाराला व्यभिचार म्हणू नये तर काय म्हणावे? तो माणूस बाहेरख्याली नसतो. साळसूद असतो. सरळ नाकासमोर चालणारा असतो. परस्त्रीकडे त्याची दृष्टी वळत नाही. परंतु स्वतःच्या कामवासनेसाठी हक्काच्या बायकोचा तो बळी घेतो. त्यात यश मिळाले नाही तर तिला माणसांतून उठवतो. हा साळसूद सज्जन पापी नाही का? माझ्या मते तोच खरा आणि विशेष पापी. त्या बाहेरख्याली उंडग्याचे रंगढंग राजीखुषीने चालतात. महाभारताने व्याख्या केली त्याप्रमाणे तो 'परपीडन' करीत नाही. हा घरबश्या करतो.

पापे मिरवणाऱ्या पाप्यांचा मी धिक्कार करतो. घरगुती छुप्या पाप्यांचाही मी धिक्कार करतो. माणसाचे सारे दुर्गुण आणि सारे सद्‌गुण जमेस धरून मी तोलतो आणि निकाल देतो. कधी दुर्गुणांचे पारडे जड असते, कधी सद्‌गुणांचे.

बायरन एक बदफैली बहिष्कृत माणूस. ध्येयवादामुळे ग्रीसचा तो वीरपुरुष झाला. बायरनची पापे इतिहासजमा झाली. आता तेथेच ती आढळतील. मात्र बायरनच्या थोरवीचे स्मारक ग्रीसच्या शहरोशहरी आढळेल. त्या वीरपुरुषाला माझे वंदन!

क्यां शि च्या ठ आ व णी
शि च्या क्यां आ व णी ठ
च्या क्यां शि व ठ आ णी
शि च्या क्यां आ व णी ठ
क्यां शि च्या णी ठ व आ
शि च्या क्यां आ व ठ णी

शिर्क्यांच्या आठवणी

शिर्के गेल्याला वर्ष दीडवर्ष होत आले. दोन वर्षे अंथरुणाला खिळून होते. अलीकडे तर कुशीवर वळता येत नसे. माणसे ओळखत नव्हते. नातवंडांची ओळख आणि जाणीव नाहीशी झाली. पन्नास वर्षे साथ दिली त्या सहचारिणीला आई म्हणू लागले. त्या शेवटच्या दिवसांत पुण्यातून आणि वर्तमानकाळातून उठले होते आणि राजापुरात व बालपणात शिरले होते. खोलीतील वस्तू, माणसे दिसेनाशी झाली होती. परंतु साठपासष्ट वर्षांपूर्वीचे राजापूर मनात उभे राहिले होते. त्या लहान वयात शाळेत त्यांच्या शेजारी जी मुले बसत त्यांची बिनचूक नावे घेत. बालपणातील आईविषयीच्या जाणिवा आणि भावना जिवंत झाल्या होत्या. वर्तमानकाळाची मात्र दखल घेत नव्हते.

अमका आला असे सांगितले म्हणजे नुसते हं म्हणायचे. मला पुष्कळ दिवस ओळखायचे. त्यांच्यापाशी बसण्यासाठी मी नेमाने जात होतो. परंतु दर खेपेस एक ठराविक वाक्य बोलायचे, "फार दिवसांनी आलात काका." स्वरात काकुळती असायची. काळाचे भानच नव्हते. मागचापुढचा काळ मिसळून त्याचा गुंता झाला होता. आपण नीट समजावून सांगितले तरी त्या क्षीण मनाला तो सोडता येत नव्हता.

त्यांच्याकडे पाहून आम्ही कष्टी होत होतो. ते त्यापलीकडे गेले होते. पाठीला मोठमोठी बेडसोअर्स झाली होती. आम्हाला ती बघवत नव्हती. अंथरुणात हालचाल करताना त्या दुखऱ्या पाठीमुळे त्याना यातना होत असतील असे आम्हाला वाटे. परंतु त्यांच्या संवेदनाच लोप पावल्या होत्या. यातना होणार कशा? दुःखी आम्ही होतो, ते नव्हते. देवाने त्या देवमाणसाचे हाल केले, परंतु यातना होऊ दिल्या नाहीत.

शिर्क्यांच्या आजाराला सुरवात 'पार्किन्सन'च्या रोगाने झाली. रक्त पायात उतरेनासे झाले. पायांची चलनशक्ती गेली. ते भिंतीला टेकून पाय रखडत कसेबसे खोलीबाहेर दिवाणखान्यात येत. इतकी मजल मारायला त्यांना दहा मिनिटे लागत. मला ते पाहवत नसे. मी दुसरीकडेच मान वळवी आणि शिर्के खुर्चीवर समोर धप्पकन बसले म्हणजे समोर पाही.

पाय गेले तरी मन बरेचसे शाबूत होते. त्या उरलेल्या मनाचा मी उपयोग करून घेत असे. पुढे तेही क्रमाक्रमाने गेले आणि देहही क्षीण झाला. शिर्के बिछान्याला खिळले. मी कॉटशेजारी खुर्ची ओढून बसे. ओरडून बोले. चौकशी करी, परंतु पडसाद मिळेनासे झाले. डोळे माझ्याकडे वळत, पण त्यात जाणीव नव्हती. निर्विकार निर्गुण होते. त्या निर्विकार निर्गुणाकडे जाण्यास निघाले होते.

मैत्रीची ओढ म्हणून नव्हे, तर कर्तव्य म्हणून मी समाचारास जात राहिलो. खोलीत जायचा, त्या कॉटकडे पाह्यचा आणि बाहेर दिवाणखान्यात येऊन बसायचा. पुढेपुढे खोलीत डोकावून पाही आणि बाहेर बसे. शिर्के हयातीतच आमच्यापासून फार दूर गेले होते. पुढे जे होणार होते, येणार होते त्याची आम्हाला सवय झाली.

आणि एक दिवस शिर्के गेले. धावत गेलो. धावतच खोलीत गेलो आणि शिर्क्यांपाशी मोकळ्या मनाने रडलो. त्या थंडगार कपाळावर हात ठेवून तसाच बसलो. माणसे जमू लागली. जवळचे लांबचे आले. विचारपूस करू लागले. जे घडले ते प्रत्येक येणाऱ्या माणसाला सांगावे लागले. सामान आणले. म्युनिसिपालिटीची गाडी आणली. नेण्यापूर्वीचे विधी झाले. स्मशानातले विधी यथासांग पार पडले. भाषणे झाली. तिसऱ्या दिवशी राख सावडली. अस्थी गोळा केल्या. शिर्क्यांच्या अस्थी आळंदीस इंद्रायणीस अर्पण झाल्या. पिंडदान झाले. दिवस झाला. एका मागून एक विधीमध्ये मन घालावे लागले.

मृत्यूनंतरच्या दिवसांत शिर्के आमचे राहिले नाहीत. हिंदूधर्माच्या संस्कारांच्या आणि समाजाच्या मालकीचे झाले. तज्ज्ञ सांगतील ते सर्व विधी क्रमाक्रमाने करावे लागले. आल्या-गेल्यांशी बोलावे लागले, परत तेच ते सांगावे लागले. साऱ्यांची सहानुभूती घ्यावी लागली. या धार्मिक आणि सामाजिक कर्मकांडात मन गुंतले. शोक करण्यास सवड मिळाली नाही. हे सारे कर्मकांड मानसशास्त्रदृष्ट्या उपयोगी पडले. समाज आमच्या वियोगदुःखात सहभागी झाला. दुःख वाटले गेले. उरलेल्या दुःखास वेळ नव्हता.

शिर्के गेल्यावर समाचारास त्यांच्या घरी नेमाने जाऊ लागलो.

पुष्कळ बोललो, परंतु शिर्क्यांविषयी बोललो नाही. समाचारास कोण कोण आले, काय काय बोलले, कुणाकुणाची पत्रे आली, तारा आल्या, सारी विचारपूस करीत होतो. पत्रे तारा वाचीत होतो. पुढचे काही काही बोलत होतो. शिर्के आमच्या मनात हमेशा उभे असत. परंतु संगनमत न करता त्यांना आम्ही टाळले. इतर पुष्कळ गोष्टी बोललो. शिर्क्यांच्या गोष्टी बोललो नाही.

काही दिवस गेले. शिर्क्यांच्या वियोगाची सवय होऊ लागली. शिर्के मनातून बाहेर आले. हळुहळू धैर्य आले. संभाषणात शिर्के येऊ लागले. आम्ही त्यांची दखल घेऊ लागलो. जुन्या आठवणी काढू लागलो. जुने अनुभव ताडून पाहू लागलो. आम्ही साताऱ्यास १९२३ साली राहत होतो. रोज भेटत होतो. फिरायला, सहलींना जात होतो. एका रविवारी यवतेश्वरी गेलो. बरोबर शेजारची मुले होती. शिर्के होते. तेही स्वभावाने मनाने मुलांसारखेच. साध्यासाध्या दृश्यांनी आणि स्वादांनी उत्तेजित होत, गुंगून जात. यवतेश्वरी आम्ही प्रौढ माणसे झाडाच्या सावलीत बसलो. शिर्के मुलांसह इकडे तिकडे भटकू लागले. झाडे धुंडाळू लागले. झाडे फार आवडत. फळे फार आवडत. तीही स्वतः दगड मारून पाडलेली, स्वसंपादित. शोधता शोधता चिंचेचे झाड आढळले. खुशालले. दगड मारू लागले. पोरांनी दगड शोधून आणायचे, शिर्क्यांनी नेम धरून मारायचे. असे सहकार्य झाले. चिंचा घेऊन ती मुले विजयोत्साहाने आमच्याकडे आली. शिर्के म्होरके होते. चिंचा खातच आले. आमच्याही तोंडाला पाणी सुटले. फराळ करण्यापूर्वी सर्वांनी ॲपिटायजर म्हणून चिंचा भक्षण केल्या.

दुसरी आठवण आठवली. मी मुंबईस इन्स्पेक्टर होतो. रत्नागिरी जिल्ह्यात फिरतीवर गेलो. शिर्के बरोबर आले. तो

94733 निर्बंध
2065 29/3/09

जिल्हा त्यांच्या जिवाभावाचा, जिव्हाळ्याचा. माणसांवर प्रेम करावे तसे शिर्क्यांनी त्या जिल्ह्यावर केले—त्या कातळांवर, त्या गडग्यांवर, खाड्यांवर, होड्यांवर, लहानमोठ्या मासळींवर, झाडांवर आणि फळांवर. रत्नागिरीतल्या झाडांवरच्या फळांची जन्मभर आठवण काढीत आणि नुसत्या आठवणीने मिटक्या मारीत, तृप्त होत.

...आम्ही संगमेश्वराहून रत्नागिरीस खाडीच्या काठाकाठाने मोटरने जात होतो. वाटेत तिळांची शेते लागली. पिवळी पिवळी. त्यांना पाठिंबा निळ्या आकाशाचा. शिर्के टकमक पाहात होते. वाटेत रातंबीचे झाड आढळले. शिर्के ओरडले. गाडी थांबली. लगभग खाली उतरले, झाडापाशी गेले. ड्रायव्हर मदतीला गेला. काही वेळाने रातंबीची फळे घेऊन आले. फळे देऊन म्हणाले, "तुम्हांला सांगत होतो ना? हेच ते रातंबीचे फळ. भारी गोड. पाहा तर खरे." आणि शिर्क्यांनी एक फळ तोंडात टाकले.

लहानपणचे सारेच आठवायचे, सांगायचे. लहानपणी आई भल्या पहाटे उठे, समुद्रावर जाई, गुडघ्याभर पाण्यात उभे राहून मुळे वेची. काय झकास कालवण होत असे. आणखी सांगायचे, लहानपणी आपण राजापुरास पैशाला (का पईला?) पन्नास कांटे (अगदी लहान मासे) आणत होतो. त्यांवर दोन्ही वेळचे कालवण भागे. भाजीचीही गरज भागे. साठपासष्ट वर्षांपूर्वीच्या त्या चवीचा पुनःप्रत्यय घ्यायचे.

शिर्क्यांच्या संवेदना फार तीव्र. त्या संवेदनांच्या आठवणी तितक्याच तीव्र आणि ताज्या. अनुभवांइतक्या नव्या. शिर्के आठवणी सांगू लागले म्हणजे ते अनुभव नसलेले आम्ही त्यांच्या सुखाने ते अनुभव चाखत असू.

...हळुहळू शिर्क्यांच्या गंमतीच्या आठवणी आठवण्याइतके

94733

आमच्यात बळ आले. त्यांच्या गमती आठवायचे आणि खिन्न मुद्रेने मंदसे हसायचे. विनोदाने आमच्या शोकास सौम्य केले. आम्ही शिर्क्यांच्या खोलीत जाऊ लागलो. त्यांच्या कॉटकडे न पाहता त्यांच्याबद्दल बोलू लागलो.

वर्ष दीड वर्ष गेले. शिर्क्यांच्या आठवणींतील तपशील गळाले, दाहता कमी झाला. शिर्के विशेष प्रसंगीच डोळ्यांसमोर येतात. समोर आले तरी त्यांना आम्ही डावलत नाही. त्यांच्या विषयीच्या जाणिवा साठवणीत जपून ठेवतो.

आता शिर्के आमच्या दैनंदिन जीवनाच्या आड येत नाहीत. आले तरी चटका लावीत नाहीत. आता शिर्के जीवनात मिसळून गेले आहेत. त्यांच्या आठवणी अलग राहिल्या नाहीत. त्या माझ्या आठवणी झाल्या आहेत—प्रसन्न, शांत आणि शीतल.

ला ला ज प ल त यां ची रा ब्दी श ता
ज ला प ला त यां ल रा ची ता श ब्दी
ला ला यां ज ल त ची रा प ता श ब्दी
ज त ला यां ला प ल रा ची श ब्दी ता
ला ला रा ल यां त प रा ची ता श ब्दी
ज ला प ला रा त ल यां ची ब्दी ता श

लाला लजपतरायांची शताब्दी

लाला लजपतरायांच्या शताब्दीचे हे साल. भारत लालाजीला विसरून गेला होता. यंदा काही दिवस त्यांचे स्मरण होईल, भाषणे होतील, मासिकांत लेख येतील, दोनचार स्मारके होतील आणि राष्ट्र परत आपल्या मार्गाने पुढे जाईल. लालाजी पुष्कळ मागे राहतील. हे असेच चालायचे. राजकारणी स्मृती अल्प असते. कितीजणांची तरी आठवण ठेवावी? डोक्यात गर्दी झाली असती. जुन्यांना जागा खाली करावी लागते; हेच एकंदरीत बरे आहे.

या शताब्दीमुळे लालाजी परत पुष्कळ दिवसांनी आठवले. लहानपणचे १९०८-९ सालचे एक एक आठवले. लहान होतो, इंग्रजी शाळेत जाऊ लागलो होतो. संस्थानात राहत होतो. सभाबंदी

होती. भषाणे होत नव्हती. परंतु इंदूरचे वातावरण विजेने भारले होते. आमचे एक दोघे मास्तर हद्दपार झाले होते. गोगटेमास्तर बोलत नसत. परंतु रस्त्याने जाताना हळूच एक कागद हातात द्यायचे आणि पुढे जायचे. कधी ते स्वामी विवेकानंदांचे इंग्रजी गद्यकाव्य असायचे. Forget not that you are an Indian. आणि आम्ही मनात पुटपुटायचे, I am an Indian, I am an Indian. कधी ती सावरकरांची कविता असायची— 'स्वातंत्र्याचा पाळणा.' "बाळा, जो जो रे, सुखदात्या, मनोहरा स्वातंत्र्या, बाळा जो जो रे!...परदेशी वस्तु, जाळा रे, दृष्ट याची काढा रे"...घरीं जाईपर्यंत कविता पाठ होऊन जायची आणि तिचा मंत्रजागर व्हायचा. मुष्टिफंडाला सुरवात झाली. गावाबाहेर छत्रीबागेत जाऊन तीरकमठ्याचे शिक्षण सुरू झाले... 'ना तर परवशता, करील निश्चित घाता, बाळा जो जो रे...'

आमच्या घरोघर 'लाल-बाल-पालां'चे चित्र असे. जे घाडसी होते त्यांच्या खोलीत खुदीराम बोसांचे चित्र असायचे. सर्वांच्या ओठांवर माणिकतोळा, अरविंद घोष, बारींद्र हे शब्द नाचत होते. ते दिवस धन्य होते. आमच्या हातून काही झाले नाही. पण त्या दिवसांनी आमची मने घडवली. आम्हाला बाल्यातून अवेळी खेचून प्रौढ केले. आम्ही ते रम्य बालपण अनुभवलेच नाही. जळते प्रौढत्वच जगलो.

आजच्या पिढीत आणि आमच्या पिढीत किती अंतर! साठ वर्षे सुद्धा लोटली नाहीत अजून. पण सहाशे वर्षांचे अंतर पडले आहे असे वाटते. आज घरोघर लाल-बाल-पाल नाहीत, खुदीराम नाही. ते नसायचेच. माझी तक्रार नाही. हा खो खोचा खेळ आहे. खो मिळाला की ठिकाणाहून उठावे लागते. बापडे टिळक-सुद्धा उठले. हो, उठलेच म्हणायचे. आता पाळी? देव जाणे

कुणाची पाळी. मानवी विस्मृतीचे सामर्थ्य अमर्याद आहे. ती कुणाची मर्यादा ठेवीत नाही.

आज घरोघर लालाजी नाहीत. खुदीराम नाही. बापडा फाशी गेला. बाया गेला काय? हौतात्म्य कधीच बाया जात नाही. खुदीराम आमच्या हृदयात विराजमान आहे. पण आम्ही आता संपत आलो. थोडे उरले तेही अमळशाने जातील. जायचेच. नाही, नाही. ते वीर फुकट गेले नाहीत. स्मृती ठेवली नसली तरी त्यांनी विचार ठेवले. त्या ज्योतीने दुसरे दिवे पेटले. सावरकर पेटले, सुभाष पेटले. त्यांच्या हातातील ज्योतीने दुसऱ्या ज्योतींना पेटवले. रिले रेस चालू आहे. विचार, प्रेरणा मरत नाहीत. माणसे मरतात. मरू द्या.

...पण विचार अमर आहेत का? का तेही त्या हातांच्या बरोबर मेले? का आजच्या हातांना ती स्वातंत्र्याची ज्योत पेलत नाही? हात दुबळे आहेत? नाजूक झालेत? मला ती ज्योत कुणाच्याच हातांत आज दिसत नाही. ज्योत हाती धरायला उठावे लागते. आम्ही सुखासीन आहोत. स्वातंत्र्य मिळाले. सारे मिळाले. आम्ही कृतार्थ झालो? अजून अर्थ किती तरी बाकी आहे. कामाचे डोंगर पुढे आहेत. आम्हाला ते दिसत नाहीत.

जुनी ज्योत जुनी झाली. कबूल आहे मला. नवी घ्या, पण घ्या. हात रिकामे ठेवू नका. नव्या जगाचा शिपाई नवा पाहिजे. अगदी बरोबर. नवे व्हा. ताजे व्हा. पुढचे पहा. पण शिपाई व्हा. पेंढार होऊ नका.

नव्या जगाची हाक ऐकलीत का? वेगळी असेल, पण हाक आहे. रण वेगळे असेल. पण रणदुंदुभी तीच आहे. उठा. कामाला लागा. थोडे अस्वस्थ व्हा. विचारांच्या भाराने तुम्हाला झोप आली नाही तर मला समाधानाची झोप लागेल.

मला दिसते. मला जाणवते. मला टोचते. विचारांचे तुमचे वाकडे होत चालले आहे. अरे, विचार नाहीत तो माणूस नाही. मन अस्वस्थ करतील असे विचार करा. लालाजी, खुदीराम, सावरकर आमचे वीर पुरुष होते. त्यांच्यामागे जाण्यात आम्ही कुचराई केली असेल. पण आम्ही त्यांची पूजा केली. तुम्ही कोणाची पूजा करता? उत्तर देणे कठीण आहे, नाही का? नव्या जगाचे देव वेगळे असणारच. आमचे देव बसवा, असे आमचे म्हणणे नाही. तुमचे देव देव्हाऱ्यांत बसवा, पण बसवा. देव्हारा रिकामा ठेवू नका. तुम्ही माणसे आहात. डुकरे नाहीत. का तुमच्या देव्हाऱ्यात फक्त सिनेमा नटनट्यांचीच गर्दी आहे? तुमच्या भिंतीवर चित्रे कोणती आहेत? टेबलावर कोण आहे? जीवनात कोणते विचार स्थिर आहेत? कोणत्या प्रेरणा टोचतात? का काहीच टोचत नाही, खुपत सलत नाही? अरे, तुम्ही माणसे ना?

ही लालाजींची शताब्दी. त्यांची आठवण करा. तो तगडा म्हातारा हंटर कमिशनला मुकाबला देताना छातीवर प्रहार झेलून धारातीर्थी पडला. तुम्ही पट्टू नका. तुमच्या समस्या वेगळ्या, गरजा वेगळ्या. पण एक घडा लालाजींकडून घ्या. अन्यायाचा प्रतिकार. दास्याविरुद्ध झुंज. आज अन्याय सामाजिक आहेत. आज दास्य मानसिक आहे. झुंज या शत्रूंना द्या. मऊ मेंढरे बनू नका.

लाचारीविरुद्ध बंड पुकारा!

दंभाविरुद्ध बंड पुकारा!

शब्दप्रामाण्याविरुद्ध बंड पुकारा—

मग ते शब्द गीतेचे असोत, गांधीजींचे असोत!

मी पी टो ली क टा !
मी टो क पी टा ली !
टो मी पी ली टा क !
मी पी टो क टा ली !
पी टो मी टा ली क !
मी पी टो क ली टा !

मी टोपी टाकली !

आजवर मी अनेक टोप्या घातल्या आहेत—स्वतःलाच. दुसऱ्याला टोपी घातली नाही, घालू दिली नाही. मला ते चालत नाही. अगदी लहानपणी छानदार गोंडा असलेली मखमलीची मऊ मऊ कुंची घातली. 'कुंची मी घातली' असे म्हणता येणार नाही. माझ्या आईनेच ती माझ्या डोक्यावर चढविली. मला कुंची घालून कडेवर घेऊन ती मोठ्या दिमाखाने घराबाहेर पडत असे. ती सत्तर वर्षांपूर्वीची कुंची मी अद्याप जपून ठेवली आहे. माझ्या सर्व नातवंडांच्या डोक्यांवर बारश्याच्या दिवशी ती चढविली आहे.

अंमळ मोठा झाल्यावर नाना प्रकारच्या टोप्या डोक्यावर चढल्या. आरंभाला जरीची वेलबुट्टी असलेल्या गोल टोप्या. मग

घडीच्या बनातीच्या टोप्या. मुंबईच्या ढगे कंपनीच्या. त्या टोप्या थोड्या तिरप्या घालून ऐट आणता येत असे. पुढे काश्मिरी टोप्या आल्या. बऱ्याच उंचीच्या आणि मधोमध छानदार वेलबुट्टी असलेल्या. त्याही वापरातून गेल्या. आणि मी इटालियन टोप्यांकडे वळलो. पुढे ग्वाल्हेरीस नोकरी धरल्यावर उंच आणि गोल अशी हंगेरियन टोपी आली. माधव महाराज तशी टोपी घालीत असत. यथा राजा तथा प्रजा. आम्ही सारे तशा टोप्या घालीत असू. स्नान झाले असो वा नसो, टळटळीत लाल गंध लावून डोकीस गोल टोपी चढवून आम्ही सकाळी बाहेर पडायचे. कोणा बुवासाहेबाकडे जाणे झाले तर साफा बांधीत होतो. बुवासाहेब म्हणजे कोणी साधुमहाराज नव्हे. बुवासाहेब म्हणजे राबसाहेब. प्रतिष्ठित माणसांना आम्ही त्या नावाने संबोधीत असू.

ग्वाल्हेर सोडल्यावर हंगेरियन टोपी सुटली. साफा मात्र काही वर्षे टिकला. रत्नागिरीस नेमणूक झाल्यावर डोकीस साफा, पायात चुस्त पायजमा आणि लांब कोट असा माझा वेष असे. रत्नागिरीचे बरेच लोक ओळख पटेपर्यंत मला उत्तर हिंदुस्थानातील मुसलमान समजायचे. कारण त्यावेळी कोकणातील मुसलमान आणि हिंदू एकच प्रकारचा पोशाख करीत असत. रत्नागिरीचे मुसलमान पायात वहाणा, धोतर, अंगरखा, उपरणे आणि डोकीस ब्राम्हणी रुमाल अशा वेषात असत. शुद्ध मराठी बोलत. मात्र 'ळ' चा 'ल' करीत. ऊर्दू एक शब्द त्याना येत नव्हता, समजत नव्हता. आणि याची त्याना शरम वाटत नव्हती. सारे मराठी शाळेत जात आणि मराठीच शिकत. परंतु पुढे मुसलमान पुढाऱ्यांच्या खटपटीमुळे आणि इंग्रजसरकारच्या चिथावणीमुळे मुसलमान वेगळे झाले. मोडके तोडके उर्दू बोलू लागले.

गोंड्याची लाल टोपी घालू लागले. परंतु मी रत्नागिरीस होतो तोपर्यंत मुसलमान वेगळे झाले नव्हते.

१९२९ साली मी विलायतेस गेलो. परंतु विलायती टोपी घातली नाही. बरोबर दोनतीन प्रकारच्या टोप्या नेल्या होत्या. आणि जरीचा कोइमतुरी रुमालही नेला होता. विलायतेत कधी फर कॅप तर कधी बनातीची घडीची काळी टोपी आणि वेळीप्रसंगी कोइमतुरी रुमाल बांधीत असे.

विलायतेहून आल्यावर मात्र विलायती टोपी घालू लागलो. कारण समाज त्या सुमारास तशा टोपीची हेटाळणी करू लागला होता. पेन्शन घेईपर्यंत मी विलायती टोपीच घालीत असे. पुढेही ती घातली असती. दुसऱ्या टोप्याही घातल्या असत्या. परंतु एक अनुभव आला आणि मी डोकीस टोपीच घालण्याचे सोडून दिले.

ते असे झाले. १९५२ साली मी एक चूक केली. घोडचूक केली म्हणा ना. माझा मीच घोंडा उचलला अन् पायावर टाकला. त्या साली मी विधानसभेचा सभासद झालो. वास्तविक निवृत्तीनंतर मला परत वाङ्मयाकडे वळायचे होते. तसे काही बेत केलेही होते. परंतु माझ्या जीवनात हमेशा दोन प्रेरणांचे द्वंद्वयुद्ध चालत असे—शिक्षण आणि वाङ्मय. त्या काळी मी शिक्षणाला अधिक महत्त्व देत होतो. एखादे सुंदर पुस्तक लिहिण्यापेक्षा शिक्षणक्षेत्रात एखादी चांगली कामगिरी करावी असे वाटत असे. १९३८-३९ साली बाळासाहेब खेर शिक्षणमंत्री असताना मला शिक्षणक्षेत्रात पुष्कळच काम करण्याची संधी मिळाली होती. बाळासाहेबांनी मला स्पेशल ऑफिसर नेमले होते. त्यांचा माझा पूर्वी परिचय नव्हता. आणि माझे काम संपल्यावर आमचे संबंध संपले. १९५२ साली मंत्रीमंडळात

माझे जवळचे संबंध असलेले मंत्री होते. मी पूर्वी केलेले काम यांना ठाऊक होते. मला वाटले, पूर्वीपेक्षा आता काम करण्यास पुष्कळच वाव मिळेल. काम जणू काही माझी वाट पाहात होते. परंतु माझी निराशा झाली. ज्यांचे माझे कैक वर्षांचे आपलेपणाचे सबंध होते, ज्यांना पुढे येण्यास मी थोडीबहुत मदत केली होती, असे माझे काही मित्रसुद्धा मंत्रिपदावर आल्यावर मला ओळखेनासे झाले. त्यांनी माझ्याकडे दुर्लक्ष केले. या महाशयांना पुष्कळ काम असे. मोरारजींचा सासुरवासही असे. माझ्याकडे दुर्लक्ष होणे स्वाभाविक होते. परंतु दुर्लक्षाचा विषय होणे मला साहजिक नव्हते. परवा परवापर्यंत सलगीने, आपलेपणाने किंवहुना मिन्नतवारीने माझ्याशी वागणारी माणसे एकाएकी अशी कशी बदलतात याचे मला नवल वाटले. आणि दुःखही झाले. जाणूनबुजून उघड्या डोळ्यांनी स्वतःच्या हाताने मी माझ्या पायावर धोंडा टाकला होता. स्वतःच्या धोंड्याची जखम जास्त असते. वेदना जास्त होतात. आणि त्या मुकाट्याने सहन कराव्या लागतात.

मी हजेरीपुस्तकावर नेमाने सही करून तसाच लिफ्टकडे वळत असे आणि लिफ्टमधून वरच्या मजल्यावर ग्रंथालयात जात असे. त्या चारपाच वर्षांत एका आरामखुर्चीवर बसून मी काही हजार पाने वाचली. त्या मुदतीत सारा विल ड्यूरंट वाचून काढला. अवश्य असेल तेव्हाच सभागृहात जात असे.

माझा सर्व पोषाख खादीचा परंतु इंग्रजी पद्धतीचा होता. साहजिकच मी टोपी घालीत नसे. त्यावेळी उत्तर गुजरातमधले एक सज्जन दुय्यम प्रतोदाचे काम पाहत होते. त्यांना माझे बोडके डोके पाहवले नाही. तुम्ही काम करा, किंवा झोपा घ्या, डोक्यास गांधी टोपी मात्र घाला, असा त्यांचा कटाक्ष

होता. एके दिवशी या गृहस्थानी मजकडे चिठ्ठी पाठविली, "Please put on your cap." मी चिठ्ठी वाचली, कुस्करली आणि खिशात घातली. कारण जवळपास टोपली नव्हती. दुसऱ्या दिवशी मला परत चिठ्ठी आली; "Please put on your cap." आता या चिठ्ठीची दखल घेणे प्राप्त होते. मी त्या चिठ्ठीखाली उत्तर लिहिले, "I have no cap." मध्यंतरात ते सज्जन मला लॉबीमध्ये भेटले; म्हणाले, "अहो, तुम्ही टोपी का घालीत नाही?" मी हंसून म्हणालो, "माझ्या डोकीवरचे सारे केस पांढरेच आहेत. पांढऱ्या टोपीची आणखी गरज काय?" गृहस्थ उघड्या तोंडाने माझ्याकडे नुसते पाहात राहिले. त्यांना विनोद कळत नव्हता. त्या तशा पुष्कळ लोकांना विनोद कळत नाही. प्रतोदजी माझ्याशी हुज्जत घालू लागले. मी त्यांना खडसावून सांगितले, "तुम्हाला वाटेल ते करा. मी टोपी घालणार नाही. माझा सर्व पोषाख इंग्रजी पद्धतीचा आहे. या पोषाखात टोपी घालणे गैरशिस्त मानले जाते. मी ते करणार नाही." आणि पुढे मनात म्हणालो, "लेका, उडत जा."

प्रतोदजींनी हे टोपीप्रकरण कारभारी मंडळापुढे नेले. तेथे दोन तट पडले. भाऊसाहेब हिऱ्यांनी माझी बाजू घेतली. हिरे कधी कधी जुने ऋणानुबंध स्मरत असत. तसे ते धाडसी होते. परंतु धोरणी होते. त्यांच्या धाडसातही धोरण असे. हिऱ्यांना एकदोघांनी टेकू दिला. टोपीप्रकरण दफ्तरदाखल झाले. परंतु त्यापुढे ते सज्जन जाता येता कधी भेटले तर चमत्कारिक नजरेने मजकडे पाहात असत. मीही माझ्या केसांवरून हात फिरवीत त्यांच्याकडे पाहात असे.

खरे सांगायचे म्हणजे मला तशी गांधी टोपीची नफरत नव्हती. आदरही नव्हता. एक काळ असा होता की जुलमी

परकी सरकाराबद्दल विरोध दाखविण्याचे ते एक निशाण होते. आणि त्या दृष्टीने त्या चिन्हाची त्या वेळी मी कदरही केली होती. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर त्या टोपीला पूर्वीचा अभिप्राय राहिला नव्हता. ती कसलीच प्रेरणा देऊ शकत नव्हती. वाटेल त्याच्या डोक्यावर ती चढली होती.

मध्ययुगीन युरोपमध्ये बडेबडे सरंजामदार नांदत असत प्रत्येकाचा फौजफाटा असे. आणि प्रत्येकाच्या शिबंदीची वेगळी लिव्हरी असे. गांधीटोपी ही आता लिव्हरी झाली होती. मी मनाने स्वतंत्र; कसलीच लिव्हरी मला मान्य नाही. मी आजवर कोणच्याच संप्रदायाचा गणवेश घातला नाही. वृत्ती स्वतंत्र आहे. आणि हट्टीही आहे. मी कोणत्याच गुरूचा गंडा आजवर बांधला नाही. कोणताच धर्मग्रंथ शिरसावंद्य मानला नाही. थोडे थोडे सर्वांकडूनच घेतले. परंतु स्वेच्छेने घेतले. जे चांगले उदात्त वाटले, जे बुद्धीस पटले ते कोणत्याही दिशेने आले तरी स्वीकारले; पुरेपूर आणि सर्वस्वी असा कोणाही विभूतीला किंवा चोपडीला वश झालो नाही.

...त्या प्रतोदर्जीनी मला चिडविले. मी चिडलो. माझ्यातला मरगठ्ठ्याचा विरोधगंड जागा झाला. मी गांधीटोपी घातली नाही. इतकेच नाही तर कोणतीच टोपी घालण्याचे सोडून दिले. आजवर तेच करीत आलो आहे. कोणालाच टोपी घालू दिली नाही.

भा ता र त यु ध र्म द्धे का ली झा त ही ना ?
ता र त भा र्म द्धे ध यु का झा ली ही ना त ?
त ता भा र यु ध द्धे र्म का ली झा ना त ही ?
भा र त ता ध यु र्म द्धे का झा ली ही ना त ?
र ता भा त द्धे ध यु र्म का ली झा त ही ना ?
त र ता भा र्म ध द्धे यु का ली झा ना त ही ?

भारतात धर्मयुद्धे का झाली नाहीत?

भारतात धर्मयुद्धे झाली नाहीत. इतर युद्धे पुष्कळ झाली. हमेशाच झाली. परंतु धर्मयुद्धे झाल्याचा इतिहासात आढळ होत नाही. दक्षिण भारताबद्दल नक्की सांगता येत नाही. त्या प्रदेशाचा जुना इतिहास मला तितकासा ज्ञात नाही. कदाचित् तिकडे शैवांत आणि जैनांत धर्मयुद्धे झाली असतील. परंतु इतिहासाने नमूद करावे इतके महत्त्व त्यांना नसावे.

भारतातील युद्धे अलीकडच्या 'फ्रेंडली मॅचेस' सारखी होती. दोन राजांत लढाई व्हायची. एकजण शरण यायचा, दुसऱ्याचा मांडलिक व्हायचा. मांडलिकत्वाची खूण म्हणून आपली मुलगी किंवा बहीण आणि खंडणी द्यायचा. विजयी राजा तेवढ्यातच समाधान मानून परतायचा. भारताच्या लढायात

मुसलमान येईपर्यंत कत्तली झाल्या नाहीत; प्रतिपक्षी राजाला ठार मारायचे, त्याचा प्रदेश आपल्या राज्यात सामील करायचा असे क्वचितच घडे. इतर राजांनी आपले स्वामित्व मान्य करायचे एवढाच भारतात दिग्विजयाचा अर्थ होता. एकंदरीत हिंदूंच्या रक्तात क्रौर्य नाही. भारताची हवा युयुत्सु नाही.

याच्या उलट प्रकार युरपमध्ये घडला. तिकडे तीसतीस शंभर-शंभर वर्षे धर्मयुद्धे झाली. धर्मासाठी मारायचे किंवा मरायचे हाच मध्ययुगीन युरपचा बाणा. ख्रिस्ती धर्माचा जन्मच ख्रिस्ताच्या हौतात्म्यात झाला. ख्रिस्ताचे दोन प्रमुख शिष्य (पिटर ख्रिस्ताच्या मृत्यूनंतर शिष्य झाला) रोममध्ये धर्मासाठी बळी गेले. आरंभीच्या ख्रिस्ताच्या असंख्य अनुयायांनी मरण पतकरले, पण धर्म सोडला नाही. आमच्याकडे मात्र लाखोंचे धर्मांतर झाले— काहींचे राजीखुषीने, काहींचे जबरदस्तीने. धर्मासाठी कितीजणांनी आत्महत्या केल्या, किंवा मरण पतकरले ते मला ठाऊक नाही. हुतात्मा हा शब्दच अलीकडचा. या अर्थाचा शब्द पूर्वी आपल्या भाषात रूढ होता किंवा नाही हे सांगता येत नाही. बहुधा तसा शब्दच नसावा. गरज पडल्याखेरीज शब्द येणार कसा?

युरपमध्ये मध्ययुगात अगदी क्षुल्लक प्रश्नांवरून सुद्धा धर्मयुद्धे झाली. त्या युद्धात ऐहिक हेतू नव्हते असे नाही. परंतु त्यांना इतिहासात धर्मयुद्धे हेच नाव मिळाले. कारण प्रधान हेतू तोच होता. प्रसाद म्हणून पुढे आलेल्या पावाच्या तुकड्यात आणि मद्यात ख्रिस्ताचा देह आणि रक्त आधीपासून होते का मंत्रोच्चारानंतर ते प्रविष्ट झाले, या तात्त्विक प्रश्नावर रणे माजली. धर्मविधींच्या प्रसंगी पुरोहिताने अंगावर घ्यायचे वस्त्र कसे असावे या प्रश्नावर दोन पक्ष झाले आणि झगडले. कॅथलिक पंथांतील मूर्तिपूजा, भपकेदार उपकरणे आणि थाटामाटाची कर्मकांडे ज्यांना

पटली नाहीत ते मुकाट बसले नाहीत. त्यांनी प्रतिरोध केला. देवळांतील मूर्ती, संतचरित्रे रंगविलेल्या खिडक्या, धर्मविधीतील उपकरणे उद्ध्वस्त केली. भारताचे धर्मचिंतन निराकार सर्वव्यापी परब्रह्मापर्यंत पोचले. इतकी वैचारिक झेप दुसऱ्या कोणत्याच धर्माने घेतली नाही. परंतु परब्रह्मापर्यंत पोहोचलेल्या आमच्या विचारवंतांनी मूर्तिपूजेचा प्रतिकार केला नाही. इतकेच नव्हे तर मूर्तिपूजा हा धर्मसाधनेचा हीन प्रकार आहे एवढेसुद्धा स्पष्ट सांगितले नाही. ज्यांनी आत्मानात्म विचार केला त्यांनीच स्वतः अनेक मूर्तींची पूजाअर्चा केली. उक्ती आणि कृती आम्ही अलग ठेवल्या. हा आमचा बौद्धिक अप्रामाणिकपणा होता.

युरप असहिष्णु होते, तर आमच्या सहिष्णुतेला मर्यादा नव्हत्या. आम्ही परधर्मीयांचे वेगळे आचारविचार घेतले, इतकेच नव्हे तर स्वधर्मीयांना दगडधोंडे, झाडे, जमीन, साप पुजण्याचे वाटेल तितके स्वातंत्र्य दिले.

धर्मप्रसाराचे तत्त्व आम्हांला कधीच कळले नाही. धर्माची आमची कल्पना बायालॉजिकल होती. जन्मच आमच्या मते माणसाचा धर्म (वैयक्तिक कर्तव्य या अर्थाने सुद्धा) निश्चित करतो. जुन्या काळी आम्ही इतके कोते नव्हतो. इतरांना आम्ही आमच्या धर्मात पूर्वी सामील केले आहे. गुप्त कालाच्या अंतापर्यंत तरी आमची दारे उघडी होती असे दिसते. भारतात वायव्येकडून आणि ईशान्येकडून शतकानुशतके अनेक जमाती, अनेक वंश आले आहेत. निषाद, इराणी, पार्थिव, शक, कुशाण, आणि हूण हे आणि त्यांच्याबरोबरचे लाखोंच्या संख्येने भारतात आले. कोणी परत गेले नाहीत. सारे इथेच राहिले आणि भारताच्या रक्तात धर्मात व संस्कृतीत मिसळून गेले. मात्र ही मिसळ भेसळ होती. काही विशिष्ट तत्त्वे आणि आचारविधी

मुसलमान येईपर्यंत कत्तली झाल्या नाहीत; प्रतिपक्षी राजाला ठार मारायचे, त्याचा प्रदेश आपल्या राज्यात सामील करायचा असे क्वचितच घडे. इतर राजांनी आपले स्वामित्व मान्य करायचे एवढाच भारतात दिग्विजयाचा अर्थ होता. एकंदरीत हिंदूंच्या रक्तात क्रौर्य नाही. भारताची हवा युयुत्सु नाही.

याच्या उलट प्रकार युरपमध्ये घडला. तिकडे तीसतीस शंभर-शंभर वर्षे धर्मयुद्धे झाली. धर्मासाठी मारायचे किंवा मरायचे हाच मध्ययुगीन युरपचा बाणा. ख्रिस्ती धर्माचा जन्मच ख्रिस्ताच्या हौतात्म्यात झाला. ख्रिस्ताचे दोन प्रमुख शिष्य (पिटर ख्रिस्ताच्या मृत्यूनंतर शिष्य झाला) रोममध्ये धर्मासाठी बळी गेले. आरंभीच्या ख्रिस्ताच्या असंख्य अनुयायांनी मरण पतकरले, पण धर्म सोडला नाही. आमच्याकडे मात्र लाखोंचे धर्मांतर झाले— काहींचे राजीखुषीने, काहींचे जबरदस्तीने. धर्मासाठी कितीजणांनी आत्महत्या केल्या, किंवा मरण पतकरले ते मला ठाऊक नाही. हुतात्मा हा शब्दच अलीकडचा. या अर्थाचा शब्द पूर्वी आपल्या भाषात रूढ होता किंवा नाही हे सांगता येत नाही. बहुधा तसा शब्दच नसावा. गरज पडल्याखेरीज शब्द येणार कसा?

युरपमध्ये मध्ययुगात अगदी क्षुल्लक प्रश्नांवरून सुद्धा धर्मयुद्धे झाली. त्या युद्धात ऐहिक हेतू नव्हते असे नाही. परंतु त्यांना इतिहासात धर्मयुद्धे हेच नाव मिळाले. कारण प्रधान हेतू तोच होता. प्रसाद म्हणून पुढे आलेल्या पावाच्या तुकड्यात आणि मद्यात ख्रिस्ताचा देह आणि रक्त आधीपासून होते का मंत्रोच्चारानंतर ते प्रविष्ट झाले, या तात्त्विक प्रश्नावर रणे माजली. धर्मविधींच्या प्रसंगी पुरोहिताने अंगावर घ्यायचे वस्त्र कसे असावे या प्रश्नावर दोन पक्ष झाले आणि झगडले. कॅथलिक पंथांतील मूर्तिपूजा, भपकेदार उपकरणे आणि थाटामाटाची कर्मकांडे ज्यांना

पटली नाहीत ते मुकाट बसले नाहीत. त्यांनी प्रतिरोध केला. देवळांतील मूर्ती, संतचरित्रे रंगविलेल्या खिडक्या, धर्मविधीतील उपकरणे उद्ध्वस्त केली. भारताचे धर्मचिंतन निराकार सर्वव्यापी परब्रह्मापर्यंत पोचले. इतकी वैचारिक झेप दुसऱ्या कोणत्याच धर्माने घेतली नाही. परंतु परब्रह्मापर्यंत पोहोचलेल्या आमच्या विचारवंतांनी मूर्तिपूजेचा प्रतिकार केला नाही. इतकेच नव्हे तर मूर्तिपूजा हा धर्मसाधनेचा हीन प्रकार आहे एवढेसुद्धा स्पष्ट सांगितले नाही. ज्यांनी आत्मानात्म विचार केला त्यांनीच स्वतः अनेक मूर्तींची पूजाअर्चा केली. उक्ती आणि कृती आम्ही अलग ठेवल्या. हा आमचा बौद्धिक अप्रामाणिकपणा होता.

युरप असहिष्णु होते, तर आमच्या सहिष्णुतेला मर्यादा नव्हत्या. आम्ही परधर्मीयांचे वेगळे आचारविचार घेतले, इतकेच नव्हे तर स्वधर्मीयांना दगडधोंडे, झाडे, जमीन, साप पुजण्याचे वाटेल तितके स्वातंत्र्य दिले.

धर्मप्रसाराचे तत्त्व आम्हांला कधीच कळले नाही. धर्माची आमची कल्पना बायालॉजिकल होती. जन्मच आमच्या मते माणसाचा धर्म (वैयक्तिक कर्तव्य या अर्थाने सुद्धा) निश्चित करतो. जुन्या काळी आम्ही इतके कोते नव्हतो. इतरांना आम्ही आमच्या धर्मात पूर्वी सामील केले आहे. गुप्त कालाच्या अंतापर्यंत तरी आमची दारे उघडी होती असे दिसते. भारतात वायव्येकडून आणि ईशान्येकडून शतकानुशतके अनेक जमाती, अनेक वंश आले आहेत. निषाद, इराणी, पार्थिव, शक, कुशाण, आणि हूण हे आणि त्यांच्याबरोबरचे लाखोंच्या संख्येने भारतात आले. कोणी परत गेले नाहीत. सारे इथेच राहिले आणि भारताच्या रक्तात धर्मात व संस्कृतीत मिसळून गेले. मात्र ही मिसळ भेसळ होती. काही विशिष्ट तत्त्वे आणि आचारविधी

यांच्या पायावर नवे जुने एक झाले नाही. धर्माला कधीच स्पष्ट असे कुंपण घातले गेले नाही.

आरंभी आर्यांचा आणि अनार्यांचा संघर्ष झाला. झगडे झाले. अनार्यांचे किल्ले पाडून आर्यांचा इंद्र पुरंदर म्हणजे किल्ले पाडणारा झाला. परंतु ही धर्मयुद्धे नव्हती. आर्यांना वसाहती वसविण्यास सुपीक प्रदेश पाहिजे होता. गुरे चारण्यास कुरणे हवी होती; त्यांनी अनार्यांना हुसकावून लावले आणि आपल्या लहान लहान वसाहती थाटल्या. या प्राथमिक झगड्यात हेतू धार्मिक नव्हता, ऐहिक होता. तो पोटापाण्याचा प्रश्न होता.

अल्पसंख्य आर्य आणि असंख्य अनार्य एका देशात आणि एका प्रदेशात जवळजवळ आले तेव्हा अशा परिस्थितीत जे होत असते तेच झाले. दोघांच्यात हळूहळू मिलाफ झाला. अनेक गोष्टींची देवघेव झाली. सर्वांत महत्त्वाची देवघेव देवांची. अनार्यांनी आर्यांचे वरुण इंद्र, अग्नी इत्यादी देव घेतले किंवा नाही मला माहीत नाही. परंतु आर्यांनी अनार्यांचे अनेक देव घेतले. इतकेच नव्हे तर अनार्यांचा पूजाविधी सुद्धा घेतला. आर्यांच्या पूजेत पत्र, पुष्प, तोय आले. याप्रमाणे दोन्ही लोकांची संस्कृती बरीचशी एक झाली. अनार्य सुसंस्कृत होते. नागर संस्कृतीत वाढले होते. धाडसी, कणखर आर्यांनी त्यांना रणांगणात जिकले खरे, परंतु वैचारिक आणि धार्मिक क्षेत्रात या नागरांनी आर्यांना जिंकले. सुनीतिकुमार चातर्जी नेहमी म्हणत असतात, आजचा हिंदुधर्म रुपयात चार आणे आर्य आणि बारा आणे अनार्य आहे.

आर्य-अनार्यांचे आरंभीच्या झगड्यानंतर सहजीवन (co-existence) सुरू झाले असावे. तुम्ही तुमच्या घरी खुशाल, आम्ही आमच्या घरी खुशाल—अशी तडजोड झाली असावी.

गोरे लोक अमेरिकेत गेले तेव्हां रेडइंडियन्सशी आरंभी झगडे झाले, परंतु नंतर रेडइंडियन्सना राखीव प्रदेश देऊन गोऱ्यांनी सहजीवनाचा प्रयोग केला. ते सहजीवन मात्र पृथक असेच राहिले. दोन्ही जमाती एक झाल्या नाहीत. भारतात ते ऐक्य घडले. शेजारी राहिले म्हणजे शेजारधर्म पाळला जातो. पाळावा लागतो. उसने द्यावे घ्यावे लागते. रोटीव्यवहार बेटीव्यवहार सुरू होतात आणि क्रमाक्रमाने ते वाढत जातात. भारतातील त्या दोन समाजांमध्ये असाच शेजारधर्म वाढत गेला. साहजिकच आर्यांचा राम घनश्याम म्हणजे सावळ्या वर्णाचा आणि कृष्ण कृष्णवर्णाचा झाला. दोघांच्या आज्यापणज्या अनार्य असणार. कालपरत्वे शेजार इतके जवळ आले की ते शेजार राहिले नाहीत. सहजीवनाचे रूपांतर एकत्र जीवनात झाले. इराणी सम्राटांनी सिंधुप्रदेश आपल्या साम्राज्याला जोडला तेव्हा इराण्यांशी भारतीय आर्यांचे संबंध आले. (इराणीसुद्धा आर्यच. लागबांधे जुनेच. मध्ये खंड पडला होता. भाऊबंद खूप भांडले होते.) इराणी 'स्'चा उच्चार 'ह्' करीत. म्हणून त्यांनी आम्हाला सिंधू म्हणताना हिंदू अशी हांक मारली. आम्ही ओ दिली आणि स्वतःला हिंदू म्हणू लागलो. याप्रमाणे आमचे नाव आम्हाला परक्यांनी दिले.

आर्यांची मूळची यज्ञप्रधान अग्निपूजा सोपी, सुटसुटीत आणि सामूहिक होती. समाजातील सर्व वर्गांना यज्ञविधीत आपआपले असे स्थान होते. आरंभी फारसे कर्मकांड नव्हते. ते पुढे वाढले. वर्णसंकर आणि संस्कृतिसंकर रूढ झाल्यावर वैदिक धर्म हिंदु धर्म झाला.

हिंदु धर्म एकेरी सुटसुटीत आणि बंदिस्त राहिला नाही. खानदेशवऱ्हाडाकडील देशमुखांच्या वाड्यांसारखा तो अवाढव्य अस्ताव्यस्त आणि ऐसपैस झाला. उघड्यावरचे यज्ञ काही काळ चालू

राहिले. परंतु त्यांच्या जोडीला बंदिस्त देवळे आली. देवळांच्या गर्भागारात पुरोहितवर्गाच्या हुकमतीखाली नवखे देव विराजमान झाले. जुने देव नवी नावे घेऊन पंक्तीत बसले. आणि पंगत म्हसोबा-मरीआईपर्यंत वाढत गेली. स्वीकृतीची सवय लागल्यावर माणूस थांबत नाही. पोटात कोंबीत जातो. हे असे कोंबलेले पचत नाही. प्रकृतीला मानवत नाही. साहजिकच अर्धवट पचन झालेल्या किंवा अपचन झालेल्या जमाती आणि व्यक्ती हौतात्म्य न पत्करता प्रसंग आला तेव्हा दुसऱ्या धर्मांना शरण गेल्या.

या संदर्भात कबीराच्या जमातीचे उदाहरण विचार करण्यासारखे आहे. कबीर जुलाहा म्हणजे कोष्टी जमातीचा. ही जमात सबंध उत्तर भारतात पूर्व-पश्चिम पसरली आहे. जुलाहा नाममात्र तरी हिंदु होते की नाही याची शंका आहे. त्यांच्या चालीरीती, आचार वैदिक हिंदूंपेक्षा भिन्न होते. कबीराच्या काही पिढ्यांपूर्वी जुलाहांची सारी जमातच्या जमात मुसलमान झाली. याचे कारण जुलाहांना मुसलमानांचा धर्म आणि चालीरिती जवळच्या आणि जुळत्या दिसल्या. नाममात्र हिंदु असलेल्या जुलाहांना नाव सोडून देणे कठीण गेले नसावे. या सामूहिक धर्मांतराचा अर्थ उघड आहे. हिंदुधर्माने जुलाहांना आणि तत्सम अनेक लोकसमाजांना खरेखुरे आपलेसे केले नव्हते. नुसता नावाचा शिक्का मारला होता आणि आपआपल्या वेगळ्या चालीरीतींना आणि धर्मविधींना चिकटून राहण्याचे स्वातंत्र्य दिले होते. पूर्व भारतातील कितीतरी समाज असे अर्धवट हिंदु होते. काही तर अर्धवट सुद्धा नव्हते. पूर्वीच्या पूर्व-भारतात मुसलमान बहुसंख्य होण्याचे हे एक मोठे कारण आहे.

वेगळेपण आणि विविधता हेच आमच्या संस्कृतीचे ठळक वैशिष्ट्य झाले आहे. सारे धर्म वेगवेगळे आहेत, आणि ते योग्य आहे हाच आमचा विचार. धर्माच्या संदर्भात खरा धर्म आणि खोटा

धर्म, हा विचारच आमच्यापाशी नाही. कोणताही धर्मपंथ, कोणतेही तात्त्विक दर्शन आमच्या दृष्टीने खोटे नव्हते. फक्त वेगळे होते. सुखवादी चार्वाक आम्हाला मंजूर. देवाकडे पाठ केलेला बुद्ध आम्हाला मंजूर. नास्तिक मताची दर्शने आम्हाला मंजूर. आम्ही आमच्या धर्माला काही निश्चित आणि स्पष्ट अशा आचार-विचारांचे कुंपण घातले नाही. लक्ष्मणरेषा ओढली नाही. आव जाव घर तुम्हारा अशी आमची उदार वृत्ती होती. वैदिक धर्माविरुद्ध बंड केलेल्या बुद्धाला आम्ही दशावतारात घेतले. मुसलमान आणि खिस्ती आमच्या पोटात सामील होण्यास तयार झाले असते तर अवतारांची संख्या बारापर्यंत गेली असती.

ज्याचा धर्म त्याला लखलाभ. देवाने ज्या धर्मात जन्माला घातले तोच धर्म ज्याच्यात्याच्यापुरता योग्य आणि हितावह. इस्लाम आणि खिस्ती धर्म त्या धर्मीयांना योग्य, आणि हितावह. ते त्यांचे सद्धर्म. तेच त्यांना सद्गती मिळवून देतील. परधर्म भयावह, हे तत्त्व सर्वांनाच लागू. आम्हांला इतरांचा धर्म भयावह इतरांना आमचा धर्म भयावह. तुम्ही तुमच्या धर्मात खुशाल, आम्ही आमच्या धर्मात खुशाल, असे हे आळसू बेजबाबदार सहजीवन भारतीयांच्या तत्त्वज्ञानात आहे. या विचारसरणीत धर्मप्रचार आणि प्रसार आणि धर्मांतर या कल्पनाच संभवत नाहीत.

आमचाच धर्म खरा आणि बाकीचे सारे खोटे. जे खोटे आहे त्याचा सर्वांनी त्याग केला पाहिजे आणि जे खरे आहे त्याचा आश्रय घेतला पाहिजे, असे आम्हाला कधीच वाटले नाही. तसे वाटले असते तर आम्ही इतरांना आपुल्यासारिखे तात्काळ केले असते. निदान तसे प्रयत्न केले असते. आपल्याला सद्धर्माचे जे सौभाग्य प्राप्त झाले त्यात 'हे विश्वचि माझे घर' असे मानणाऱ्या आम्ही विश्वाला वाटेकरी केले असते.

आम्ही तसे केले नाही. इतकेच नव्हे तर जे आमच्या धर्मात सामील झाले ते आपले सारे बाडबिस्तर घेऊनच आले. त्यांनी पूर्वीचे काही सोडले नाही. आम्ही त्यांचे बाडबिस्तर पत्करले.

आमच्यात धर्मयुद्धे झाली नाहीत याचे कारण हे असे आहे. कोणचाच धर्म खोटा नाही, ही आमची भावना. मग धर्मयुद्धाला प्रेरणा मिळणार कशी ? आमच्या देशात धर्मसभा झाल्या. वाद झाले. पूर्वपक्ष-उत्तरपक्ष झाले. अजिंक्यपत्रे दिली-घेतली गेली. राजकीय क्षेत्रात ज्याप्रमाणे पराभूताने मांडलिकत्व पत्करले की भांडण मिटे, त्याप्रमाणे धर्मक्षेत्रात अजिंक्यपत्र मिळाले की वाद संपे आणि विजयी आचार्य दिवसा मशाल पेटवून समाधानाने पुढे जात. सर्वच क्षेत्रात वैचारिक जयावर आम्ही समाधान मानले.

तत्त्वज्ञानालाच आम्ही धर्म समजत आलो. त्या ज्ञानाच्या वाटा अनेक होत्या. त्या सर्व आम्ही पतकरल्या. आमचा धर्म आमच्या बुद्धीत स्थिर झाला. खाली हृदयात उतरला नाही. अवश्यभेव आणि एकमेव असा जीवनमार्ग झाला नाही. परधर्मीयांशी धर्मसभांत पूर्वपक्ष-उत्तरपक्ष करायचा असता तर आमची जीभ सरसावली असती. आप्तवाक्ये काढण्यासाठी पोथ्या पुढे झाल्या असत्या. परंतु झाले काय, गाठ धर्मसभेत पडली नाही. रणांगणावरच पडली. मुकाबला सिद्धांतांशी आणि प्रमेयांशी झाला नाही; समशेरीशी झाला. आम्ही त्यात हरलो.

आम्ही हमेशा उदार होतो. कारण हमेशा उदास होतो. आमचे औदार्य आमच्या इच्छाशक्तीतून आणि विवेकातून प्रकट झाले नाही. आमच्या बेजबाबदार आळसातून बाहेर पडले.

—म्हणून आम्ही धर्मयुद्धे केली नाहीत याचे मला भूषण वाटत नाही. वाटलीच तर लाज वाटते.

हा म ष्ट्रा रा चे न म
म रा हा ष्ट्रा चे म न
रा चे म हा ष्ट्रा न म
म हा चे रा ष्ट्रा म न
रा म हा ष्ट्रा चे न म
म हा ष्ट्रा चे रा म न

महाराष्ट्राचे मन

महाराष्ट्राचे स्वतःचे असे मन आहे. मी त्याला मराठी मन म्हणतो. ते मन फार चांगले नसेल कदाचित. त्याच्यात गुणांपेक्षा दोष अधिक असू शकतील. तरी पण 'जे ब्रह्मांडी ते पिंडी' या न्यायाने ते माझे मन आहे. त्याच्या गुणदोषांचा माझ्याकडे वारसा आला आहे. आणि मी श्रद्धेने त्याचा स्वीकार केला आहे. स्वीकार केला आहे हे म्हणणे तितकेसे खरे नाही. मी लहानाचा मोठा झालो, वाढलो, तसे ते माझे मराठी मन माझ्याबरोबर वाढले आहे. ते माझ्या रक्तात, विचारात, उच्चारात आणि आचरणात व्यक्त झाले आहे. गुजरातेत गेलो, माळव्यात गेलो, वीस-वीस वर्षे राहिलो; पण हे मराठी मन माझ्याबरोबर होते. त्याने मला सोडले नाही. कसे सोडणार?

माझा अहंभाव त्याच्या माध्यमामधूनच प्रगट होत असतो. हा लेखसुद्धा तेच लिहीत आहे. मी केवळ निमित्तमात्र आहे.

होय, अहंभाव—अहंकार—हा मराठी मनाचा स्थायी भाव आहे. तसे म्हटले तर साऱ्याच मनात अहंभाव वास करीत असतो. परंतु मराठी मनाचा अहंभाव काही आगळाच आहे. तो जन्मभर पुरतो. तो मराठ्यांच्या जीवनाची प्रेरकशक्ती आहे. संकटे कोसळली आणि हतबुद्ध होऊन मराठी मन कोपऱ्यात बसले, म्हणजे हा अहंभाव आपली फणा वर उचलतो आणि म्हणतो, "मूर्खा, असा बावरलास काय? उद्याचे अखबारनवीस तुझ्याबद्दल काय लिहितील? ऊठ, कामाला लाग. केल्याने होत आहे रे, आधी केलेचि पाहिजे." आणि मग मराठी मन ताडकन् उठते आणि करू लागते.

हा असा दुर्दम्य अहंभाव उरी बाळगण्यासारखे महाराष्ट्राजवळ काय आहे? गोविंदाग्रजांनी म्हटल्याप्रमाणे तो दगडांचा देश आहे. गोविंदाग्रजांना कदाचित माहीत नसेल; पण दीड-दोन हजार वर्षांपूर्वी महाराष्ट्राच्या गोदाखोऱ्याचे नावच मुळी अश्मक राष्ट्र होते. ज्वालामुखीच्या भट्टीतून खरपूस भाजून निघालेल्या या निबर दगडांचा, कातळांचा महाराष्ट्राला अभिमान आहे. या दगडांनी उभा केलेला सह्याद्री महाराष्ट्राचे कुलदैवत आहे.

महाराष्ट्र कंगाल आहे. आणि त्याच्या कंगालपणाचासुद्धा आम्हाला अभिमान आहे. महाराष्ट्राचा सर्वांत मोठा आधुनिक महर्षी रानडे म्हणून गेला आहे, "It is the privilege of a brahmin to be learned and to be poor." साऱ्या मराठ्यांनाच हे लागू आहे. ज्ञानोपासना जाऊ द्या, पण दारिद्र्याची ही मिरास मात्र साऱ्या मराठ्यांना मिळाली आहे.

महाराष्ट्राची जमीन सुपीक नाही. भूकंपांच्या एकामागून

एक झालेल्या प्रचंड स्फोटांनी घडल्या गेलेल्या महाराष्ट्रभूच्या गर्भात पाणी नाही. खनिजेही नाहीत. पण या कंगाल जमिनीवर प्रेम आहे, निष्ठा आहे. मुळशीला 'जान का जमीन' म्हणत मराठ्यांनी फटके खाल्ले, प्राणही दिले. दडुीच्या जमिनीसाठी हटेल मराठा असाच अडून बसला.

मराठा ताठ मानेने चालतो. दारिद्र्याने तो लाचार झाला नाही. कोणाची नोकरी धरली तरी तो शिव्या खाणार नाही आणि लाथा तर कधीच खाणार नाही. अलाहाबादला विद्यार्थीदशेत पाहिलेले दृश्य मी विसरलो नाही. हॉस्टेलमधील बऱ्याच विद्यार्थ्यांचे खाजगी नोकर असत. एकेक विद्यार्थी खाटेवर पडून हुक्का ओढीत असे आणि त्याचा नोकर त्याचे पाय रगडी. नोकराची काही चूक झाल्यास त्याला लाथ बसे आणि ती मामुली शिक्षा असे. 'अबे ए लवंडे' ही गड्याला मारायची मामुली हाक असे. ही अशी किळस वाटण्याइतकी लाचारी महाराष्ट्रात सापडणार नाही. महाराष्ट्रात लाथा मारणारे धनीही नाहीत आणि खाणारे चाकरही नाहीत. अलाहाबादचा जमाना आता कदाचित बदलला असेल; पण तो फारसा बदलला असेल असे मला वाटत नाही. लाथा जिभेने आणि मनाने देता येतात.

महाराष्ट्राला पैशाचा लोभ नाही. पैशामागे लागण्याची हाव नाही. पैसा मिळाला तर अर्थात तो खिशात ठेवील, टाकणार नाही. पण तो मिळण्यासाठी तो जिवाचे रान करणार नाही. खरे म्हणायचे म्हणजे पैसा कमवायची महाराष्ट्रापाशी अक्कल नाही. मराठशाहीत एखादा कसबा वसवायचा झाला तर एखाद्या गुजराला तेथे अगत्याने बोलावून नेत आणि त्याला दुकान थाटून देत. आज महाराष्ट्रात गावोगाव मराठ्यांच्या मातीच्या खोपटांशेजारी गुजराचा एखादुसरा तेलपाणी खाल्लेला तुळतुळीत वाडा दृष्टीस

पडतो तो यामुळेच. गेल्या तीनशे वर्षात या गुजरांच्या केसाला धक्का लागला नाही. मराठा गडी आपल्या खोपटात दारिद्र्यात मशगुल आहे. गुजरामागून आपला लोटा घेऊन मारवाडी आला आणि गबर झाला. त्यांचेही महाराष्ट्रात यथास्थित चालले. सावकारी करणे, व्यापारउदीम करणे, हा मराठ्यांचा धर्म नाही. महाराष्ट्रात त्याची स्वतःची अशी वाण्याची जात नाही. जे वाणी आहेत ते बाहेरून आलेले आहेत. कदाचित कोकणातले संगमेश्वरी आणि कुडाळे वाणी अपवाद असू शकतील. पण हे कोकणी वाणीसुद्धा 'मराठे' बनले आहेत. आणि मराठ्यांचे गुणधर्म त्यांच्यात आले आहेत. मामा परमानंदासारखा गरिबी पत्करून मरेपर्यंत ज्ञानोपासना करणारा महापुरुष या कोकणी वाण्यातच निघाला.

याच्या उलट गुजरातचे आहे. मुनशी एकदा मला म्हणाले, "वाणिज्य हे गुजरात्यांच्या रक्तातच आहे. मग ते कोणत्या का जातीचे असेनात. आमचा नरसी मेहता जातीने नागर ब्राह्मण, फार मोठा भगवद्भक्त. पण तोही आपल्या काव्यात देवाला आळवताना त्याच्यावर हुंडी पाठवतो."

भास्करराव जाधव मराठ्यांविषयी नेहमी म्हणत, "मराठे गैरहिशेबी आहेत. हिशेबीपणा कसा तो त्यांना माहीत नाही." ते ऋण काढून सण करतील. जमाखर्च लिहायचा, शिल्लक काढायची, पुढचे अंदाजपत्रक तयार करायचे, पुढचे वेत आखायचे, आणि त्याच्या मागे चिकाटीने लागायचे, हे हिशेबी गुण महाराष्ट्राच्या वाट्याला आले नाहीत. मराठे मुळी आपल्या मनाची समजूत आणि समाधान करून बसले की व्यापार करावा तो गुजरांनीच. आपली 'उत्तम' शेतीच आपल्याला बरी. (काय पण ती उत्तम शेती! दिवे ओवाळा

तिच्यावरून !) मराठशाहीत 'उत्तम' शेती आणि मध्यम मुलुखगिरी असाच सिलसिला होता. मुलुखगिरीने मात्र कंगाल मराठ्याला दोनशे वर्षे चांगला हात दिला. विशेषतः पेशवाईत उत्तरेकडून आणि दक्षिणेकडून संपत्तीचा प्रवाह महाराष्ट्राकडे येत होता. गावोगाव पाटलांचे वाडे आणि गढ्या उभ्या राहिल्या आणि पाटलीणबाईच्या हातात गोठपाटल्या झळकल्या. वासुदेवशास्त्री खरे एकदा मला म्हणाले, "मुलुखगिरी संपली. 'खलक्ख खुदाका, अंमल अंग्रेज सरकारका' झाला आणि कृष्णा-भिवरा-गोदाकाठची तट्टे काम नाही म्हणून ठाणावर पटापट मेली. अटकेपार मराठ्यांना नेणाऱ्या मराठी तट्टांची अवलादच खलास झाली." नुसती तट्टेच मेली नाहीत. मराठ्यांच्या गढ्या उध्वस्त झाल्या. वाडे कोसळून पडले. त्यांच्यांत डुकरे इतस्ततः हिंडू लागली. गोठ आणि वज्रटीका मारवाड्याच्या दुकानी गेल्या. आणि दुष्काळात निवडुंगाची बोंडे खाण्याची पाळी आली.

अर्थोत्पादनाच्या मागे लागलेल्या लोकांत काही चांगले आणि काही वाईट गुण निर्माण होतात. ते बोलण्यांत गोड असतात. वागण्यात सौम्य असतात. शिष्टाचाराची नाजुक कला त्यांनी साध्य केली असते. आदरातिथ्यात ते कुशल आणि अगत्यवादी असतात. वागण्यात विनीतभाव असतो. तुम्ही बोललात तर खाडकन तुमचे बोलणे ते खोडून काढणार नाहीत. 'असेही असू शकेल' असे म्हणून ते मिळते घेतील. हे स्वभावगुण वाईट असतात, असे नाही. सुसंस्कृतपणाच्या सदरात ते मोडू शकतात. मराठ्यांच्यामध्ये या गुणांची उणीव आहे. मराठे गोडबोले नाहीत. त्यांच्या बोलण्यात आणि वागण्यात एक प्रकारचा रोखठोकपणा आणि रांगडेपणा आहे. ते संभाषणात फटकळ असतात. उत्तराला प्रत्युत्तर दिल्याखेरीज त्यांना राहवत नाही. समोरच्या माणसाचे

म्हणणे त्यांना पटले नाही तर गप्प बसणे किंवा मिळते घेणे त्यांच्या आईने त्यांना शिकवले नाही! साहजिकच मराठा बोलण्यात हमरीतुमरीवर येतो यात नवल नाही. फटकळपणा आम्हाला प्रांजळपणा वाटतो आणि रोखठोकपणा हा आम्ही प्रामाणिकपणा समजतो. दांभिकपणापेक्षा आणि खोट्या विनीत-भावापेक्षा हा फटकळ रोखठोकपणा केव्हाही चांगला हे मला मान्य आहे. दरबारी रिवाजातील खोटे हसणे, कृत्रिम शिष्टाचार, संभाषणातले ते गुळगुळीत कर्मणिप्रयोग, 'बसाउठा' ऐवजी 'आपल्याकडून बसणे-उठणे होऊ द्या' असले द्राविडी प्राणायाम मला आवडत नाहीत. तथापि संयम आणि ऊनोक्ती हे आधुनिक संस्कृतीचे इष्ट आणि अवश्य असे लक्षण आहे, हे आम्ही लक्षात ठेवले पाहिजे. आणि आमच्या बोलण्या-चालण्या-वागण्यात थोडा संयम थोडी आदब आणली पाहिजे.

विनोद हा आमच्या स्वभावातला एक स्थायी भाव बनला आहे. वेळीअवेळी, प्रसंग असो नसो, विनोद केल्याखेरीज आमचे भागत नाही. आमचे वाचक आणि श्रोते विनोदाला सोकावलेले असतात. नेहमी विनोद करणारा एखादा वक्ता एखाद्या गंभीर विषयावर बोलू लागला तर श्रोते 'आता जरा विनोद करा' अशी फर्माइश करतात आणि ती ऐकली जाते. परिणामतः आमच्या काही विद्वानांना जन्मभर विदूषक बनावे लागते. तसे पाहिले तर विनोद ही एक फार चांगली गोष्ट आहे. जीवनाला त्याने खुमारी येते. जगण्याला त्याने बळ येते. आपत्काळी त्याच्यामुळे दिलासा मिळतो. विनोद ताटातील चटण्या-कोशिंबिरी-पापड-लोणच्यांसारखा आहे. त्याच्यामुळे भोजनात रस उत्पन्न होतो. परंतु पापड-लोणच्यांनी श्रीखंडपुरीची किंवा बिरयानीची जागा घेतली तर कसे चालेल? रस उत्पन्न होईल, पण पोट भरणार नाही.

एकदा एका कमिटीच्या बैठकीत काका कालेलकर म्हणाले होते, "A Maharashtrian will rather lose a friend than lose an opportunity to make a joke at his expense." काकांनी महाराष्ट्रीयांबद्दल तृतीय पुरुष वापरला हे तितकेसे मला आवडले नाही; पण त्यांचे म्हणणे मला पटते. विनोद हा आमचा आता शाप होऊ पाहत आहे. त्याच्या आहारी जाऊन आम्ही सहानुभूती गमावू लागलो आहोत असे मला वाटते.

मला स्वतःला सुतकी चेहरा करून गंभीरपणाने जगणे फार कठीण जाईल. जन्मभर मी विनोद करीत आलो आहे. नको तेव्हाही मी विनोद केला आहे, असे मला स्मरते. तरीही पण मला असे सांगावेसे वाटते की, विनोद असावा, पण तो तोंडी लावण्यापुरताच असावा. निदान तो जेवण्यापूर्वीच्या ॲपिटायझर-सारखा असावा. कोणाच्या हृदयाला जखम होईल, कोणाला झोंबेल, कोणाच्या खाजगी चरित्रावर किंवा व्यंगावर त्याच्यामुळे अतिक्रमण होईल, असा तो नसावा. तो स्वच्छ असावा, खुला असावा; घाणेरडा, विकृत आणि छुपा नसावा. नाजुकसा चिमटा अवश्य घ्यावा, पण वोचकारे घेऊ नयेत. आणि गुद्दे तर मारूच नयेत. अर्थात आणीबाणीचा प्रसंग आला म्हणजे सगळीच शस्त्रे वापरावी लागतात. तेथे मामुली जीवनातला विवेक उपयोगी पडत नाही. परंतु प्रसंग आणीबाणीचा असावा लागतो. आणि शस्त्र वापरणाराच्या मनगटात जोम असावा लागतो.

महाराष्ट्राच्या वाट्याला ही ताठर जिद्द, हा खुपणारा अहंभाव का आला ? मला त्याचे कारण स्पष्ट दिसते. आम्हा मराठ्यांच्या मानगुटीवर आमच्या भूतकाळाचे—आमच्या इतिहासाचे—ओझे आहे. आणि हे ओझे आम्ही अनेक पिढ्यांपासून वाहत

म्हणणे त्यांना पटले नाही तर गप्प बसणे किंवा मिळते घेणे त्यांच्या आईने त्यांना शिकवले नाही! साहजिकच मराठा बोलण्यात हमरीतुमरीवर येतो यात नवल नाही. फटकळपणा आम्हाला प्रांजळपणा वाटतो आणि रोखठोकपणा हा आम्ही प्रामाणिकपणा समजतो. दांभिकपणापेक्षा आणि खोट्या विनीत-भावापेक्षा हा फटकळ रोखठोकपणा केव्हाही चांगला हे मला मान्य आहे. दरबारी रिवाजातील खोटे हसणे, कृत्रिम शिष्टाचार, संभाषणातले ते गुळगुळीत कर्मणिप्रयोग, 'बसाउठा' ऐवजी 'आपल्याकडून बसणे-उठणे होऊ द्या' असले द्राविडी प्राणायाम मला आवडत नाहीत. तथापि संयम आणि ऊनोक्ती हे आधुनिक संस्कृतीचे इष्ट आणि अवश्य असे लक्षण आहे, हे आम्ही लक्षात ठेवले पाहिजे. आणि आमच्या बोलण्या-चालण्या-वागण्यात थोडा संयम थोडी आदब आणली पाहिजे.

विनोद हा आमच्या स्वभावातला एक स्थायी भाव बनला आहे. वेळीअवेळी, प्रसंग असो नसो, विनोद केल्याखेरीज आमचे भागत नाही. आमचे वाचक आणि श्रोते विनोदाला सोकावलेले असतात. नेहमी विनोद करणारा एखादा वक्ता एखाद्या गंभीर विषयावर बोलू लागला तर श्रोते 'आता जरा विनोद करा' अशी फर्माइश करतात आणि ती ऐकली जाते. परिणामतः आमच्या काही विद्वानांना जन्मभर विदूषक बनावे लागते. तसे पाहिले तर विनोद ही एक फार चांगली गोष्ट आहे. जीवनाला त्याने खुमारी येते. जगण्याला त्याने बळ येते. आपत्काळी त्याच्यामुळे दिलासा मिळतो. विनोद ताटातील चटण्या-कोशिंबिरी-पापड-लोणच्यांसारखा आहे. त्याच्यामुळे भोजनात रस उत्पन्न होतो. परंतु पापड-लोणच्यांनी श्रीखंडपुरीची किंवा बिरयानीची जागा घेतली तर कसे चालेल? रस उत्पन्न होईल, पण पोट भरणार नाही.

एकदा एका कमिटीच्या बैठकीत काका कालेलकर म्हणाले होते, "A Maharashtrian will rather lose a friend than lose an opportunity to make a joke at his expense." काकांनी महाराष्ट्रीयांबद्दल तृतीय पुरुष वापरला हे तितकेसे मला आवडले नाही; पण त्यांचे म्हणणे मला पटते. विनोद हा आमचा आता शाप होऊ पाहत आहे. त्याच्या आहारी जाऊन आम्ही सहानुभूती गमावू लागलो आहोत असे मला वाटते.

मला स्वतःला सुतकी चेहरा करून गंभीरपणाने जगणे फार कठीण जाईल. जन्मभर मी विनोद करीत आलो आहे. नको तेव्हाही मी विनोद केला आहे, असे मला स्मरते. तरीही पण मला असे सांगावेसे वाटते की, विनोद असावा, पण तो तोंडी लावण्यापुरताच असावा. निदान तो जेवण्यापूर्वीच्या ॲपिटायझर-सारखा असावा. कोणाच्या हृदयाला जखम होईल, कोणाला झोंबेल, कोणाच्या खाजगी चरित्रावर किंवा व्यंगावर त्याच्यामुळे अतिक्रमण होईल, असा तो नसावा. तो स्वच्छ असावा, खुला असावा; घाणेरडा, विकृत आणि छुपा नसावा. नाजुकसा चिमटा अवश्य घ्यावा, पण बोचकारे घेऊ नयेत. आणि गुद्दे तर मारूच नयेत. अर्थात आणीबाणीचा प्रसंग आला म्हणजे सगळीच शस्त्रे वापरावी लागतात. तेथे मामुली जीवनातला विवेक उपयोगी पडत नाही. परंतु प्रसंग आणीबाणीचा असावा लागतो. आणि शस्त्र वापरणाराच्या मनगटात जोम असावा लागतो.

महाराष्ट्राच्या वाट्याला ही ताठर जिद्द, हा खुपणारा अहंभाव का आला? मला त्याचे कारण स्पष्ट दिसते. आम्हा मराठ्यांच्या मानगुटीवर आमच्या भूतकाळाचे—आमच्या इतिहासाचे—ओझे आहे. आणि हे ओझे आम्ही अनेक पिढ्यांपासून वाहत

आलो आहोत. माझी पिढी तर महाराष्ट्राच्या इतिहासाच्या बाशा नशात झिंगली होती. आमची मने हरि नारायणांच्या कादंबऱ्यांवर पोसली होती. आम्हाला समकालीन माणसांपेक्षा शिवाजीमहाराज, बाजी प्रभू, मुरारबाजी, तानाजी, संभाजी, बाजीराव, दत्ताजी, जनकोजी, बापू गोखले—ही माणसे अधिक वास्तविक वाटत. आम्ही आमच्या भावना ओंजळी भरभरून या भूतकालाला वाहिल्या होत्या. अलीकडच्या पिढीवर या नशेचा अंमल नाही. पण त्याचा परिणाम खास आहे. रक्त आमचेच आहे ते.

उज्वल इतिहास असणे ही नशिबाची गोष्ट आहे. हे नशीब महाराष्ट्राच्या वाट्याला पुरेमाप आले आहे. मराठ्यांचा इतिहास अभिमान बाळगण्यासारखा आहे. महाराष्ट्राच्या रणांगणावर जेथे मराठ्यांचे रक्त सांडले तेथेच ब्राह्मणांचे आणि परभांचेही सांडले. या सांडलेल्या रक्ताने महाराष्ट्र समाजाला एकजीव केले आहे. ताठर बनविले आहे. इतर काही प्रदेशांना म्हणण्यासारखा इतिहास नाही. मराठ्यांनी मोगलांना खडे चारले आणि आनंदवनभुवनात स्वराज्य स्थापिले. स्नानसंध्या करावयास उदंड पाणी आणले. मोडली क्षेत्रे परत मांडली. इतर प्रांतांनी इस्लामी सत्तेशी मिळते घेतले. ते तिच्याशी बरेचसे समरस झाले. त्यांनी मोगलांचे स्वामित्व पत्करले. आता मोगल गेले. त्यांच्यामागोमाग इंग्रजही गेले, परंतु रुजलेले पूर्वग्रह शिल्लक राहिले आहेत. आमच्या मनात, आणि इतरांच्यासुद्धा. इतिहास उरी बाळगायचा असतो तो त्याच्यापासून धडे शिकण्याकरिता. पूर्वी चुका झाल्या त्या आता होऊ नयेत म्हणून. यासाठी आम्ही मराठ्यांनी आपल्या खांद्यावरचे भूतकालाचे ओझे थोडे कमी केले पाहिजे. वर्तमानकाळाकडे थोड्या अधिक

चोखंदळपणाने पाहिले पाहिजे आणि भविष्यकाळाकडे वाटचाल केली पाहिजे. इतर प्रदेशांनी देखील इतिहासाकडे अजिबात पाठ फिरवून बसू नये. त्यात धोका आहे, आत्मघात आहे. इतिहासाकडून प्रेरणा घ्यायची असते. तपशील घ्यायचा नसतो. कारण इतिहासाची तशी पुनरावृत्ती कधीच होत नसते.

महाराष्ट्र थोडासा आणि बेताचा धर्मलंड आहे. तो नास्तिक नाही. परंतु इतर क्षेत्रांप्रमाणे धर्मक्षेत्रात सुद्धा आंधळेपणा किंवा लघळपणा पत्करण्यास तो तयार नाही. श्रद्धेपेक्षा विवेकावर त्याचा जास्त भर आहे. मराठी भाषेत गीतेवर जितक्या टीका झाल्या तितक्या इतर कोणत्याही भाषेत झाल्या नाहीत. आणि ही प्रथा शतकानुशतके चालत आली आहे. अध्यात्मक्षेत्रात एखादा सिद्धान्त स्थापायचा, पूर्वपक्ष-उत्तरपक्ष करायचा, त्या सिद्धाताचे खंडन किंवा मंडन करायचे, अशी परंपरा अखंड आहे. म्हणजेच महाराष्ट्र बुद्धिवादी आहे. याचा अर्थ असा नाही की महाराष्ट्रात इतर प्रदेशांपेक्षां अधिक बुद्धि आहे. कदाचित तमीळनाड आणि बंगाल बुद्धीने महाराष्ट्रापेक्षा वरचढ असतील; परंतु देवाने महाराष्ट्राला जी भलीबुरी बुद्धि दिली आहे तिलाच महाराष्ट्र अग्रपूजेचा मान देतो आणि तिच्या निकषावर सर्व धर्मविचार घासूनपुसून पारखतो. ही क्रिया करताना इंग्रजीत ज्याला 'हेअर-स्प्लिटिंग' म्हणतात ते महाराष्ट्राच्या हातून वादविवादात आणि चर्चेत पुष्कळ वेळा होत असते. ज्ञानेश्वरांपासून विनोबांपर्यंत साऱ्या महाराष्ट्रीय संतांनी आपले म्हणणे चिकित्सक वृत्तीने अर्ग्यू केले आहे. परवाचीच गोष्ट घ्या. बिहारमध्ये एका गृहस्थाने प्राणांतिक उपोषण सुरू केले. योगायोगाने त्या वेळी विनोबांचा त्या गावी मुक्काम पडला. विनोबा त्या गृहस्थाला भेटले. त्यांनी त्याला चार समजुतीच्या गोष्टी सांगितल्या. गृहस्थ

म्हणाला, "तुमचे म्हणणे मला पटत नाही. परंतु तुम्ही मोठे आहात. हुकूम देत असाल तर उपास सोडतो." विनोबांच्या जागी गांधी असते तर हुकूम देऊन मोकळे झाले असते. विनोबा खाडकन् उभे राहिले आणि म्हणाले, "हुकूम देणारा मी कोण? मी सांगतो ते तुमच्या बुद्धीला पटत असेल तर उपास सोडा. पटत नसेल तर तुमच्या तत्त्वासाठी अवश्य मरा."—आणि विनोबा चालते झाले.

धर्माच्या नावाखाली महाराष्ट्राने प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष 'सेक्स'चा धुडगूस कधी घातला नाही. वल्लभ संप्रदाय महाराष्ट्रात निघू शकला नाही. राधेला महाराष्ट्राने स्थान दिले नाही. गीतगोविंद महाराष्ट्रात झाले नाही. उत्तर भारताने विष्णूला कृष्ण बनविले आणि त्याला जोडीला राधा दिली. महाराष्ट्राने विष्णूला विठोबा बनविले, पण रुक्मिणीला मात्र कोपऱ्यात एक लहानसे देऊळ दिले. देवाचा असा मानवाप्रमाणे संसार थाटायचा ही भोळी श्रद्धा महाराष्ट्राला मंजूर नाही. धर्माच्या परिभाषेत ज्याला 'सरेंडर' म्हणजे शरणागती म्हणतात ती महाराष्ट्राने पत्करली नाही. आणि साहजिकच देवाला आपला वल्लभ मानले नाही. महाराष्ट्र-संतांनी देवाला मनोभावाने आळवले. कधीमधी ते त्याच्याशी सलगीने भांडलेसुद्धा. महाराष्ट्राच्या जनाईने तर देवाला "अरे विठ्या, विठ्या, विठ्या। मूळ मायेच्या कारट्या॥ तुझी रांड रंडकी झाली। मूळ सावित्री चुडे ल्याली॥" अशा शेलक्या शिव्या देऊन टाकल्या. राजस्तानी मीराबाईप्रमाणें "हूं तो हरीनी लाडली—" असे कधी म्हटले नाही.

कलाभिरुची आणि सौंदर्यदृष्टी महाराष्ट्रात नाही, असे मी म्हणणार नाही. तसे म्हटले, तर मराठे हमरीतुमरीवर येतील.

परंतु हे गुणधर्म महाराष्ट्राच्या जीवनात आणि आचरणात प्रतिबिंबित झालेले मला दिसत नाहीत. अजंठा, वेरूळ, घारापुरी या अमर कलाकृती महाराष्ट्रातच निर्माण झाल्या आणि ही निर्मिती सतत सहाशे वर्षे चालली होती. सहाशे वर्षे बाहेरून तेच ते कसबी आणि कलाकार कसे आणता येतील? परंतु ही कलाकारांची अवलाद चालुक्य आणि राष्ट्रकूटांच्या नंतर लोप पावली. गेल्या चारशे-पाचशे वर्षांत महाराष्ट्रात सुंदर व भव्य अशी वास्तुकला, शिल्पकला, चित्रकला निर्माण झाली नाही. महाराष्ट्रात फळबागा झाल्या, पण सुंदर फुलांचे मनोवेधक घाटणीचे बगीचे निर्माण झाले नाहीत. नहर बांधून बागांतून पाणी खेळवण्याची इराणी कला महाराष्ट्राला सापडली नाही.

महाराष्ट्राच्या पोषाखातही शान नाही. बाराबंदी हा महाराष्ट्राचा विशेष दिसतो! गेल्या शतकातले, चाळिशी उलटण्यापूर्वीच म्हातारे दिसणारे, भले मोठे पागोटे व भल्या मोठ्या मिशा धारण करणारे विष्णुशास्त्री, आगरकर, इत्यादिकांची चित्रे पाहिली म्हणजे खेद वाटतो आणि या भल्या माणसांना जीवनकला गावली होती का असा संशय येतो. भर तारुण्यात म्हातारे कपडे घालणारांची मनेही अकाली म्हातारी होतात. शास्त्रीबुवांच्या किंवा आगरकरांच्या लिखाणात खिलाडूपणा दिसत नाही याला कारण त्यांच्या डोक्यांवरचे ते पागोट्यांचे जबरदस्त ओझे! तुमच्या कानांत सांगतो, मोठ्याने बोलू नका; या जुन्या जमान्यातल्या तरुण बुद्रुकांनी कोणा स्त्रीवर काव्यमय रोमँटिक प्रेम कधी केले होते का? का ते सगळे 'प्रजायै गृहमेधिनः' होते? हा एक संशोधनाचा विषय आहे.

आमच्या भोजनात शान नाही, वैचित्र्य नाही, रुची नाही. मला वाटते, पोशाखात बाराबंदी तसे जेवणात पिठले! आमचे

मराठे शतकानुशतके सागुती खातात, परंतु तिचे नाना प्रकारचे रुचकर पदार्थ कसे करायचे ते ते मुसल्मानांपासून शिकले नाहीत. मासाचे सारे रुचकर पदार्थ इराणी आहेत. दुसऱ्या बाजीरावाने भोजनकलेत अभिनंदनीय प्रगति केली होती म्हणतात. पण तो ती कला आपल्याबरोबर ब्रह्मावर्ती घेऊन गेला. ती मागे राहिली नाही. बाजीरावानंतरचे पुणे तेलंगी आचाऱ्यांच्या अंमलाखाली आहे. ते पकवतील ते खावे, असा सिलसिला आहे. तीच आळवाची पातळ भाजी—ती वटाट्याची सुकी भाजी—तो पहिला, दुसरा अन् तिसरा भात—त्या अपरिहार्य जिलब्या आणि (हा हन्त, हा हन्त) द्रोणातून हमखास घरंगळणारा तो मठ्ठा. महाराष्ट्राला काय खावे, कसे खावे, हे शिकले पाहिजे! एवंच, मराठी जीवनात 'ग्रेस' नाही असे म्हणावे लागते.

हा असा आहे आपला महाराष्ट्र. माझा महाराष्ट्र. आणखी पुष्कळसा आहे, पण असा आहे हे खास. तो मला आवडतो. त्याचे दोषही मला आवडतात. कारण ते माझे दोष आहेत. इतकेच नव्हे तर ते बरेचसे दोष महाराष्ट्राच्या सद्गुणांतूनच निघाले आहेत. जरा काटा भलतीकडे झुकला की दोष आकार घेऊ लागतो. परंतु महाराष्ट्राची प्रकृति निकोप आहे. जीवनाचा तारेवरचा नाच करताना त्याला भोंड येत नाही. तारेवरून जाताना झोक गेला तर तो सावरून घेतो व पुढे चालतो; कारण तो मुळात प्रामाणिक आहे.

बा र हे चा
चा हे बा र
र बा हे चा
बा हे चा र
हे चा र बा
चा बा र हे

बा हे र चा

सत्तरी ओलांडली. मुक्काम जवळ जवळ येत आहे. नीट दिसत नाही. डोळे अधू आहेत आणि तेच बरे आहे. परंतु वाटचाल करताना रस्त्यावरच्या खाणाखुणा दिसतात. आता मुक्काम फार दूर नाही हे कळते. हळूहळू मन तयार होत आहे.

प्रवाहात असून मी तटस्थ आहे. तटावरचे आणि पलीकडचे जीवन दृष्टीपथात येते. कुणी रडत आहेत, कुणी हसत आहेत; कुणी हतबुद्ध झाले आहेत. हताश होऊन कुणी माना खाली टाकल्या आहेत. कुणी यशाच्या उन्मादाने टेन्या बडवत आहेत, विजयाच्या आरोळ्या ठोकीत आहेत. मला ते सारे दिसते, ऐकू येते. परंतु मनावर त्या बहुरंगी जीवनाचा फारसा परिणाम होत नाही. त्या हर्षाला अर्थ नाही, आक्रोशाला किंमत नाही हे

मी जाणतो आणि आपल्याशीच हसतो.

जीवनातल्या सुखदुःखांपासून मी अलिप्त होत चाललो आहे. जगात असून जगावेगळा आहे. घरात असून दूर आहे. जे घडते ते मनापाशी येते, हळूच स्पर्श करते आणि निघून जाते. आधी सवय करावी लागली. जड गेले. चौफेर पांगलेले मन आवरायला कष्ट पडले. आता सवय झाली आहे. मन स्वस्थ आहे, उदासीन आहे. कामूने 'आउटसायडर' (L' etranger) हा मोठा सूचक शब्द शोधून काढला. मला तो आवडला. मी अद्याप पुरा 'आउटसायडर' झालो नाही. मी त्या मार्गावर असलो तरी माझी पातळी बरीच खालची आहे. कामूच्या 'आउटसायडर' इतके विरागी होण्यास अजून बरीच मजल मारावी लागेल. पुष्कळच तपश्चर्या करावी लागेल. मन पुष्कळच टणक करावे लागेल. मला तितके यश अद्याप मिळाले नाही. परंतु मी त्या मार्गावर आहे खास.

'आउटसायडर' घरात असून घरावेगळा असतो. घराच्या उंबऱ्यावर उभा असतो. घरात अनेक माणसे असतात. भलेबुरे अनुभव घेत असतात. कुणाला चटके बसतात; कुणाचे मन फुलून निघते. 'आउटसायडर' उंबऱ्यावर उभा राहून सारे पाहतो आणि उदासीन असतो.

कामूच्या 'आउटसायडर'ची आई मरते. त्याला आईचे सोइरसुतक नसते. तिच्या मरणाचे दुःख नसते. दुःख ही एक भावात्मक (positive) भावना आहे. ती त्या तटस्थाला स्पर्श करीत नाही. आईचा मृत्यू त्याच्या मनाला नुसते बोट लावून जातो. तो रोजनिशीत शांतपणे लिहितो, "आई आज मेली. कदाचित काल. नक्की सांगवत नाही"...

...हेमिंग्वेने 'सोल्जर्स होम' या गोष्टीत या तटस्थ-उदासीन

वृत्तीचे विदारक चित्र काढले आहे. क्रेब्ज नावाचा एक अमेरिकन तरुण आहे. तो धर्मशील, आशावादी आणि उमदा असतो. देवळात न चुकता जातो, मनोभावाने प्रार्थना करतो. त्याच्यावर महायुद्धात फ्रान्सच्या रणांगणावर जाण्याची पाळी येते. लाखो माणसे किड्यामुंग्यांसारखी पटापट असहायपणे मरताना तो पाहतो. त्याला जाणवते, They were animals. They died like animals. या नव्या जाणिवेने त्याची वृत्ति बदलते. तो जगावेगळा होतो. त्याच्या मधला माणूस नाहीसा होतो. क्रेब्ज युद्ध संपल्यावर अमेरिकेत घरी येतो. ते त्याचे आता घर नसते. तो समाज, ते देऊळ, ते गाव आणि त्यातील जीवन त्याला पारखे होते. इतकेच नव्हे तर क्रेब्ज आपल्या स्वतःच्या मनासच पारखा होतो. तिऱ्हाईतपणाने त्याच्याकडे पाहतो. त्याला कशाचा आनंद वाटत नाही. कसलेच दुःख खुपत नाही. जेवताना आई विचारते, 'बाळ, तुझे माझ्यावर प्रेम आहे ना?' क्रेब्ज संथपणे घास घेत म्हणतो, 'नाही.' क्रेब्जने पोटापाण्यासाठी काही रोजगार पाहावा म्हणून त्याची धर्मशील आई त्याला सांगते, 'देवाच्या राज्यात प्रत्येक माणसाला काम नेमून दिलेले आहे. तुझ्यासाठी सुद्धा काही असेलच.' क्रेब्जने उत्तर दिले, 'मी देवाच्या राज्यात राहत नाही.'

हे दोन 'आउटसायडर' अगदी शेवटच्या टोकाला पोहोचलेले आहेत. आत्महत्या करणे हाच एकमेव मार्ग त्यांना उरला आहे. माझा तो मार्ग नाही. या तटस्थांना वाटत असलेली आत्मघृणा माझ्यात नाही. मला या विराग्यांच्या पंक्तीत बसायचे नाही. अपार औदासिन्य आणि असीम ताटस्थ्य हे या विराग्यांचे लक्षण आहे. ते जगावेगळे असतात, तसेच स्वतः वेगळेही असतात. आणि स्वतःला परक्यासारखे वागवितात. 'आउटसायडर'ला जग

कसे वाटते हे कामूने थोड्याच अर्थपूर्ण शब्दांत सांगितले आहे—The Benign Indifference of the Universe. सारे विश्वच तटस्थ आणि उदासीन. जगातील सारेच एकमेकांपासून अलग आणि अलिप्त, परस्पराविषयी उदास आणि बेफिकीर. कोणाचे कोणाशी नाते नाही. स्वतःच्या जीवनातील संवेदना, जाणिवा आणि घटना, यांसुद्धा परस्परांपासून अलिप्त, हा सार्त्रचा अस्तित्ववाद. अस्तित्व समोर आलेल्या क्षणाला आहे, सलग आणि एकसूत्री अशा जीवनाला नाही. सार्त्र हा आपल्याकडच्या बौद्धांप्रमाणे क्षणवादी आहे. त्याच्या दृष्टीने मनुष्य आल्या क्षणात त्या क्षणापुरता जगत असतो. त्या क्षणाने वाढून आणलेले प्राप्त कर्तव्य करीत असताना त्याला स्वतःच्या मागील अनुभवांचा, बापजाद्यांच्या संचिताचा उपयोग होत नाही. जीवनातील प्रत्येक प्रसंग हा नवा संग्राम असतो. नव्या संग्रामाला नवी हत्यारे लागतात, जुनी चालत नाहीत.

'आउटसायडर' कर्मपराङ्मुख असतो. कारण कर्तव्य ही वस्तु त्याला माहीत नसते. परंतु काही विरागी माणसे कर्मयोगी असतात. कर्म करतात परंतु त्या कर्मात आणि त्याच्या फळात त्यांचे मन गुंतलेले नसते. टी० ई० लॉरेन्स हा एक या विरागी कर्मयोग्यांचे उत्तम उदाहरण आहे. तो अस्सल 'आउटसायडर' होता. उदासीन आणि अलिप्त होता. परंतु कर्मवीर होता. ज्या अरबांना तुर्की सत्तेविरुद्ध बंड करण्यास त्याने प्रवृत्त केले आणि त्यांचा पुढाकार घेतला त्या अरबांविषयी त्याला यत्किंचित आपलेपणा वाटत नव्हता. लॉरेन्स स्वतःला कधीच शिपाईगडी समजला नाही. अरबांचे स्वातंत्र्य या एकच जबर विचाराने त्याच्या मनाचा आणि जीवनाचा ताबा घेतला होता. आणि त्या विचाराने नाक धरून लॉरेन्सला कर्म करण्यास

भाग पाडले. लॉरेन्सने गीताज्ञेप्रमाणे केवळ निमित्तमात्र होऊन कर्म केले.

लॉरेन्स माणूसघाणा होता. माणसाचे सान्निध्य त्याला नकोसे होते. माणसाने स्पर्श केला तर त्याच्या अंगावर शहारे येत, लॉरेन्स लिहितो, 'कुणी माझ्याकडे विशेष लक्ष दिले तर माझे मन अस्वस्थ होते.' विचार हेच लॉरेन्सचे जीवन होते. विचारच त्याला मार्ग दाखवीत आणि पुढे नेत. तो कळवळून लिहितो, 'I felt mean to take the place of a man of action. My nature was thought-ridden...I hate responsibility. All my life objects have been gladder to me than persons and ideas than objects.' एका राष्ट्राचा पुढाकार घेऊन प्राणपणाने (प्राणपणाने म्हणावे का ? युद्धात लॉरेन्सचा प्राण नव्हता, नुसता विचार होता.) लढणाऱ्या एका कर्मवीराचे हे उद्‌गार आहेत.

लॉरेन्स लिहितो, 'माझ्या देहात एक फकीर वास करीत आहे.' विचाराने पछाडले म्हणजे लॉरेन्स कर्म करायचा. परंतु तटस्थ असायचा. एकजणाने त्याच्या जीवनाविषयी म्हटले आहे, "तो केवळ नुसता एक नळ आहे. त्या नळातून त्याचे जीवन वाहत गेले." हा विचार अधिक स्पष्ट करताना याच लेखकाने म्हटले आहे, "He is never alive to what he does."

ज्या अरबांसाठी लॉरेन्सने जिवाचा आटापिटा केला त्यांना काम संपल्यावर झुरळासारखे झटकून तो इंग्लंडात परत आला. त्याला अमाप लोकप्रियता मिळाली होती. तिचा त्याने तिरस्कार-पूर्वक अव्हेर केला. त्याला माणसे नको होती, जमीन बोचत होती. म्हणून तो स्वतःचे नाव बदलून विमानदलात मामुली चाकरी करू लागला. आकाशात विमनस्कपणे भटकू लागला.

त्याला गती हवी होती. मिळाली तर विजेची गती हवी होती. आकाशात आणि जमिनीवर तो वाऱ्याच्या वेगाने धावला आणि एके दिवशी टेकडीवरून भरधाव मोटरसायकल सोडून मृत्युमुखी पडला. ती त्याची आत्महत्याच म्हणायची. आत्महत्येचे त्याला विलक्षण आकर्षण होते. लॉरेन्स लिहितो, "मनाच्या आत्महत्येपासून केवळ माझ्या दुबळेपणाने मला मागे ओढले" या अखेरच्या प्रसंगी मात्र दाद लागली. मनाने आणि देहाने तरुणपणी बरोबरच आत्महत्या केली. भगवान कृष्णाला अर्जुनापेक्षा लॉरेन्स फार आवडला असता. लॉरेन्स रथावर असता तर कृष्णाला भगवद्गीता सांगण्याचे प्रयोजन राहिले नसते.

'आउटसायडर'चे हे काही नमुने सांगितले. या विरागी कलंदरांच्या पंक्तीत बसण्याची माझ्यात पात्रता नाही. मी जीवनापासून त्यांच्याइतका फटकून चालत नाही. कोणत्याच जबरदस्त विचाराने आजवर माझ्या मनाचा ताबा घेतला नाही. पुष्कळ विचार आले. कृतीही घडली. परंतु कृती घडल्यावर निरोप दिला. कोणताच प्रभावी विचार जीवनात फार काळ टिकला नाही. कुणाच व्यक्तीला किंवा विचाराला मी समर्पण केले नाही; पुष्कळ दिले, पण सर्वस्व दिले नाही. सर्वस्व दिल्याखेरीज समर्पण होत नाही. मला वाटते मी कृपण होतो, दुबळा होतो आणि थोडा भित्राही होतो. कापुरुषाला समर्पण साधत नाही.

कामूच्या नायकाप्रमाणे मला आत्महत्येचे आकर्षण नाही. मरण ही एक मामुली बाब आहे असेही मी मानीत नाही. खरे सांगायचे म्हणजे मरणाचा विचार अद्याप मनाला शिवत नाही. माणसाने किंवा पुस्तकाने तो पुढे आणला तर मी पाठ फिरवतो आणि वाळूत चोच खुपसतो.

...मरणाप्रमाणे जीवनाचाही सोस नाही. त्याचा कधी पाठलाग

केला नव्हता. पाठही फिरवली नव्हती. आपणहून पुढे गेलो नाही. जे मिळाले ते पावले. माझ्या जीवनात कर्तृत्वाला फारसे स्थान आहे असे मी समजत नाही. जीवनातील महत्त्वाच्या घटना योगायोगानेच घडल्या. आणि मी थोड्या समंजसपणाने हातभार लावला. सार्त्र म्हणतो, आपण ज्याला स्वयंनिर्णय म्हणतो तो त्या त्या प्रसंगी प्राप्त झालेल्या परिस्थितीचा अपरिहार्य परिपाक असतो. मला ते आता पटू लागले आहे. अभिमान गळला. अस्मिताही संकोच पावली. आयुष्यातले कितीतरी प्रसंग आपोआप तर कधी दुसऱ्यांच्या कर्तृत्वाने घडले आहेत. आणि दुसऱ्यांचे ते कर्तृत्व हा सुद्धा प्राप्त परिस्थितीचाच परिणाम होता. त्यांनाही मी श्रेय देऊ शकत नाही.

...एक जण लिहितो, "The lives of these people are contingent on events. If things stop happening, they would stop being." विधान थोडेसे अतिशयोक्त असले तरी त्यातील विचार मला मान्य आहे. आता हेच पहा ना, माझा आणि वत्सलेचा प्रीतिविवाह झाला असे मी निखालसपणे म्हणू शकत नाही. खरे म्हणजे तो बव्हंशी योगायोग होता. आम्ही परस्परास अपरिचित अशी दोघे भिन्न स्थळाहून योगायोगाने मुंबईत एस० टी० कॉलेजात एकत्र आलो. जे आयते वाढून आले त्याचा मी समजूतदारपणाने स्वीकार केला. हात थोडा पुढे केला; एवढेच माझे कर्तृत्व. नाही तरी समजूतदारपणाखेरीज माणसाजवळ स्वतःचे असे असते तरी काय ? शहाणपण तेच असते.

बराचसा विरागी व बाहेरचा (outsider) असलो तरी मी सिनिक नाही. जगात जे चालले आहे त्याच्यात भाग घेण्याचे, त्याच्याशी लगट करण्याचे सोडून दिले असले तरी

94933

त्याच्याविषयी मनात तिरस्कार नाही. काही संस्था हौसेने काढल्या. जीवाभावाने सांभाळल्या आणि वाढवल्या. राजीनामे देऊन साऱ्यांमधून अलीकडे अंग काढून घेतले; परंतु त्या नीट चालाव्यात अशीच मनात इच्छा असते.

सिनिकची वेजबाबदार तुच्छता माझ्यामध्ये नाही. 'आउट-साइडर'ची तटस्थता आहे. तीही अलीकडेच आली आहे. आणि हळूहळू वाढत आहे. हे असेच चालत आले आहे. आणि पत्करावे लागले आहे. जे जे होईल ते आपण थोड्या दुरून पाहात राहावे. त्याच्याविषयी दुरावा बाळगू नये. सलगीही करू नये. सलगी करण्याचे आपले दिवस गेले. आपला डाव संपला. आपण बाद झालो. पण खेळ चालूच राहणार. चालू द्या तो. आपल्यावाचून तो थांबणार नाही. अडून बसणार नाही. कोणावाचूनच तो अडत नाही. महत्त्व खेळाला आहे. खेळाडूंना नाही. आपण मुकाट्याने खेळणारांना 'गुड लक' म्हणावे आणि पाटीच्या बाहेर बांधावर बसून राहावे. बाद झालेल्याला नाहीतरी पाटीच्या आत जाण्याचा अधिकार असतो कोठे? बाद झालो असलो तरी खेळणारांचे कौतुक करावे, त्यांना उत्तेजन द्यावे, 'आगे बढो' म्हणावे, असे करतो. हे काय थोडे समाधान आहे?

...मुक्काम जवळ जवळ येत आहे. प्रवाह वाहत आहे. अरुंद झाला आहे. पण खोल होत चालला आहे. प्रवाहाबरोबर मी वाहत आहे. प्रतिकार करीत नाही. सहकारही देत नाही. क्वचित प्रसंगी हात मारतो. वास्तविक त्याची गरज नसते. परंतु तेवढेच कर्तृत्वाचे समाधान लाभते. प्रवाह मुक्कामाकडे आपल्या वेगाने मला नेत आहे. मी वाहतो.

राज्य ग्रंथ संग्रहालय, शाळा. [illegible]
क्रमांक 94933 दि ..... Parel

REFBK-0015133